नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
हाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

श्री. शंकर गणेश सुरडकर



र्ष २४ अंक १०

फेब्रुवारी १९७०

आर्वी येथे ता. १४-१५ फेब्रुवारी रोजी भरणार असलेल्या
विदर्भ साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २४] फेब्रुवारी १९७० [अंक १०

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
ग्रंथसंग्रह

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी साहित्याची जीवनमूल्ये

—ग. त्र्यं. माडखोलकर

[बडोदे येथे ता. २७, २८ आणि २९ डिसेंबर १९६९ रोजी भरलेल्या तेहतिसाव्या वाङ्मय परिषदेचे अध्यक्ष या नात्याने श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी केलेले भाषण संपूर्ण पुढे दिलेले आहे.]

आपल्या वाङमय परिषदेच्या या तेहतिसाव्या अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून आपण मला अठ्ठावीस वर्षांनी पुन्हा बडोद्यास बोलावले, याबद्दल मी आपला आभारी आहे. साहित्यक्षेत्रात अशा प्रकारचा स्वयंस्फूर्त बहुमान दुसऱ्यांदा आणि तोही उतारवयात मिळणे, हे मी भाग्य समजतो. मराठवाडा साहित्य परिषद आणि विदर्भ साहित्य संघ या महाराष्ट्रातील विभागीय साहित्यसंस्थांनी, आपले अध्यक्षपद मला दोन वेळा देऊन, माझ्या हातून घडलेल्या त्यांच्या अल्प स्वल्प सेवेची एका परीने पावती दिली. बडोद्याची तशी काहीच सेवा मजकडून घडलेली नाही. तरीदेखील, आपण माझा अशा रीतोने पुन्हा गौरव करावा, हे केवळ आपले सौजन्य होय. १९४१ च्या फेब्रुवारीत, या परिषदेच्या सातव्या अधिवेशनाचा अध्यक्ष या नात्याने, मी प्रथम बडोद्यास आलो, तेव्हा तारुण्याच्या ऐन उमेदीत होतो. या शहरातही त्या वेळी राजैश्वर्य नांदत होते. आता मी आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर येऊन ठेपलो आहे. गायकवाडांच्या राजलक्ष्मीला आपल्या साहित्यसौरभाने प्रसन्न करणारे रियासतकार रा. ब. डॉ. गो. स. सरदेसाई, श्री. वि. स. वाकसकर, जनरल नानासाहेब शिंदे, श्री. दाजीसाहेब आपटे, प्रो. चिं. त्रि. जोशी, राजरत्न वा. वि. जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ साहित्यिक तर या दीर्घ कालावधीत दिवंगत होऊन गेलेले आहेत. तथापि, श्री. भ. ब. पाळेकर यांच्यासारखे पत्रकार आणि प्रो. वि. पां दांडेकर यांच्यासारखे ग्रंथकार प्रभृती जुन्या पिढीतील काही वयोवृद्ध कार्यकर्ते तरी अद्याप आपल्यात आहेत, हे सुदैव होय. गायकवाडांच्या आश्रयाने अडीचशे वर्षांपूर्वी या शहरात स्थायिक झालेला मराठी समाज आणि त्याची मातृभाषा यांच्या शिरावरले राजकृपेचे छत्रही आता उरलेले नाही. हे सगळे स्थित्यंतर पाहून माझे मन आज भांबावल्यासारखे होऊन गेले आहे.

१९४१ साली आपल्या परिषदेच्या सातव्या अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून या व्यासपीठावरून जे भाषण मी केलेले होते, त्यात महाराष्ट्र एकीकरणाचा पुरस्कार केला होता. गुजरातचे सांस्कृतिक नेते आणि प्रतिभाशाली कादंबरीकार श्री. कन्हय्यालाल मुन्शी यांनी, १९३८ साली, कराची येथे भरलेल्या गुजरात साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून, महागुजरातच्या निर्मितीसाठी ईर्ष्येने झटण्याचे आवाहन, गुजराती साहित्यिक आणि जनता यांना केलेले होते. त्याचा उल्लेख आपल्या भाषणात करून मी, मराठी साहित्यिक आणि जनता यांना, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेकरिता झटण्यासाठी हाक दिली होती. गुजरात आणि महाराष्ट्र यांच्या निर्मितीचे ते ध्येय मूर्तावस्थेस आल्याला आता दहा वर्षे होतील. तथापि, संयुक्त महाराष्ट्राची स्थापना म्हणजे केवळ भाषिक राज्याची निर्मिती किंवा केवळ शासकीय एकीकरण एवढाच संकुचित उद्देश, त्या ध्येयाचा पुरस्कार करताना, माझ्या डोळ्यांपुढे नव्हता. नव्या परिस्थितीनुसार मराठी लोकसमाजाची आमूलाग्र पुनर्घटना आणि त्याचे सांस्कृतिक पुनरुज्जीवन या दोन कल्पना त्या ध्येयात मुख्य होत्या. भाषिक आणि शासकीय एकीकरण हे केवळ त्या ध्येयाच्या सफलतेचे साधन म्हणून मी, १९३५ सालापासून, त्याचा पुरस्कार सतत इतक्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आग्रहाने करीत आलेलो होतो. त्या कल्पनांनुसार जोपर्यंत मराठी लोकसमाजाची पुनर्घटना समतेच्या तत्त्वावर होणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्राचे भाषिक आणि शासकीय एकीकरण सार्थकी लागून महाराष्ट्रात एकात्मता उत्पन्न होणे अशक्य आहे. म्हणून, या प्रश्नाची थोडीशी चर्चा, आपल्या अनुमतीने, आज या व्यासपीठावरून करण्याचा माझा विचार आहे.

कारण, राजर्षी सयाजीरावमहाराज गायकवाड यांच्या कृपाछत्राखाली अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र शारदेच्या या व्यासपीठाइतके दुसरे सुयोग्य स्थान, अशा प्रकारच्या चर्चेसाठी, क्वचितच आढळेल. त्या राजर्षीने, १८९६ साली वेदोक्ताचा प्रश्न गुण्या-गोविंदाने धसाला लावून, अखिल हिंदुमात्राला वेदाधिकार मिळण्याचा मार्ग मोकळा केला. अस्पृश्यता-निवारणाचा सक्रिय पुरस्कार करून समतेचे आणि बंधुतेचे उदाहरण लोकांना घालून दिले; व आपल्या राज्यातील आदिवासी काळी परज ही, हिंदु संस्कृतीच्या कक्षेत आणण्यासाठी, तिच्या सुधारणेची योजनाही हाती घेतली. तथापि, अशा रीतीने केवळ सामाजिक पुनर्घटनेचा शुभारंभ करूनच महाराज थांबले नाहीत. आपला देश भौतिक आणि वैज्ञानिक प्रगतीत मागे पडल्यामुळेच त्याच्या नशिबी परावलंबनाचे आणि पारतंत्र्याचे जिणे आले, याची त्यांना प्रत्यक्ष जाणीव होती. त्यामुळे, एका बाजूने ज्ञानविज्ञानाच्या प्रसारार्थ निरनिराळ्या प्रकारच्या ग्रंथमाला काढून आणि दुसऱ्या बाजूने कलाभुवनासारखे औद्योगिक शिक्षणाचे केंद्र स्थापन करून, त्यांनी भौतिक प्रगतीचाही पाया घातला. इतकेच नव्हे, तर कॉंग्रेसच्या प्रवर्तकांनी जी अ. भा. औद्योगिक परिषद, दर वर्षी तिच्या अधिवेशनाच्या वेळी, भरवण्याचा उपक्रम केलेला होता, तिच्या कामकाजातही ते उत्साहाने भाग घेत असत. त्याबरोबरच जबाबदार राज्यपद्धतीचे लोकाभिमुख वळणही त्यांनी आपल्या शासनाला लावले. हा जो सामाजिक पुनर्घटनेचा आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा आदर्श महाराजांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणात निर्माण केला, तो आजही काही बाबतीत आपल्याला मार्गदर्शक होण्यासारखा आहे. म्हणून, त्या प्रगतिशील राजर्षींच्या आदरणीय स्मृतीला अभिवादन करून, मी हे त्रुटित विचार आपल्याला सादर करीत आहे.

शालिवाहनाच्या पाचव्या शतकात मराठी भाषा आणि तिने व्यापलेला महाराष्ट्र देश हे अस्तित्वात येऊन प्रगतीच्या मार्गाला लागलेले होते, असे आपण गृहीत धरू या. भरतखंडातील इतर समाजांच्या मानाने मराठी लोकसमाज या वेळी कोणत्या अवस्थेत होता ? त्याचे देवधर्म कोणते होते ? त्याच्या संस्कृतीची आणि साहित्याची जीवनमूल्ये कोणत्या प्रकारची होती ? व कोणत्या ऐहिक आकांक्षांनी प्रेरित होऊन तो प्रगतीचा मार्ग आक्रमीत होता ? या प्रश्नांचा उलगडा करून घ्यावयाचा, म्हणजे त्या काळातील एकंदर भारतीय समाजाच्या परिस्थितीचा थोडा तरी मागोवा आपल्याला घ्यावा लागेल. बौद्ध धर्माचा या सुमारास भरतखंडातून अस्त झालेला होता. पण, म्हणून काही वैदिक धर्माचे साम्राज्य पूर्वीसारखे स्थापन झालेले होते, असे म्हणता येणार नाही. आपल्या संतकवींनी ' उदंड माजली पाखंडे ' या तुच्छतादर्शक शब्दांनी ज्यांचा उल्लेख आपल्या दहाव्या ते पंधराव्या शतकातील वाङ्मयात पुनःपुन्हा केलेला आहे, ती पाखंडे सगळ्या भरतखंडात या वेळी फोफावलेली होती. वैदिक धर्माचे साम्राज्य जसे या काळात नव्हते, तशीच कोणत्याही एका सम्राटाची सार्वभौम सत्ताही आसेतुहिमाचल पसरलेली नव्हती. वैदिक, बौद्ध, जैन, शाक्त इत्यादी धार्मिक पंथोपपंथांचा, आपापल्या प्रवृत्तीनुसार, पुरस्कार करणाऱ्या अनेक राजांची लहान मोठी राज्ये भारतात सर्वत्र होती; व एकमेकांचा पराभव करून जास्तीत जास्त प्रदेश आपल्या अंमलाखाली आणण्यासाठी त्यांचे अंतःकलह सारखे चालू होते. भरतखंडात किती धर्मपंथ आणि राजवंश या वेळी विद्यमान होते, हे आपल्याला कथासरित्सागर, हर्षचरित, विक्रमांकदेवचरित, राजतरंगिणी, राजप्रशस्ति यासारख्या इतिहासप्राय ग्रंथांप्रमाणेच भास, शूद्रक, कालिदास, बाण, हर्ष, भवभूति, राजशेखर यासारख्या कवींच्या साहित्यावरूनही समजते. वस्तुतः, शालिवाहन शकाच्या प्रारंभापासून तो अल्लाउद्दिन खिलजीच्या देवगिरीवरील स्वारीपर्यंत, १३०० वर्षांच्या कालावधीत, शातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव इत्यादी राजवंशांच्या सत्तेचे उदयास्त महाराष्ट्राने पाहिलेले होते. भिल्लमापासून तो रामदेवरावापर्यंत यादवांच्या साम्राज्याचे जे वैभवशाली शतक होऊन गेले, त्या शतकात तर

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांच्या कृपाछत्राखाली, सन ११८० पासून तो १३०० पर्यंत, भास्कराचार्य, हेमाद्रि, बोपदेव यांच्यासारख्या महापंडितांनी आणि मुकुंदराज, चक्रधर, ज्ञानदेव यांच्यासारख्या धर्मपुरुषांनी, अध्यात्म, धर्मशास्त्र, ज्योतिर्गणित इत्यादी विषयांवर संस्कृत आणि मराठी या भाषांत विपुल ग्रंथरचना करून, त्यांच्या राजवैभवाला आपल्या वाग्वैभवाची जोड दिलेली होती. तरी देखील, या तेरा शतकांच्या काळात राष्ट्रीयत्वाची अस्मिता किंवा एकात्मता, 'महाराष्ट्र' या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या या भूभागात, उत्पन्न झालेली होती, असे काही म्हणता येणार नाही.

कारण, कोणत्याही देशाला व्यक्तित्व, अस्मिता आणि राष्ट्रत्व प्राप्त होण्यासाठी ज्या एकतेची आणि संहतीची चाड त्या देशातील सर्व थरांतल्या लोकांत उत्कटतेने असावी लागते, ती चाड काही महाराष्ट्रातील लोकांत तेराव्या शतकापर्यंत उदित झालेली नव्हती. या दुःस्थितीला हिंदु समाजरचनाच मुख्यतः कारण आहे, असे प्रांजळपणाने मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही. इतिहासाची साक्ष अशी आहे की, कोणत्याही देशातील लोकसमाज हा मूलतः कधी एकसंध नसतोच. कारण, त्या देशाची वसाहत चालू असताना, निरनिराळ्या वंशांच्या आणि संस्कृतींच्या लोकांची आयात सारखी होत राहाते; व मूळच्या आदिवासी लोकांना आणि शक्य तर आपल्या पूर्वी आलेल्या आगंतुकांनाही मागे रेटून, —किंवा जरूर तर त्यांचा निःपात करून सुद्धा, —ते स्थायिक होतात. पण, वसाहत करण्याची ही क्रिया एकदा संपल्यावर, हे सगळे प्रतिस्पर्धी आक्रमक लोक, जेव्हा तो देश आपला समजून, त्याला नावारूपाला आणण्याच्या उद्योगाला लागतात, तेव्हा स्वतःच्या अभ्युदयासाठी त्यांना संघटित व्हावे लागते. या संघटनाच्या प्रयत्नातूनच नंतर त्या देशात एकात्म समाज, एकात्म राज्य आणि एकात्म राष्ट्र यांचा हळूहळू उदय होतो. अशा रीतीने त्या देशाला अखेर स्वतःचे विशिष्ट व्यक्तित्व, अस्मिता आणि राष्ट्रत्व प्राप्त होते. अनेक वंशांच्या, अनेक संस्कृतींच्या, अनेक भाषांच्या आणि अनेक पंथांच्या लोकांनी, एका खंडांत वसाहत करून आणि काही काळ एकमेकांशी झगडूनहि, अखेर एकभाषी, एकसांस्कृतिक आणि एकात्म असे बलशाली एकसंध लोकशाही राष्ट्र आणि संघराज्य, अगदी अलिकडल्या काळांत अमेरिका खंडामध्ये स्थापन केलेले आपण पाहिले आहे. तथापि, महाराष्ट्राची वसाहत झाल्याला आता दोन हजार वर्षे होऊन गेलेली असली, तरी मराठी समाजात एकात्मता उत्पन्न झालेली आहे, असे काही आज देखील म्हणता येणार नाही. कारण, हिंदु धर्म हा सहिष्णु आणि समावेशक असला, तरी संघटक आणि संरक्षक नाही. जयिष्णु तर तो नाहीच नाही. उलट, देवांच्या अनेकत्वापासून तो जातींच्या अनेकत्वापर्यंत त्या धर्मातले सगळ्या प्रकारचे अनंत भेदभाव आणि अमानुष विषमता यांनी भारतीय लोकसमाजात एकात्मता आणि राष्ट्रीयता उत्पन्न होणे अशक्य करून सोडले आहे. वैदिक धर्मातील चातुर्वर्ण्याच्या तत्त्वानुसार हिंदु समाजाचे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार भाग सुरवातीपासूनच मुळी पडलेले होते. याशिवाय चातुर्वर्ण्याच्या कक्षेबाहेरील अस्पृश्य आणि वन्य असे जे गावाबाहेर राहणारे दोन बाह्य भाग होते, ते निराळेच ! हे सगळे भाग जमेस धरले, म्हणजे प्राचीन काळापासूनच हिंदु समाज हा सहा भागांत कसा विभागलेला होता, याची जाणीव होईल. वैदिक वाङमयात भारतीय समाजाचे वर्णन पुष्कळदा 'पंचजन' या शब्दाने केलेले नजरेस पडते. या पंचजनात्मक वैदिक समाजांतले चातुर्वर्ण्याबाहेरील पंचम जन म्हणजे अस्पृश्य होत. वैदिक आर्यांनी, त्यांना माणुसकीचा दर्जा देऊन, गावाबाहेर का होईना, आसरा आणि निवाराही दिला; व पंचम जन किंवा अतिशूद्र म्हणून आपल्या समाजरचनेत त्यांना शेवटी समाविष्ट करून घेतले. पण आदिवासींना मात्र तेवढेही स्थान त्यांनी दिले नाही. गोऱ्या पाश्चात्य आक्रमकांनी, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या नवीन सापडलेल्या भू-खंडातील आदिवासींच्या कत्तली करून, त्यांचा जसा समूळ नायनाट केला, तसे वैदिक आर्यांनी बहुधा केले नसावे, एवढेच त्यांचे चांगुलपण ! पण हिंदु समाजाची ही विभागणी येवढ्यावरच थांबली नाही. चातुर्वर्ण्याचे पर्यवसान निरनिराळ्या कारणांमुळे आजच्या जातिभेदात होऊन, शालिवाहन शकाच्या सुमारासच मुळी, त्याचे हजारो तुकडे पडून गेलेले होते. त्यातच, पारतंत्र्याच्या काळांतील भयानक स्थित्यंतरामुळे जरी हिंदु समाजांतील सर्वच वर्ण, जाति आणि पंथ हे संस्कारच्युत आणि आचारभ्रष्ट होऊन गेले, तरी देखील 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' या कुठल्याही स्मृतीत न सापडणाऱ्या उपटसुंभ वचनानुसार, ब्राह्मण आणि शूद्र असे फक्त दोनच वर्ण कलियुगात शिल्लक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उरलेले आहेत, असा अट्टाहास करण्याइतकी वैदिकांची बौद्धिक अवनती झाली. त्यामुळे, आज भारतातील सर्वच गावांमध्ये गावाबाहेर आणि जंगलात राहाणाऱ्या व मानवी संस्कृतीच्या वेगवेगळ्या अवस्थेत असलेल्या किती तरी जाति–जमाती निकृष्ट जीवन कंठीत आहेत. जे भारतात, तेच महाराष्ट्रातही !

चातुर्वर्ण्यामुळे भारतीय समाजाची आणखीही एक जी अपरिमित राष्ट्रीय हानी झाली, तिचाही उल्लेख करणे अवश्य आहे. ती हानी म्हणजे, राष्ट्र-रक्षणाची सर्व जबाबदारी समाजातील फक्त एकाच वर्णावर म्हणजे क्षत्रियांवर टाकण्यात आली, हे होय. त्याचा पहिला दुष्परिणाम हा झाला की, धर्माच्या म्हणा किंवा राष्ट्राच्या म्हणा रक्षणासाठी हातात शस्त्र घेण्याची काही जबाबदारी आपल्यावर आहे किंवा कधी पडेल, असा विचारही इतर वर्णांच्या मनात येत नसे; व दुसरा दुष्परिणाम असा झाला की, यादवीत म्हणा किंवा परचक्रात म्हणा ज्या ज्या वेळी क्षत्रियांचा संहार फार मोठ्या प्रमाणात झाला, त्या त्या वेळी भारतीय समाजाला आत्मरक्षणाच्या बाबतीत पंगुत्व येऊन गेले. कौरव, पांडव आणि यादव ही जी महाभारतकालातील तीन प्रमुख क्षत्रिय घराणी, त्यांचा नाश आपसातील युद्धात झाल्यामुळे, कलियुगाचा प्रारंभ होण्याच्या सुमारास, भारतीय समाज हा निस्त्राण आणि निर्नेतृत्व होऊन गेला, असा जो निष्कर्ष अनेक पुराणेतिहासज्ञांनी काढलेला आहे, तो यथार्थ वाटतो. वर्णाश्रमधर्माचे हे निर्बंध झुगारून देऊन ब्राह्मण, वैश्य आणि शूद्र या तिन्ही वर्णांतील अनेक बुद्धिमान् साहसी पुरुषांनी, प्रसंगीं क्षात्रवृत्तीचा अवलंब केला आणि राज्येही स्थापन केली, ही गोष्ट खरी. पण, म्हणून काही संपूर्ण समाज सदैव स्वसंरक्षणक्षम राहाण्याच्या दृष्टीने जे हें अनर्थकारक वैगुण्य चातुर्वर्ण्यामुळे आपल्या समाजरचनेत उत्पन्न झाले, त्याची घातकता आणि व्यापकता कमी होत नाही. अर्थात् देशावर प्राणांतिक परचक्राचे गंडांतर ओढवले असता, राष्ट्ररक्षणार्थ तमाम जनतेला शस्त्र-धारणाचा आदेश देण्याची जी पद्धत पाश्चात्य देशात अगदी जुन्या काळापासून आहे, ती आपल्या देशात कधीच अस्तित्वात येऊ शकली नाही. उलट, लढाऊ आणि बिनलढाऊ जाती असे जे वर्गीकरण या वर्ण-व्यवस्थेतून उद्भूत झाले, त्यामुळे इतर जातींतील लोकांनी आपल्या देशावर स्वाऱ्या करणाऱ्या विधर्मी-यांना आणि विदेशीयांना मदत केल्याची उदाहरणे मात्र अगदी शकारंभापासून सापडतात. व्यापारी वर्गातील काही धनाढ्य घराण्यांनी आपल्या देशावर चढाई करून येणाऱ्या आक्रमकांना रसद आणि पैसा पुरवल्याचे अनेक पुरावे प्रो. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्यासारख्या इतिहा-सज्ञांनी प्रसिद्ध केलेले आहेत. त्यामुळे, आपल्या धर्मावर, संस्कृतीवर आणि देशावर आलेल्या परचक्राविरुद्ध झुंज द्यावयाला संपूर्ण भारतीय समाज रणांगणावर एकमुखाने उभा ठाकल्याचे उदाहरण गेल्या हजार वर्षांच्या इति-हासात एकही दिसून येत नाही. उलट, राजस्थानातील आणि महाराष्ट्रातील अनेक रजपूत आणि मराठा राजांनी, एकमेकांविरुद्ध केलेल्या लढायांत, मुस्लिम किंवा पाश्चात्य आक्रमकांना आमंत्रणे देऊन घरात आणले आणि या आत्मघातकी भाऊबंदकीमुळे अखेर राष्ट्राचाही घात केला, अशीच इतिहासाची साक्ष आहे. चातुर्वर्ण्य आणि त्यातून उद्भवलेला जातिभेद यांच्यामुळे झालेल्या या राष्ट्रीय हानीची तीव्रता अजूनही म्हणण्या-सारखी कमी झालेली नाही.

जातिभेदामुळे आधीच झालेल्या या भारतीय समाजाच्या शकलीकरणात, आश्रयाच्या, व्यापाराच्या, धर्मप्रसाराच्या किंवा आक्रमणाच्या उद्देशाने परदेशातले जे हजारो लोक भरतखंडात अनादि काळापासून सारखे येत होते, त्यांनी आपआपल्या परीने भर घातली. ख्रिस्त शकापूर्वी शक, हूण, यूहची, यवन, पर्शु, पल्हव, मेद, मुगल, अरब इत्यादी जे परकीय लोक भारतात आले, त्यांपैकी बहुतेक, येथील धर्मपंथांचा आणि संस्कृतीचा स्वीकार करून, भारतीय समाजात विलीन होऊन गेले. तथापि, येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर यांनी पश्चिम आशियात आपआपल्या धर्मांची स्थापना केल्यावर मात्र, त्या दोन जयिष्णु धर्मांचे जे अनुयायी, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय आक्रमणाच्या आकांक्षेने, भारतात सारखे येऊ लागले, त्यांनी या देशाचा संपूर्ण इतिहास बदलून टाकला. त्यांच्या आक्रमणामुळे हजारो पंथोपपंथांनी आणि जाति–जमातींनी आधीच छिन्न–भिन्न होऊन गेलेल्या भारतीय समाजाची विघटना पराकोटीला नेली. या दोन धर्मप्रवर्तकांपैकी येशू ख्रिस्त हा स्वतः भारतात येऊन गेला असावा, असा अनेक पाश्चात्य संशोधकांचा अंदाज आहे. किंबहुना, हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयातील पाकिस्तानी न्यायाधीश डॉ. सर महंमद झाफरुल्लाखान यांनी तर,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ता. २८ ऑक्टोबर १९६५ रोजी, टोरोन्टो येथे वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत, असे विधान केलेले होते की, "येशू ख्रिस्त हा काश्मीरमध्ये श्रीनगर येथे दिवंगत झाला आणि तेथेच त्याचे दफनही झाले. त्याला सुळावर चढवल्यानंतर जेव्हा तो मूर्च्छित झाला, तेव्हा त्याचा शिष्य जोसेफ याने त्याला जिवंत स्थितीत सुळावरून खाली काढले. नंतर ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना दर्शन दिले आणि तो धर्मप्रचार करण्यासाठी भारतात गेला. श्रीनगरमधील येशूच्या थडग्याला लोक 'प्रेषित युझासिफचे थडगे' असे म्हणतात. मी त्या थडग्याला भेट दिलेली आहे. हे ख्रिस्ताचे थडगे आहे, याबद्दल खात्रीलायक पुरावा आहे." (...... He said Christ was buried in the City of Srinagar in Kashmir....... ......Jesus swooned on the cross and was removed alive by Joseph of Arimaihea. He later showed himself to disciples to prove that he was alive, then went to India to preach........ Jesus' burial place there is called the "Tomb of Yuzassif the prophet"........... I have visited it. The evidence is convincing that this, indeed, is the tomb of Jesus.) तथापि, खुद्द येशू ख्रिस्त हा भारतात आल्याचा प्रश्न जरी अनिर्णीत असला, तरी त्याचा शिष्य सेंट थॉमस हा मलबार किनाऱ्यावर येऊन उतरला आणि त्याने मलबारपासून मद्रासपर्यंत प्रचार करून शेकडो लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली, हे मात्र निश्चित. मद्रास शहरात मैलापूर येथील टेकडीवर त्याचे थडगे असून, इ. स. च्या पहिल्या शतकात त्याने दीक्षा देऊन निर्माण केलेला प्राचीन ख्रिस्ती समाज 'सेंट थॉमसचे ख्रिस्ती' या नावाने आजही संबोधण्यात येतो.

हिंदु समाजाची विघटना करण्याच्या बाबतीत इस्लामने केलेला पराक्रम तर भारताच्या इतिहासात रक्ताक्षरांनी लिहिला गेलेला आहे. हिंदु समाज जर खरोखरीच एकात्म असता, राज्यत्व आणि राष्ट्रत्व यांची चाड जर त्याच्या ठिकाणी उदित झालेली असती, तर चौहाव, राठोड, परमार, चालुक्य, कलचुरि, यादव, काकतीय, होयसळ, पांड्य, चोल, पल्लव, कदंब इत्यादी घराण्यातील राजे, महाराजे आणि सम्राट् भरतखंडात राज्य करीत असता, या देशाला जे धर्मशाळेचे स्वरूप आले, ते खचित येते ना. अशी धर्मशाळा की, जिच्या सदैव सताड उघड्या असलेल्या दारातून वाटेल त्या विदेशी आणि विधर्मी लोकांनी, आश्रयाच्या, व्यापाराच्या, धर्मप्रसाराच्या किंवा आक्रमणाच्या उद्देशाने येऊन, खुशाल कुठेही स्थायिक व्हावे. राज्य किंवा राष्ट्र म्हटले, म्हणजे त्यात परकीयांना, राजाच्या अनुमतीशिवाय, प्रवेश मिळत नाही. मग थारा मिळणे तर दूरच राहिले. पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, दिल्ली येथे चौहान, देवगिरी येथे यादव आणि भागानगर येथे काकतीय वंशाचे राजे राज्य करीत असता, इस्लाममधील सूफी पंथाचे प्रचारक अरबस्तानातून आणि इराणातून आठव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत भारतात अव्याहत येत होते आणि हजारो लोकांना आपल्या धर्माची दीक्षाही सुखेनैव देत होते. इस्लामचा भारतातील पहिला प्रभावशाली धर्मोपदेशक ख्वाजा मोइनुद्दिन चिस्ती हा समरकंदहून ११६२ साली अजमीर येथे आला. वाटेत सातशे हिंदु लोकांना त्याने आपल्या पंथात ओढले. त्याच्या या आक्रमक धोरणामुळे सम्राट् पृथ्वीराज चौहान याच्याशी त्याचा खटका उडाला. तेव्हा, चिस्तीने, त्यापूर्वी अनेकदा पराभूत झालेल्या शहाबुद्दिन घोरीला दिल्लीवर स्वारी करण्याचा सल्ला देऊन, आपल्या फितुरीने पोखरलेले पृथ्वीराजाचे साम्राज्य ११९२ साली बुडवले. उत्तरेतील याच इतिहासाची पुनरावृत्ती शंभर वर्षांनी दक्षिणेत निघाली. देवगिरी येथे यादव सम्राट् राज्य करीत असता नवव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत नुरुद्दिन, मोमिन आरिफ, जलालुद्दिन, शर्फुद्दिन, हयात कलंदर, इसामुद्दिन, शेख सरमस्त, शहादुल्ला रहमान, मोइजुद्दिन, बुऱ्हाणुद्दिन प्रभृती सूफी प्रचारक एकामागून एक दक्षिणेत उतरले; व देवगिरी, पैठण, मंगरूळ, गुलबर्गा, एलिचपूर इत्यादी शहरी ठाण मांडून त्यांनी गोदावरीपासून तुंगभद्रेपर्यंत सगळी दक्षिण पोखरून काढली. १२९३ साली शेवटला यादव सम्राट् रामदेवराव याचा पराभव अल्लाउद्दिन खिलजीने केल्यानंतर, त्याच्या प्रेरणेने मुन्तजबुद्दिन जर्जरीबक्ष हा, आपल्या ७०० चेल्यांना बरोबर घेऊन, देवगिरीपासून सात मैलांवर खुल्दाबाद येथे आला; व तेथे आपला तळ ठोकून त्याने गोदावरीपासून कावेरीपर्यंत सगळी दक्षिण इस्लामच्या छत्राखाली आणण्यासाठी भगीरथ प्रयत्न

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केले. अशा रीतीने नवव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत, श्रीएकनाथमहाराजांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, सगळ्या दक्षिण भारतात तुर्काण होऊन गेले.

पण, आश्चर्याची गोष्ट अशी की, आठव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत भरतखंडावर हे जे विधर्मीयांचे आक्रमण इतक्या वेगाने चालू होते, त्याचे भीषण विध्वंसक स्वरूप पाहूनसुद्धा, हिंदु राजे जसे सावध झाले नाहीत, तसेच हिंदु मुत्सद्दी आणि सत्पुरुषही ! वस्तुतः, त्यांच्या डोळ्यांसमोर इस्लामी स्वाऱ्यांच्या जबरदस्त धडाक्याने हिंदु राज्ये एकामागून एक धडाधड कोसळून पडत होती; हजारो लोकांच्या कत्तली आणि धर्मांतर होत होते; व शेकडो संपन्न शहरे आणि मंदिरे उध्वस्त केली जात होती. उत्तर भारतात हा जो प्रळय चालू होता, त्याची काहीच चाहूल दक्षिण भारताला लागली नसेल, असे कसे समजावे ? नुरुद्दिन, जलालुद्दिन, आरिफ, हयात कलंदर; सरमस्त, शहादुल्ला रहमान प्रभृती सूफी प्रचारक, अल्लाउद्दिन खिलजीची चढाई देवगिरीवर होण्यापूर्वीच, राक्षसभुवन, देवगिरी, मंगरूळ, गुलबर्गा, एलिचपूर इत्यादी यादव राज्यातील शहरात ठाण मांडून, इस्लामचा प्रचार करीत होते, हे भास्कराचार्य, हेमाद्रि, बोपदेव प्रभृती पंडितांच्या आणि मुकुंदराज, चक्रधर, ज्ञानदेव प्रभृती सत्पुरुषांच्या लक्षात कसे आले नाही ? या प्रज्ञावंतांच्या प्रचंड वाङमयात आपल्या धर्मावर आणि संस्कृतीवर ओढवलेल्या या दारुण संकटाविषयी थोडी देखील चिंता व्यक्त झालेली कशी दिसत नाही ? नाही म्हणावयाला, "एक वेळ दीलीचा सुलतान चालीला : अवघें मंडळ हालवलें :" अशा प्रकारचा जो ओझरता उल्लेख चौदाव्या शतकातल्या 'स्मृतिस्थळ' या महानुभावीय ग्रंथात दृष्टीस पडतो, तेवढाच. उलट, उत्तर भारतात या आक्रमणाचे भयानक उत्पात चालू असता आणि दक्षिण भारतात गोदावरी–कृष्णांचा दुआब सूफींनी व्यापला असता, यादव सम्राटांचा गणकाग्रणी हेमाद्रि पंडित हा 'चतुर्वर्गचिंतामणी'सारखा कर्मकांडावरील ग्रंथ लिहिण्यात गर्क होता. जिथे रामदेवरावाच्या 'मंत्रिचूडामणी'ची ही मनोवृत्ती, तिथे त्या काळातल्या इतर विद्वानांबद्दल काय बोलणार ? ज्ञानेश्वरीच्या समारोपात, "तेथ यदुवंशविलास । जो सकलकलानिवास ॥ न्यायाते पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र," असे रामदेवाच्या राजवटीचे वर्णन केलेले आहे. पण, यादव वंशातील या शेवटल्या सम्राटाचा एकंदर इतिहास आणि तत्कालीन वाङमयात आलेली त्याच्या संबंधीची माहिती ध्यानात घेतली, म्हणजे ज्ञानदेवांचा अति आवडता अलंकार जो अतिशयोक्ति त्याने हे वर्णन विनटलेले आहे, असे वाटल्याविना राहात नाही. किंबहुना, ज्ञानदेवांनंतर तीनशे वर्षांनी उदयाला आलेल्या रामदासांनी केलेला श्रीशिवाजीमहाराजांचा गुणगौरव आणि संभाजीमहाराजांची कानउघाडणी यांची तुलना जर रामदेवरावाच्या ज्ञानेश्वरीतील या वर्णनाशी केली, तर 'ज्ञानियांच्या राजा'चा गोडवेपणा आणि समर्थांचा कडवेपणा यातला फरक आपल्याला तीव्रतेने जाणवतो. फार तर, 'सकलकलानिवास' हे जे विशेषण ज्ञानदेवांनी रामदेवरावाला दिलेले आहे, ते समर्पक ठरेल. कारण, केवळ साहित्य आणि संस्कृती यांच्या विकासाचाच जर विचार केला, तर यादव साम्राज्याचे हे शतक म्हणजे महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील 'सुवर्णयुग' होते, असे म्हणावे लागते. भास्कराचार्यांचा लीलावती, शार्ङ्गधरांचा संगीतरत्नाकर, मुकुंदराजांचा विवेकसिंधु, हेमाद्रींचा आयुर्वेदरसायन, बोपदेवांचा मुक्ताफल, नरेंद्रांचा रुक्मिणीस्वयंवर, ज्ञानेश्वरांचा भावार्थदीपिका यासारखे ग्रंथ ज्या या शतकात निर्माण झाले, ते शतक महाराष्ट्राच्या निरनिराळ्या क्षेत्रातील प्रगतीचे प्रदर्शक आहे, यात शंकाच नाही. तथापि, या सगळ्या बुद्धिदिग्गजांना आपल्या देशावर आणि धर्मावर ओढवलेल्या परचक्राचे आकलन झाले नाही, हे मात्र निःसंशय ! एरव्ही, "नैवासीन्न च वर्तते न भविता हेमाद्रिसूरेः परः" अशी ज्याची प्रशस्ती समकालीनांनी केलेली आहे, तो हा यादवांचा करणाधिप दक्षिणेत ठिकठिकाणी देवळे बांधीत आणि कोणत्या व्रताच्या उद्यापनाला कोणती पक्वान्ने करावीत, यांच्या जंत्र्या देत कसा बसला असता ?

याचा अर्थ असा की, यादव साम्राज्याच्या काळात महाराष्ट्राची भरभराट जरी डोळे दिपवण्यासारखी झाली, तरी त्या साम्राज्यातील सर्वसामान्य लोकांनाच केवळ नव्हे, तर सम्राटांना, मुत्सद्यांना, पंडितांना, ग्रंथकारांना आणि सत्पुरुषांना देखील विंध्याद्रिपर्यंतचा अर्धा भरतखंड कोणत्या परचक्राच्या तावडीत सापड-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेला आहे आणि त्याचे वेध दक्षिण भारताला कसे लागलेले आहेत, याची जाणीव काही झालेली नव्हती. तसे पाहिले, तर चक्रधरस्वामींना काय किंवा ज्ञानेश्वर-महाराजांना काय महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा जाज्वल्य अभिमान होता; व ज्ञानेश्वरी आणि महानुभावीय वाङ्मय या दोहोतही तो रसरसून प्रकट झालेला आहे. चक्रधरांचे तर, "महाराष्ट्रीं असावे," हे मुळी आचारसूत्रच होते. या सूत्रावर भाष्य करताना गुर्जरशिववास याने आपल्या 'स्थळपोथी'त असे उद्गार काढलेले आहेत की, "महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र : भणौनि महाराष्ट्र : राष्ट्र भणीजे देश...... महंत भणीजे थोर......महाराष्ट्र सात्विक......तेथचा वारा : झड : पाऊस : तेही सात्विक......महंत भणीजे निर्दोष आणि सगुण...... तेथ असत : अनाचार करावयाची वुद्धी नुपजे......थोरापासोनी महाथोर तयातें महाराष्ट्र म्हणिजे...." पंधराव्या शतकातल्या गुर्जरशिववास याच्या या उक्तीत आणि विसाव्या शतकातल्या कोल्हटकरांच्या महाराष्ट्रगीतात अभिमानाची उत्कटता सारखीच आहे. तथापि, चक्रधर आणि ज्ञानेश्वर यांनी 'महाराष्ट्र' आणि 'महाराष्ट्र मंडळ' हे जे दोन शब्द वापरले, ते केवळ देशवाचक म्हणून; राष्ट्रत्वाच्या जाणिवेने नव्हत. सांस्कृतिक दृष्टीने यादव कालात महाराष्ट्र प्रौढ झालेला होता, ही गोष्ट खरी. पण, राष्ट्रत्वाच्या आणि राज्यत्वाच्या दृष्टीने मात्र तो, इतिहासाचार्य राजवाडे यांनी म्हटल्याप्रमाणे, 'वालराष्ट्र'च होता. कोणताही देश राष्ट्र या पदवीला चढण्यासाठी जो स्वतःच्या पृथगात्मतेचा साक्षात्कार त्याला व्हावा लागतो, जी अस्मिता, एकात्मता आणि दृ ता त्याच्या ठिकाणी उत्पन्न व्हावी लागते व स्वतःची प्रकृती आणि नियती ओळखून तदनुसार आपले भवितव्य घडवण्यासाठी जो आत्मप्रत्यय त्याच्या ठिकाणी निर्माण व्हावा लागतो, त्यांपकी काहीही महाराष्ट्राच्या ठिकाणी आलेले नव्हते. किंवहुना, यादवकालापासून जरी पुढे मरहट्ट, मारास्ट्र, महाराष्ट्र, मराठा इत्यादी शब्द सर्रास वापरण्यात येत होते, तरी मराठी भाषेने व्यापलेल्या संपूर्ण महाराष्ट्र देशाचे असे पृथगात्मत्व, व्यक्तित्व, आणि राष्ट्रत्व याची जाणीव मराठशाहीतील किती मुत्सद्यांना झालेली होती, यावद्दल शंका वाटते. मग श्रीशिवाजीमहाराजांच्या डोळ्यांपुढे असलेल्या 'हिंदवी स्वराज्या'च्या विशाल ध्येयाच्या आकलनाचा प्रश्न दूरच राहिला. चक्रधर आणि ज्ञानेश्वर यांना जर महाराष्ट्राच्या राष्ट्रत्वाची जाणीव असती,-मराठी जनतेचे स्वराज्य म्हणून त्याच्या एकराज्यत्वाची भावना जर त्यांच्या ठिकाणी उदित झालेली असती,-तर आपल्या डोळ्यांसमोर यादवांच्या राज्यात तुर्काण माजण्याचा प्रसंग आलेला पाहून त्यांचा जीव तळमळला असता आणि त्यांचे रक्त सळसळून उठले असते. ती जाणीव त्यांच्या ठिकाणी नव्हती, म्हणूनच थंड रक्ताने आणि त्याहिपेक्षा थंड डोक्याने, भोवताली चालू असलेल्या विध्वंसाकडे डोळेझाक करून, ते इतक्या निर्विण्ण मनाने अध्यात्मचिंतन करू शकले. राज्य आणि राष्ट्र यांच्या अभिमानाचा प्रश्न जरी क्षणभर बाजूला ठेवला, तरी सिंघणदेवापासून रामदेवापर्यंत सगळे यादव सम्राट्, भास्कराचार्यापासून हेमाद्रिपर्यंत सगळे पंडित आणि मुकुंदराजापासून ज्ञानदेवापर्यंत सगळे सत्पुरुष हे वैदिक धर्म आणि संस्कृती यांचे तरी नितांत अभिमानी होते ना? आणि, हेमाद्रीने आपल्या राजप्रशस्तीत, "क्षीणः कालवशात् पुनस्तरुणतां धर्मोपि संप्रापितः,"--"कालयोगाने क्षीण झालेल्या धर्माला यादवसम्राटांनी पुन्हा तारुण्य प्राप्त करून दिले," असा त्यांच्या प्रतापाचा महिमा गायिलेला होता ना? मग त्या धर्माच्या आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी तरी निदान दक्षिणेत नवव्या शतकापासून सुरू झालेला आणि आता थेट देवगिरीच्या वेशीपर्यंत येऊन थडकलेला सूफी प्रचारकांचा धुमाकूळ थांबवणे, हे त्यांचे कर्तव्य होते की नाही? पण ते करण्याची बुद्धिदेखील या सगळ्या प्रज्ञावंतांना झाली नाही. विशेष आश्चर्य वाटते, ते या गोष्टीचे की, तारुण्यात ज्ञानेश्वरांबरोवर आणि वार्द्धक्यात इतर संतांबरोवर अशी दोन वेळा अखिल भरतखंडात तीर्थयात्रा करणाऱ्या नामदेवमहाराजांच्या तीर्थावळींत मुसलमानांनी उत्तर भारतात घातलेल्या हैदोसाचा उल्लेख कुठेही आढळत नाही. फक्त ज्ञानदेवमहाराजांच्या अवतारकार्यावरील--

राजे भ्रष्ट यवन झाले । ठायीं ठायीं दोष घडले
मग इहीं अवतार घेतले । कलिदोष हरावया ।।

या पूर्ववयातल्या चार चरणी अभंगात आणि सुलतानाने सत्त्व पाहाण्याकरता मारलेली गाय उठवल्याच्या चमत्काराचे वर्णन करण्यासाठी--

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुलतानु पूछे सुनु बे नामा। देखउ राम तुम्हारे कामा
या उतारवयात लिहिलेल्या शीखांच्या ग्रंथसाहेबातील अठ्ठावीस चरणी हिंदी कवनात जो काय तुर्काणाचा निर्देश आलेला आहे, तेवढाच! जिथे भिवराकाठी उभारलेली वारकरी पंथाची गुढी रावीतीरावर नेऊन रोवणाऱ्या त्या दिग्विजयी संतशिरोमणीची परचक्राविषयी ही वृत्ती, तिथे इतर संतांविषयी आणि ज्ञात्यांविषयी काय बोलावे?

राष्ट्रत्वाच्या जाणिवेचा जो हा अभाव यादवकालीन महाराष्ट्रात होता, त्याला कलिवर्ज आणि कलिप्राप्त यांच्या विधिनिषेधांची जोड मिळाल्यामुळे कोणत्याही धार्मिक किंवा राजकीय आक्रमणाला ईर्ष्येने प्रतिकार करण्याची प्रवृत्ती लोकांच्या ठिकाणी मुळी उरलेलीच नसावी. किंबहुना, हेमाद्रि आणि बोपदेव किंवा चक्रधर आणि ज्ञानेश्वर हे जे परचक्राविषयी इतके उदासीन राहिले, तेही बहुधा कलिकालाचा पगडा मनावर बसलेला असल्यामुळे! म्हणूनच, १२९३ पासून १३१८ पर्यंत अवघ्या पंचवीस वर्षांच्या कालावधीत, अल्लाउद्दिन खिलजी आणि त्याचे सरदार यांना दक्षिणेतील सगळी हिंदु राज्ये, तीन स्वाऱ्या करून, लीलेने बुडवता आली. देवगिरीच्या उच्छेदानंतर पस्तीस वर्षांनी साष्टी बेटात महिकावती नगरीत म्हणजे माहीम येथे असलेले महाराष्ट्रातील शेवटले छोटे हिंदु राज्य, महिकावतीचा राजा नागरशा याचा वध भायखळा येथील लढाईत करून, खिलजीचा सरदार निका मलिक याने १३४८ साली नष्ट केले. या दुर्घटनेचे वर्णन करताना महिकावतीच्या बखरीचा लेखक केशवाचार्य याने असे उद्गार तळतळून काढलेले आहेत की, "दिल्लीमध्ये सुलतान उपजला आहे ।। तो पातशाहि करिल ।। तेधवां धर्म लोपेल ।। देवालय भंगिल ।। राजे देशोदेशिचे शरण म्लेछांसि होतिल ।। म्लेंछधर्म वृद्धी पावेल ।। कलयुगभाषित भविष्यार्थ आहे ।।" अशा रीतीने राष्ट्रत्वाच्या अभावाच्या भरीला आणखी हा कलियुगाच्या भविष्यार्थाचा प्रभावही महाराष्ट्रातील लोकांना निष्प्रभ आणि निष्कर्तृक करावयाला कारण झाला. त्यामुळे, अल्लाउद्दिन आणि त्याच्यामागून त्याचे सरदार दक्षिणेत उतरल्यावर, त्यांची धाड परतवून लावण्यासाठी एकोप्याने सामना देण्याऐवजी, उलटे ठिकठिकाणचे छोटे हिंदु राजे, सरदार, जमीनदार, वतनदार वगैरे त्यांना येऊन मिळाले; व १२९३ मध्ये अल्लाउद्दिनाने आरंभिलेले दक्षिण काबीज करण्याचे कार्य १३१८ मध्ये पूर्ण होऊन गेले. नाना देव, नाना पंथ, नाना वंश, नाना जाती आणि नाना भाषा यांनी सहस्रशः विभागलेल्या हिंदु समाजात एकसमाजत्व, एकराज्यत्व आणि एकराष्ट्रत्व यांची मुळी चाडच नव्हती. त्यामुळे, कोणीही मातबर आणि कर्तबगार हिंदु माणूस, स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी, आक्रमकांच्या फौजेत विनदिक्कत सामील होत असे. म्हणूनच, केशवाचार्याने अल्लाउद्दिनाच्या स्वारीविषयी असे उद्गार जळफळत काढलेले आहेत की, "सैनिक इनामक सर्व रईत अजम सेक आलावदिनाचि जालि ।। या उपर देसा मध्यें ते हि बहुत यवन जाले ।। राज्य अभिमान सांडला ।। शस्त्रें सोडली ।। कृषि धरिली ।। सोमवंशि कारकोणि गांवखोति ताडमदिरेस उदिम धरिला ।। काहिक असति घरोन आपलि वतने ।। काहिक सेवा करुं लागले ।। काहिक नष्टले ।। बहुत आचारहिन जाले ।।" शेवटी, १४४८ साली साष्टी बेटातील नायकोराव या सरदाराला "देविने धर्म माहाराष्ट्र रक्षाया कारणे," असा स्वप्नदृष्टांत दिला की, "जाति मेळावा करावा। हा आशिर्वाद आमचा। श्रीदेवि आद्य शक्ति, जगदंबिका माहाराष्ट्रधर्मरक्षिका ।। तुम्हा सुप्रसन्न असो ।।" देवीच्या या आज्ञेनुसार नायकोराव आणि केशवाचार्य यांनी साष्टी बेटातील चार हजार लोकांची सभा भरवली; व केशवाचार्याने त्या मेळाव्याला महाराष्ट्रधर्माचा उपदेश केला. मात्र त्याचा हा महाराष्ट्रधर्म म्हणजे राष्ट्रधर्म – राष्ट्रीयत्वाचा धर्म – नव्हता; तर प्रत्येक माणसाने आपले कुळधर्म, जातिधर्म, वर्णधर्म वगैरे आचार यथासांग पाळून धर्माचरण आणि धर्मरक्षण करावे, एवढाच फक्त त्याचा संकुचित अर्थ होता. अर्थात् महाराष्ट्र धर्माच्या त्याच्या या कल्पनेला राजकीय आणि राष्ट्रीय आकांक्षांचे अधिष्ठान अजिबात नव्हते.

तेराव्या शतकाच्या प्रारंभी यादव साम्राज्य अशा रीतीने नष्ट होऊन महाराष्ट्रात जे तुर्काण सर्वदूर झाले, त्यातून डोके वर काढावयाला त्याला तीनशे वर्षे लागली. कारण, कोणत्याही आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठी अवश्य असलेली एकात्मतेची भावना मराठी लोकसमाजात नसल्यामुळे, त्याला पारतंत्र्यात मुकाटचाने जिणे कंठण्याशिवाय मुळी गत्यंतरच नव्हते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून, वरिष्ठ जातींतील पांढरपेशा लोकांनी, दिवाणगिरी, फडणिशी, सरदारी, सरंजाम, नोकऱ्या वगैरे संपादन करून, या नव्या परकीय राजवटीत आपला जम बसवून घेतला; व खेडे विभागातील लोकांनी आपली बलुती आणि वतने सांभाळण्यापलिकडे अन्यत्र कुठेही लक्ष दिले नाही. हिंदूंच्या समाजरचनेप्रमाणेच त्यांची ग्रामरचनाही एकसमाज, एकराज्य आणि एकराष्ट्र यांच्या विकासाला अपकारक होती. बलुतेदारी आणि वतनदारी यांच्या पायावर आपल्या देशातील खेड्यांची स्वयंपूर्ण रचना केलेली असल्यामुळे, राज्यसत्तेत कितीही परिवर्तने झाली, तरी खेड्यातल्या या सनातन ग्रामरचनेला सहसा धक्का लागत नसे. त्यामुळे, राज्यकर्ता हिंदु असला काय, मुसलमान असला काय किंवा इंग्रज असला काय, खेड्यातील जनतेला त्याचे काही सोयरसुतक वाटत नसे. वर्षातून एकदा कोतवाल आणि पाटील यांच्या मार्फत शेतसारा भरून सरकारी देणे चुकते करून टाकले, म्हणजे खेड्यातले लोक पुन्हा कधी सरकारविषयी विचार करण्याचा शीण आपल्या डोक्याला देत नसत. मग त्यांचे डोके गावकीत काय शिणत असेल, तेवढेच ! राज्यसत्ता किंवा राज्यकर्ता हे जोपर्यंत गावगाड्यात हात घालीत नसत, तोपर्यंत हे स्वयंपूर्ण आणि स्वयंतुष्ट खेडे त्यांच्याकडे ढुंकूनही पाहात नसे. "कोई नृप बने, हमे क्या हानि ?"—अशी त्यांच्याविषयी खेड्याची वृत्ती असे. अनादि कालापासून चालत आलेली हिंदु ग्रामरचनेची ही स्वयंपूर्णता एकराज्यत्वाच्या आणि एकराष्ट्रत्वाच्या परिपोषाला किती अपकर्षक ठरली असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! त्यामुळे, महाराष्ट्रांत तुर्काण झाल्यावर, खेडे विभागाच्या जीवनात फक्त एवढाच फरक पडला की, प्रत्येक गावात ग्रामजोशी, देवळे आणि समाध्या यांच्या जोडीला आता एकादा मुलाणा, एकादी मशिद आणि एकादा दर्गा येऊन बसला. तशीच धर्मांतरित मुसलमानांची वसाहतही खेडोपाडी थोडी बहुत होत गेली. या नव्या परिस्थितीशी जुनाट, चिवट, जातिवद्ध हिंदु ग्रामरचनेने, मुसलमानांची स्वतंत्र जात आणि वस्ती वनवून, जुळते घेतले. हिंदु धर्मातील समन्वयाचा सिद्धांत आणि सहिष्णुता हीं दोन्ही अशा रीतीने मुसलमानांची वाढती सत्ता आणि संख्या यांचा आपल्या समाजरचनेत सुखेनैव समावेश होऊ देण्याच्या कामी सार्थकी लागली. इतकेच नव्हे, तर हिंदूंचे आधीच जे तेहतीस कोटी देव होते, त्यात आता मुसलमानांचे पीर आणि अवलिया यांचा अंतर्भाव होऊन, त्यांच्या तस्विरा, टांक आणि नाल यांना हिंदूंच्या देव्हाऱ्यात मानाचे स्थान मिळाले. त्याबरोबरच, मोहरमाच्या सणात किंवा पीरांच्या उरुसात सामील होऊन फकिरी घेणे, हा तर शहरातील हिंदु जहागीरदारापासून तो खेड्यातील कोतवालापर्यंत सगळ्यांचा नित्यक्रम होऊन बसला. नव्या विधर्मी राज्यकर्त्यांशी समीपता आणि सरूपता साधण्याच्या या चढाओढीत हिंदु सत्पुरुषही काही मागे पडले नाहीत. एकीकडे वर्णाश्रमधर्माचा अट्टाहासाने पुरस्कार करावयाचा आणि दुसरीकडे सूफी पंथाची दीक्षा घ्यावयाची, असे दुहेरी धार्मिक जीवन आमच्या सत्पुरुषांनी महाराष्ट्रात वाढीला लावले. दत्तसंप्रदाय, नाथसंप्रदाय, आनंदसंप्रदाय, चैतन्यसंप्रदाय इत्यादि हिंदु धर्मातील अनेक संप्रदायांवर सूफी पंथाची छाप पडली; व त्या पंथाच्या काही प्रचारकांवरही या संप्रदायांच्या आचार-विचारांचा परिणाम झाला. मृत्युंजयस्वामी, आलमखान, चांद बोधले, शेखमहंमद, राघवचैतन्य प्रभृती हिंदु आणि सूफी सत्पुरुषांचे दर्गे या धार्मिक देवघेवीची साक्ष देत आजही खडे आहेत.

यादव कालापासून शिवकालापर्यंतच्या चार शतकांतील संतवाङ्मयात या परिस्थितीचे मोठे बोधप्रद प्रतिबिंब पडलेले दिसून येते. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सूफी सत्पुरुष शहामन्तोजी ब्रह्मणी उर्फ मृत्युंजयस्वामी हा या संक्रमणकाळातील हिंदु-मुस्लिम ऐक्याचे नमुनेदार प्रतीक समजावयाला हरकत नाही. तो बेदरच्या बहामनी राजघराण्यातला असावा, असे दंतकथा सांगते. त्याने साखरकेळी खाऊन आपल्या महालाच्या झरोक्यातून खाली टाकलेल्या साली चोखणाऱ्या भिकाऱ्याच्या स्पष्टोक्तीमुळे त्याला उपरती झाली आणि तत्क्षणी तो महालातून बाहेर पडून पंढरीच्या वाटेला लागला, अशी अद्‌भुत कथा 'भक्त-विजया'त दिलेली आहे. कल्याणी येथील आनंद संप्रदायातले सत्पुरुष सहजानंदस्वामी यांनी त्याला उपदेश देऊन 'ज्ञानसागरानंद' असे नाव ठेवले. त्यामुळे 'ज्ञानसागरानंद पातशहा' म्हणूनही तो प्रसिद्धीस आला. दख्खनी हिंदीत लिहिलेल्या आपल्या 'पंची-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण' या छोटया ग्रंथात त्याने स्वतःविषयी असे म्हटलेले आहे की--

> शाह मुतबजी ब्रह्मणी,
> जिनमें नहीं मनामनी ।
> पंचीकरणका खोज किये,
> हिंदु-मुसलमान येक कर दिये ।।

आपण असे समजतो की, म. गांधी यांनी,--

> ईश्वर अल्ला तेरे नाम,
> सबको सन्मति दे भगवान

या आपल्या प्रार्थनेच्या रूपाने, हिंदु-मुस्लिम ऐक्याचा महामंत्र विसाव्या शतकात या देशाला दिला. पण, त्यांच्यापूर्वीच चारशे वर्षे या 'ज्ञानसागरानंद पातशहा'ने हा मंत्र दक्षिण भारतातील लोकांना दिलेला होता, हे या विधानावरून सिद्ध होते. 'ज्ञानसागरानंद' हा हिन्दु झालेला सूफी; तर एकनाथमहाराजांचे आजेगुरु चांद बोधले उर्फ चांदसाहेब कादरी हे सूफी पंथात गणले गेलेले हिंदु सत्पुरुष! जनार्दनस्वामी आणि शेख-महंमद हे दोघे त्यांचे पट्टशिष्य. आपल्या एका अभंगात शेख महंमदाने या शिष्यपरंपरेचे असे वर्णन केलेले आहे की,--

> धन्य चांद बोधले। त्यांनी जानोपंता बोधलें।
> त्यांच्या शेवें धाले। एको जनार्दन ।।
> केली भागवतटीका। उद्धार विश्व लोकां।
> तेचि दिसे सायेका। स्वामीपाशीं ।।

जनार्दनस्वामींनी आपले गुरु चांदसाहेब यांचा दर्गा दौलताबादच्या किल्ल्याच्या पायथ्याशी बांधला. स्वामींच्या कृपेने एकनाथमहाराजांना जे दत्तदर्शन घडले, तेही हाजी मलंग वेषांत! 'हाजी मलंग' हा मुळी दत्त संप्रदायातील एक मुस्लिम उपपंथच असून, निजाम-हैद्राबाद संस्थानातील श्रीमाणिकप्रभुमहाराज हे त्या पंथांतील अलिकडील सत्पुरुष होत. जनार्दनस्वामींच्या भेटीला बरोबर कुत्री घेऊन आलेल्या फकीर वेषांतील या दत्तात्रेयाने स्वामींना तिचे दूध काढावयाला सांगितले. नंतर मातीच्या एकाच भांड्यात गुरुशिष्यांनी आपला भोजनविधी उरकला; व अशा रीतीने तें दृश्य भयचकित मुद्रेने पाहात असलेल्या विचाऱ्या तरुण एकनाथाला आपल्या अभेदाची प्रतीती आणून दिली. इतकेंच नव्हे, तर त्या खरकट्या भांड्यातले उष्टे पाणी तीर्थप्रसाद म्हणून त्यांनी आपल्या या चेल्यालाही प्राशन करावयाला भाग पाडले. अशा या कथेसंबंधी काही संशोधकांचे अनुमान असे आहे की, हे हाजी मलंग वेषधारी दत्तात्रेय म्हणजे दुसरे कोणी नसून, स्वतः चांदसाहेब कादरीच असावेत. तरी देखील, एकनाथमहाराजांना तत्कालीन महाराष्ट्रात जी जबरदस्त पीरभक्ती बोकाळलेली होती, ती पाहून उबग येत असावा, असे वाटते. कारण, आपल्या 'जोहार' या कवनात त्यांनी असे उद्गार विषादाने काढलेले आहेत की,--

> दावल मलिकाची पूजिती गदा।
> वर्षांतून फकिर होतां एकदां ।।
> मग डोला होतां थंडा, खाती मलिदा।
> हिंदू तुर्कांचें खरकटें कीं ।।

हा दावल मलिक पंधराव्या शतकात सूफी प्रचारक म्हणून गुजरातेत आला. त्याचे मूळचे नाव 'दावल् मुल्कः' 'दावल मलिक' हा त्या नावाचा अपभ्रंश! त्याचा गुरु शाह आलम याच्याकडून त्याला रोगनिवारणाची सिद्धी मिळाली. तिच्या जोरावर त्याने गुजरात आणि महाराष्ट्र या प्रांतातील हजारो हिंदु लोकांना आपल्या नादी लावले. आजही विदर्भ आणि मराठवाडा या दोन्ही भागांत त्याचे शेकडो भक्त असून, 'दावलभक्त' हे आडनाव असलेली ब्राह्मण घराणीही या भागात आहेत. दावल मलकाचे हे प्रस्थ ध्यानात घेऊन पुढे रामदासांनीही असे उद्गार काढलेले आहेत की,—

> कित्येक दावल मलकास जाती।
> कित्येक पीरांस भजती।
> कित्येक तुरुक होती।
> आपुले इच्छेने ।।

एकनाथ आणि रामदास यांनी एक शतकाच्या अंतराने काढलेल्या या उद्गारांवरून, महाराष्ट्रात तुर्काण झाल्यामुळे हिंदु धर्माला कशी ग्लानी आलेली होती, याची कल्पना येईल.

अशा या धर्मग्लानीच्या काळातही अनेक थोर संतकवी उदयाला आले आणि त्यांनी उदंड आध्यात्मिक वाङ्मय उत्पन्न केले, ही गोष्ट खरी. पण, आपल्या देशावर पडलेले पारतंत्र्याचे भीषण सावट दूर करण्याच्या बाबतीत त्या वाङ्मयाचा म्हणण्यासारखा उपयोग झाला नाही. आमच्या संत कवींनी मराठी भाषा जग-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वली; मराठी वाङ्मय वाढवले; व हिंदु धर्मातल्या सगळ्या जुन्या विषमतेच्या आणि विकृतींच्या कर्मकांडात नव्या विषमतेची आणि विकृतींची भर घालून तो कसाबसा जिवंत ठेवला, ही त्यांची कामगिरी प्रशंसनीय आहे, हे निर्विवाद. तथापि, पारतंत्र्यामुळे निःसत्व आणि निःस्त्राण होऊन गेलेल्या हतवुद्ध लोकसमाजात या संत कवींच्या अफाट वाङ्मयाने नवी विचारस्फूर्ती आणि नवी जीवनमूल्यें निर्माण करू नयेत, हे केवढे आश्चर्य? राष्ट्र आपण बाजूला ठेऊ. तथापि धर्म आणि संस्कृती यांच्या रक्षणाची तरी प्रेरणा या वाङ्मयाने समाजाला द्यावयाला हवी होती की नाही? पण, तीसुद्धा दिली नाही, एवढे मात्र खरे. म्हणूनच, असा प्रश्न उपस्थित होतो की, आपल्या दिङमूढ समाजाच्या ठिकाणी पराक्रमाने, प्रतिष्ठेने आणि प्रभुत्वाने जगण्याची जिद्द चेतवावयाला हे वाङमय असमर्थ का ठरले? हजारो मैलांवरून आलेले उपरे मोजके आततायी विदेशी आणि विधर्मी लोक आपल्या देशातल्या लाखो लोकांवर वाटेल ते अत्याचार करीत आहेत आणि त्या अत्याचारांना प्रतिकार करण्याऐवजी उलट त्यांची जुलमी राजसत्ता दृढमूल करण्यासाठी आपले लोक इमानाने झटत आहेत, हे लाजिरवाणे दृश्य या संतांना प्रत्यक्ष दिसत होते. ते पाहून त्यांचे डोके का भणाणले नाही आणि रक्त का सळसळले नाही? त्यांना स्वतःला चीड का आली नाही आणि लोकांच्या ठिकाणी त्यांनी चेव का उत्पन्न केला नाही? त्यांची जीवनमूल्ये तरी अशी कोणती होती की, ज्या मूल्यांमुळे ते स्वतः अशा रीतीने नाकर्ते होऊन बसले आणि लोकांनाही त्यांनी नाकर्ते राहू दिले! हिंदु धर्म हा निवृत्तिप्रधान आहे, हे या प्रश्नाचे उत्तर नक्कीच नाही. कारण, जगातल्या सगळ्याच धर्मांनी, देवाला अनन्य भावाने शरण जाण्यासाठी, संसार सोडण्याचा उपदेश आपल्या अनुयायांना केलेला आहे. तेव्हा नुसती निवृत्तिपरता हे या नैष्कर्म्याचे कारण खचितच नाही. मग कारण कोणते? ख्रिस्ती धर्म हा, हिंदु धर्माइतकाच, दिसावयाला सोज्वळ, सात्विक आणि निवृत्तिप्रधान आहे. पण, तो निवृत्तीचा उपदेश करीत असला, तरी त्याबरोबरच प्रभुत्वाने जीवन कंठण्याची प्रेरणा आपल्या अनुयायांना देणारे अनेक आदेश त्या धर्मात आहेत. परमेश्वराने निर्माण केलेल्या प्राणिमात्रात मनुष्य हा केवळ त्याची प्रतिमा असून, तोच या भौतिक सृष्टीचा आणि तिच्यातील सर्व जीवजाताचा प्रभु आणि भोक्ता आहे, असे त्या धर्मातील पायाभूत प्रमेय आहे. त्यामुळे, सृष्टीकडे पाहाण्याची त्याच्या अनुयायांची प्रवृत्ती पूजकाची नसून, आक्रमकाची आणि उपभोक्त्याची आहे. अर्थात् हिंदु धर्माप्रमाणे आंधळ्या अहिंसेला आणि भाबड्या भूतदयेला त्या धर्मात थारा नाही. त्याचप्रमाणे, आपला प्रसार जगभर करण्याची आज्ञाही त्या धर्माने आपल्या अनुयायांना केलेली आहे. इतकेच नव्हे, तर जगातल्या हीन-दीनांना, अनाथ-अपंगांना आणि दलित-पतितांना मायेने जवळ घेऊन, त्यांची सेवा करण्यातच देवाची खरी सेवा आहे,—मानवसेवेत जीवन व्यतीत करण्यातच मनुष्यजन्माचे सार्थक आहे,-असाही आदेश त्या धर्माने दिलेला आहे. अशा रीतीने, ख्रिस्ती धर्म निवृत्तिप्रधान असून देखील, भौतिक सृष्टीवर आपले स्वामित्व स्थापन करण्याची, सगळ्या जगभर आपला प्रसार करण्याची आणि सर्व धर्मातील हीन-दीनांच्या सेवेत आयुष्य घालवण्याची विलक्षण ईर्ष्या त्या धर्माने आपल्या अनुयायांच्या ठिकाणी उत्पन्न केलेली आहे. तिचे परिणाम आज आपण पहातो आहोत आणि काही प्रमाणात भागतोही आहोत.

सारांश, ख्रिस्ती धर्म हा निवृत्तिप्रधान असूनही, अशा रीतीने लोकाभिमुख आणि जगज्जिगीषुही आहे. हिंदु धर्मात ही लोकाभिमुखता आणि जगज्जिगीषा विसाव्या शतकापर्यंत तरी अजिबात नव्हती. समता, बंधुभाव, मानवसेवा, स्वधर्मातील उच्च तत्त्वांचे ज्ञान सर्व जगाला मुक्त मनाने देण्याची तयारी आणि भौतिक सृष्टीवर प्रभुत्व मिळविण्याची आकांक्षा यातले काहीही हिंदु धर्मात नव्हते. सर्व जग आपल्या छत्राखाली आणण्याचा प्रश्न तर दूरच राहिला. पण, जे कोटयवधि अस्पृश्य आणि आदिवासी, हिंदु धर्माची कृपादृष्टी आपल्यावर पडावी, म्हणून चातुर्वर्ण्याच्या शिवेवर शतकानुशतके तळमळत उभे होते, त्यांच्याहीकडे त्या धर्माने कधी ढुंकून पाहिले नाही. उलट, चातुर्वर्ण्यातल्याच स्त्री-शूद्रांना वेदाधिकार नाकारून त्याने मोक्षाचे द्वार बंद केले; व समुद्रपर्यटन आणि परदेशगमन निषिद्ध ठरवून देशाच्या प्रगतीचा आणि आरमारी संरक्षणाचाही मार्ग कुंठित केला. चातुर्वर्ण्याचा विपर्यास आणि विकृती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जातिभेदात झाल्यामुळे आपल्या समाजाचे हजारो तुकडे पडलेले हिंदु धर्माच्या ज्ञात्यांना आणि नेत्यांना शकारंभीच दिसलेले होते. तरीसुद्धा, तेराव्या शतकात अखिल भारतामध्ये तुर्काण झाल्यानंतरही, हिंदु राज्य-कर्त्यांना, गुरुसद्यांना, पंडितांना, सत्पुरुषांना आणि कवींना आपल्या धर्माची आणि समाजाची पुनर्घटना करण्याची, अस्पृश्य आणि आदिवासी यांना माणुसकीचे हक्क देऊन आपल्यात समाविष्ट करून घेण्याची व भूमार्गाने आणि जलमार्गाने सतत येत असलेल्या आक्र-मकांना प्रतिकार करण्यासाठी नव्या भौतिक विज्ञानाचा शोध आणि लाभ घेण्याची बुद्धी काही झाली नाही. किंवहुना, स्वतःचे राज्य म्हणा किंवा राष्ट्र म्हणा यांच्या-संबंधीची स्वत्वाची जी काय उत्कट भावना कदाचित् यादवकालात वरिष्ठ जातींमध्ये तरी थोडी वहुत असेल, ती तुर्काण झाल्यावर कलियुगाच्या प्रभावाच्या भीतीने नष्टप्राय करून टाकली असावी. नवव्या शतकात भारतीय प्रतिभा जी एकदा वेदांताच्या निविडाटवीत शिरली, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या प्रमेयाचे विवरण प्रस्थानत्रयीच्या आधाराने कर-ण्याचा जो ध्यास तिने घेतला आणि आत्मज्ञानापुढे भौतिक विज्ञान तुच्छ मानण्याची जी भूमिका तिने स्वीकारली, ती नंतर वेदान्ताच्या निबिडाटवीतून आणि प्रस्थानत्रयीच्या कोंडीतून पुढे हजार वर्षे मुळी वाहेर पडलीच नाही. शंकराचार्य आणि माधवाचार्य, चक्रधर आणि रामानंद, ज्ञानेश्वर आणि एकनाथ, चैतन्यप्रभु आणि तुलसीदास, दासोपंत आणि मुक्तेश्वर, तुकाराम आणि रामदास, वामनपंडित आणि मोरोपंत हे सगळे भारतातील आणि महाराष्ट्रातील तत्त्ववेत्ते, सत्पुरुष आणि कवी प्रस्थानत्रयीच्या आणि रामायण–भारताच्या कोंडीतच प्रदक्षिणा घालताना दृष्टीस पडतात. एक हजार वर्षांच्या या काळात यूरोपमध्ये चवदाव्या शतकात रेनासन्स आणि सोळाव्या शतकात रेफर्मेशन या दोन प्रचंड चळवळी झाल्या. रेनासन्सच्या चळवळीने, यूरोपातील सुशिक्षितांची प्रतिभा ख्रिस्ती धर्मावरील अंधश्रद्धेतून मुक्त करून, वैचारिक आणि वैज्ञानिक प्रगतीचे ध्येय तिच्यापुढे ठेवले; व रेफर्मेशनच्या चळवळीने, यूरोपातील जनतेला पोपशाहीच्या जुलमातून सोडवून, धार्मिक आणि बौद्धिक स्वातंत्र्याची दृष्टी दिली. कोपर्निकस आणि गॅलिलिओ व बेकन आणि डेकार्ट यांच्यासारख्या शास्त्रज्ञांनी आपल्या शोधांनी आणि प्रमेयांनी भौतिक सृष्टीवर तावा मिळविण्याची मनीषा युरोपात उत्पन्न केली. ही मनीषा सफल करण्यासाठी कोलंबस, वास्को द गामा आणि फ्रान्सिस ड्रेक या धाडसी नाविकांनी, सगळ्या भूगोलाला पालाण घालून, नव्या प्रदेशांचा आणि खंडांचा शोध लावला; व यूरोपच्या दिग्विजयाचे ध्वज आशिया, आफ्रिका आणि अमेरिका या तिन्ही खंडांत रोवले. ही क्रांति यूरोपात चालू असताना ज्ञाने-श्वरांपासून वामनपंडितांपर्यंत आमचे सगळे मेधावी, प्रस्थानत्रयीच्या अनुषंगाने, पिंड–ब्रम्हांडाची, द्वैता-द्वैताची आणि सगुणनिर्गुणाची विवक्षा करण्यात गर्क होते. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात रूसो, थॉमस पेन आणि कार्ल मार्क्स या पाश्चात्य तत्त्ववेत्यांनी, मानवाचे मूलभूत हक्क, अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करून, आर्थिक आणि राजकीय क्रांतीचा आदेश शोषित आणि पीडित जनतेला दिला. त्यामुळे फ्रान्स, अमेरिका आणि रशिया या देशांत क्रांतीची उठावणी झाली. हे आर्थिक आणि राजकीय परिवर्तन ज्या वेळी यूरोपात आणि अमेरिकेत चालू होते, त्या वेळी आमचे पंडित, सत्पुरुष आणि कवी ब्रह्मजिज्ञासा करण्यात आणि अष्टोत्तरशत रामायणे रचण्यात गर्क होते. चौदाव्या शतकापासून तो एकोणिसाव्या शतका-पर्यंत पाश्चात्य देशात या ज्या विलक्षण उलाढाली घडून आल्या, त्यांची गंधवार्ताही आमच्या समाजातील या ज्ञात्यांना आणि नेत्यांना लागली नाही.

कारण, या सगळ्या भारतीय ज्ञात्यांची, नेत्यांची आणि संतांची जीवनमूल्ये पारमार्थिक आणि पार-लौकिक होती. त्यांची मूल्ये खरीखुरी आध्यात्मिक जरी असती, तरी देखील त्यांनी भारतीय पारतंत्र्याच्या त्या तमोयुगात मानवी आत्म्याला, सगळ्या जीर्ण आणि क्षुद्र श्रद्धांच्या तावडीतून सोडविण्यासाठी, प्रज्ञा आणि प्रतिभा या ज्या त्या आत्म्याच्या दोन प्रभावी शक्ती त्यांचा अनिर्वंध विकास घडवून आणण्यासाठी व मुक्त आणि पूर्ण मानव निर्माण करण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले असते. पण, तसे प्रयत्न करण्याची बुद्धी त्यांना झाली नाही, याचा अर्थच हा की, ते कालविमुख आणि समाजविमुख होते. त्यामुळे, प्रस्थानत्रयीच्या कोंडीतून आणि चातुर्वर्ण्याच्या चौकटीतून बाहेर पडण्याची इच्छाच मुळी त्यांना झाली नाही. स्त्री–शूद्रांना वेदा-धिकार नाकारून चातुर्वर्ण्याने केलेला अमानुष अन्याय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि अघोर सामाजिक हानी यांची त्यांना पूर्ण जाणीव होती. कारण, श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारख्या मृदुप्रकृती सत्पुरुषाने देखील वेदांच्या या कृपणतेबद्दल असे उद्गार काढलेले आहेत की,—

> वेद संपन्न होय ठाईं । परि कृपण ऐसा आन नाहीं ।
> जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचो ॥
> येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादि प्राणियां ।
> अनवसर मांडूनियां । राहिला आहे ॥
> म्हणोनि कुळ जाति वर्ण । हे आघवेचि अकारण
> एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥

पण, म्हणून काही ज्ञानोबारायांपासून तुकोबारायांपर्यंत ज्या सत्पुरुषांनी चातुर्वर्ण्याची छळणूक आणि नाडणूक स्वतः प्रत्यक्ष अनुभवलेली होती, त्यांनी सुद्धा त्याच्या विरुद्ध बंड पुकारले नाही. फार काय सांगावे ? टिळक आणि गांधी यांच्यासारख्या ब्रिटिश साम्राज्यशाहीशी निकराने झुंज देणाऱ्या विसाव्या शतकातील राष्ट्रनेत्यांना देखील प्रस्थानत्रयीची कोंडी आणि चातुर्वर्ण्याची चौकट फोडून बाहेर पडता आले नाही. नाही म्हणावयाला, महानुभाव पंथाचे एक प्रवर्तक श्रीगोविंदप्रभु आणि वैष्णव पंथाचे एक प्रवर्तक श्रीरामानंदाचार्य यांनी मात्र, आपल्या स्वतःच्या आचरणाने, तेराव्या आणि चौदाव्या शतकात, चातुर्वर्ण्याची कोंडी फोडण्याचा प्रयत्न मोठ्या धैर्याने केला. गोविंदप्रभु उर्फ गुंडमराउळ हे कण्व शाखेचे ब्राह्मण,—"काणवा ब्राह्मणांचा घरी अवतारू स्वीकरीला :" ते महार-मांगांच्या वस्तीत जाऊन वेळाशक त्यांच्या हातचे अन्नपाणी ग्रहण करीत असत. या भ्रष्टाकाराबद्दल ऋद्धिपूरच्या महाजनांनी त्यांच्यावर बहिष्कार घातला. 'ऋद्धिपूरलीळा' या त्यांच्या चरित्रात या प्रसंगाचे असे वर्णन केलेले आहे की, "माहाजनीं म्हणीतलें : राउळ मातांगां माहाराचा घरोंघरीं वीचरताति : आणि तैसेंचि दीक्षीतां ब्राह्मणांचां घरीं वीचरताति : ऐसें राउळीं भ्रष्टाभ्रष्ट केलें : तयांचीं घरें गांवाबाहीरि घाला : मग तेथ राउळ न वचेति : म्हणौनि गांवांबाहीर घरें बांधवीलीं : तो माहारवाडा मोडीला : तवं गोसांवी तेथही बीजें करीति :" पुढे श्रीगोविंदप्रभूंनी मांग वस्तीत जाऊन त्यांना विहीरही बांधून दिली. 'ऋद्धिपूरलीळे'त याही प्रसंगाचे असे वर्णन केलेले आहे की, "एकुदी मातांगी वीनवीलें : राउळो । आम्हीं पाणियें वीन मरते असो : तरि काइ करूं जी ?" राउळासि अनूकुंपा उपजली : मग गोसांवी म्हणीतले, "मेला जाए नां म्हणे :" म्हणौनि तेथ बीजें केले : आवो येथ खाणावे म्हणे : न खाणावें म्हणे : आवो येथ खाणावेंचि म्हणे : म्हणौनि श्रीचरणीचेनि आंगठेनि दाखवीलें : तेथ तीहीं खाणितलें : तवं अमर्याद पाणीं लागलें : मग म्हणेति : "राउळ माय : राउळ बापु : राउळचेनि प्रसादें आम्ही पाणी पीत असों :" श्रीगोविंदप्रभूंच्या अस्पृश्य जातींविषयीच्या या विलक्षण कळवळ्यामुळेच बहुधा महानुभाव पंथाचा प्रसार विदर्भातील त्या जातींत इतका झालेला असावा. त्यांच्याप्रमाणे रामानंदाचार्यांचीही "जातिपाँति पूछै नहि कोई। हरिको भजै सो हरिका होई।।" अशी वृत्ती होती; व त्यांच्या पंथात रैदासासारख्या अस्पृश्यांप्रमाणेच कबीरासारखे मुसलमानही होते. वारकरी पंथाच्या संतमंडळीत श्रीएकनाथमहाराज हेच काय ते असे निघाले की, ज्यांनी अस्पृश्यांना जसें श्राद्धान्न वाढले, तसेच स्वतः महारवाड्यात जाऊन त्यांच्या हातचे जेवणही घेतले. आपल्या समाजजीवनाच्या बाबतीत एकनाथांची जी ही इतर संतांहून निराळी दृष्टी होती, ती त्यांच्या भारुडातील कवनांतूनही व्यक्त झालेली आहे. नामदेव आणि तुकाराम यांच्या अभंगांतून तर जातिभेदाविषयीची चीड प्रखरतेने प्रकट झाल्याचे दिसून येते. उच्च जातींतील या संतांप्रमाणेच चोखामेळा, कान्होपात्रा, रैदास यांच्यासारख्या 'यातिहीन' संतांनीही आपली जी गांजणूक जन्मभर झाली, तिच्याविषयीचा तळतळाट आपल्या अभंगांत अगदी उत्कटतेने बोलून दाखविला आहे. तरीसुद्धा ज्ञानोबारायांपासून तो चोखोबारायांपर्यंत स्त्रीशूद्रांना वेदाधिकार नाकारल्याची खंत मनात बाळगणारे हे संत काही चातुर्वर्ण्याच्या कोंडीतून बाहेर पडावयाला धजले नाहीत. म्हणूनच, न्या. रानडे यांनी, आपल्या 'राइज ऑफ दि मराठा पॉवर' या ग्रंथांत, मार्टिन लूथर प्रभृति पाश्चात्य धर्मसुधारकांशी केलेली त्यांची तुलना निरर्थक वाटते.

चातुर्वर्ण्य आणि जातिभेद यांच्याविरुद्ध जर उघड उघड कोणी बंड पुकारले असेल, तर तें चक्रधर, बसवराज, कबीर, नानक प्रभृति धर्मपुरुषांनी ! तथापि, त्यांनी स्थापन केलेल्या या नवीन पंथांची जी दशा नंतर झाली, ती हिंदु धर्माच्या विचित्र वैशिष्ट्यावर मोठा बोधप्रद प्रकाश पाडते. या पंथांपैकी महानुभाव,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिंगायत इत्यादी काही पंथ वेदप्रामाण्य मानणारे नसले, तरी ते निखालस हिंदु आहेत. त्यांनी चातुर्वर्ण्य आणि तज्जन्य जातिभेद हे दोन्ही त्याज्य ठरवले. पण दैवते आणि आचारपद्धती ही मात्र बव्हंशी हिंदु धर्मातलीच घेतली. नानक, कबीर इत्यादी धर्मपुरुषांनी काढलेल्या पंथांत मात्र हिंदु आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांतील प्रमेयांची आणि आचारांची सरमिसळ बरीच झालेली आहे. तथापि, तेही पंथ हिंदुत्वाला अधिक जवळ आहेत, असेच म्हणावे लागेल. पण, गंमत अशी की, या सर्व धर्मपुरुषांनी काढलेल्या पंथांचा निषेध जरी सनातनी वैदिक हिंदूंनी 'पाखंड' या निंदाव्यंजक शब्दाने केला, तरी कालांतराने हे पंथ आपल्यातीलच नवीन जाती म्हणून जातिघटित हिंदु समाजाने आपल्या मायपोटात सामावून घेतले. याचे मुख्य कारण असे की, यांपैकी एकाही धर्मपुरुषाच्या डोळ्यांपुढे चातुर्वर्ण्य आणि जातिभेद यांनी छिन्नविछिन्न आणि हतप्रभ होऊन गेलेल्या अखिल भारतीय समाजात एकात्मता आणि राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्याचे विशाल ध्येय नव्हते. त्यांनी फक्त बहुजनसमाजाला आपल्या पठन–पाठनाचा अधिकार नाकारणाऱ्या कृपण वेदांचे प्रामाण्य आणि चातुर्वर्ण्य झुगारून दिले, एवढेच ! त्यामुळे हे सगळे नवीन पंथ हळुहळू हिंदु समाजातील नवीन जाती म्हणून त्यात विलीन होऊन गेले. वैदिक कालात भारतीय समाज हा एकवर्ण, एकदेव आणि एकसंध असून एकराट्ही होता; व म्हणून, प्राचीन काळी भरतखंडात एकराष्ट्रीयत्वाची भावना होती, असे प्रतिपादन राधाकुमुद मुखर्जी, सातवळेकर, बाळशास्त्री हरदास प्रभृती अनेक पंडितांनी केलेले आहे. गणेशोत्सवातील मंत्रपुष्पातला 'एकराडिति' हा मंत्रघोष ऐकताना त्या प्रतिपादनात तथ्य असावे, असा भास होतो. पण, हे एकवर्णत्व, एकदेवत्व, एकसमाजत्व आणि एकराष्ट्रत्व कृतयुगात काय असेल, तेवढेच. सध्या चालू असलेल्या या कलियुगात, "कलावाद्यन्तयोः स्थितिः" या उपटसुंभ सूत्राच्या आधाराने, हिंदु धर्माने कोटयवधी स्त्री–शूद्रांना, अस्पृश्यांना आणि आदिवासींना वेदाधिकारच मुळी नाकारलेला असल्यामुळे, वैदिक काळातले हे एकराष्ट्रीयत्व वेदातच राहिले; व रोजच्या व्यवहारात मात्र हिंदु समाजाचे राईराई एवढे तुकडे करणाऱ्या जातिभेदाचा पगडा कायम होऊन गेला. त्याचा परिणाम अखेर असा झाला की, धर्म, संस्कृति किंवा राष्ट्र यांच्यापेक्षा जात हेंच हिंदु समाजाचें अनन्य वैशिष्टय आणि लक्षण, प्रत्येक हिंदु माणसाचे रक्षणीय सर्वस्व आणि स्वार्थसाधन होऊन बसले. असे अजब वैशिष्टय आणि लक्षण की, जे धर्मांतर केल्यावरहि नष्ट होऊ शकत नाही ! जणु कर्णाचे जन्मजात अक्षय कवचच !!

अर्थात् गेल्या हजार वर्षांत चातुर्वर्ण्य आणि जातिभेद मोडण्यासाठी हे जे निकराचे प्रयत्न झाले, ते सगळे विफल ठरून हिंदु समाज होता तसाच एकोणिसाव्या शतकापर्यंत विघटित आणि विस्कळित राहिला. कारण, हे प्रयत्न करणाऱ्या सगळ्या धर्मपुरुषांच्या आणि संतांच्या डोळ्यांपुढे नाना वर्ण, नाना वंश, नाना जाती, नाना पंथ, नाना भाषा इत्यादी भेदभावांनी छिन्नभिन्न होऊन गेलेल्या भारतीय समाजात एकसंधत्व, एकराज्यत्व आणि एकराष्ट्रीयत्व यांची भावना निर्माण करण्याचे ध्येयच मुळी नव्हते. त्या ध्येयाचा,–अपूर्ण असा का होईना,– स्फूर्तिदायक ध्वनि फक्त एकाच संताच्या वाङ्मयात दुमदुमला. तो एकमेव संत म्हणजे श्रीसमर्थ रामदास. १४४८ साली केशवचार्यांने साष्टी बेटात नायकोराबाच्या नेतृत्वाखाली भरवलेल्या मेळाव्यात जो 'महाराष्ट्रधर्म' उपदेशिलेला होता, तो फक्त जातिधर्म आणि कुळधर्म यांच्या आचरणापुरताच मर्यादित होता. समाजधर्म आणि राष्ट्रधर्म यांची अगदी पुसट कल्पना देखील त्या दोघांना नव्हती. त्याचप्रमाणे, आपल्या मांडीवरचा फोड श्रीनृसिंहसरस्वतींच्या दर्शनाने नाहीसा झाल्यामुळे, त्यांच्या चरणी लागलेल्या बेदरच्या बहामनी सुलतानाच्या—

> **ऐसा हा राव असता । महाराष्ट्रधर्मी वर्तता**
> **आपुला द्वेष तत्वता । न करील की जाण पा**

या गुरुचरित्रांतील वर्णनात आलेला 'महाराष्ट्रधर्म' हा शब्दही वर्णाश्रमधर्म या अर्थानेच वापरलेला आहे. शिवपूर्वकालीन वाङ्मयातील 'महाराष्ट्र' या शब्दाला जसा काही विशिष्ट राजकीय अर्थ नव्हता, तसाच महाराष्ट्रधर्म या शब्दालाही ! तथापि, श्रीसमर्थांनी जो 'महाराष्ट्रधर्मा'चा उपदेश शिवकालीन लोकसमाजाला केला, त्यात 'मराठा तितुका मेळवावा' हे सूत्र प्रधान होते; व त्या सूत्राची पूर्तता "महाराष्ट्रधर्म वाढवावा" या आदेशाने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केलेली होती. गेल्या हजार वर्षांत महाराष्ट्रामध्ये होऊन गेलेल्या ज्ञात्यांत, नेत्यांत, राज्यकर्त्यांत आणि सत्पुरुषांत पारतंत्र्याची चीड आणि देशस्थितीचे आकलन असलेला समर्थांच्या इतका व्यवहारी, जागरूक आणि सावध असा देशाभिमानी संत एकही आढळत नाही. "महाराष्ट्रीं असावे," या चक्रधरांच्या आणि "महाराष्ट्र जें सर्व राज्यासि राजे। जयाच्या भये व्यापिले सर्व राजे" या मुक्तेश्वरांच्या उद्गारांत महाराष्ट्राविषयीचा अभिमान आपल्या निदर्शनास येतो. तथापी, या अभिमानात महाराष्ट्राच्या राष्ट्रत्वाची जाणीव अजिवात नाही; हे वैगुण्य जरी सोडून दिले, तरी त्याच्या राज्यत्वाविषयीदेखील या दोघा मेधावींची कल्पना कितपत स्पष्ट होती, याबद्दल शंका वाटते. तसे समर्थांविषयी म्हणता येणार नाही. शिवाजीमहाराजांसंबंधी त्यांनी काढलेले धन्योद्गार, संभाजीमहाराजांची त्यांनी केलेली कानउघाडणी, 'आनंदवनभुवना'चा त्यांनी गायिलेला महिमा आणि 'तुझा तू वाढवी राजा' यासारखी त्यांनी केलेली तुळजामातेची आळवणी यांवरून असे दिसते की, महाराष्ट्राचे व्यक्तित्व, राष्ट्रत्व आणि राज्यत्व हे त्यांच्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत उभे होते. अर्थात् त्या काळातील इतर सगळ्या राजकारणी आणि धर्मकारणी नेत्यांप्रमाणे त्यांचीही चातुर्वर्ण्यावर श्रद्धा होती. त्यामुळे, महाराष्ट्राचे व्यक्तित्व, राज्यत्व आणि राष्ट्रत्व यांसंबंधीची त्यांची कल्पनाही त्या प्रमाणात अपूर्ण होती, हे सांगावयाला नको. खुद्द श्रीशिवाजीमहाराजांच्या बावतीत सुद्धा असेच म्हणावे लागेल. तो पुण्यश्लोक राष्ट्रनिर्माता देखील, त्या काळातल्या सगळ्या धार्मिक समजुतींनुसार, सनातनीच होता. तथापि, गेल्या हजार वर्षांच्या भारताच्या इतिहासात राज्य आणि राष्ट्र व धर्म आणि संस्कृती यांच्या अभिमानाने उद्दीपित आणि उद्युक्त झालेले श्रीशिवाजीमहाराज आणि श्रीसमर्थ हे फक्त दोनच महापुरुष आपल्या दृष्टीस पडतात. राणा प्रतापसिंह आणि गुरु गोविंदसिंह यांनी, जिवावर उदार होऊन, मोगलांशी सामना दिला, हे निःसंशय. व महाराजा रणजितसिंह यांनी तर, शीख समाजाचे एकीकरण करून, पंजाबात स्वतंत्र राज्यहि स्थापन केले. पण, त्या तिघांची स्फूर्ती आणि निष्ठा ही कुलधर्म, जातिधर्म, पंथ आणि राज्य. यांच्यापुरतीच मर्यादित होती. राष्ट्रत्वाच्या भव्य आणि विशाल ध्येयाचे आकलन काही त्यांना झालेले नव्हते. त्या दृष्टीने 'हिंदवी स्वराज्या'च्या स्थापनेचा ध्यास घेणारे श्रीशिवाजीमहाराज आणि 'हिंदुस्थान बळावले' म्हणून घोषणा करणारे श्रीसमर्थ रामदास हे दोन महापुरुष भारताच्या इतिहासात अद्वितीय ठरतात.

जितके अद्वितीय, तितकेच अपवादात्मकही! त्यांच्यासारखे थोड्या बहुत राष्ट्रीय दृष्टीचे आणि व्यापक बुद्धीचे तीन चार दूरदर्शी महापुरुष जर नंतरच्या काळात निर्माण झाले असते, तरी सुद्धा भरतखंडाचा सगळा पुढला इतिहास बदलून गेला असता. पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज हे भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर धर्मोपदेशक, व्यापारी आणि आक्रमक अशा तिन्ही नात्यांनी संचार करीत होते, हे आमच्या छत्रपतींना आणि पेशव्यांना, बादशहांना आणि नवाबांना, मुत्सद्यांना आणि योद्धयांना, पंडितांना आणि सत्पुरुषांना दिसत होते. मुंबई, कलकत्ता आणि मद्रास यांच्यासारखी भारताच्या दोन्ही किनाऱ्यांवरली जी छोटी बंदरे या सगळ्या सत्ताधाऱ्यांच्या नजरेत कधी भरली नाहीत, त्या बंदरात इंग्रजांच्या सत्तेची केंद्रे झपाट्याने फोफावत आहेत, हेही मराठे, रजपूत, शीख आणि मुस्लिम हे पाहात होते. पण, त्या जलचरांचा हा विलक्षण वेगवान् आक्रम कोणत्या भौतिक शक्तींच्या आणि ऐहिक जीवनमूल्यांच्या जोरावर चाललेला आहे, हे जाणून घेण्याची बुद्धी कोणालाच झाली नाही. वाङ्मयाचे निर्माते मोक्षमूल्यांच्या आणि राज्यांचे धुरीण सत्तामूल्यांच्या मागे लागलेले होते. राष्ट्र ही वस्तु त्यांच्या ध्यानीमनीही नव्हती. पंडित मंडळी ही उपनिषदे, गीता आणि ब्रह्मसूत्रे या संस्कृत प्रस्थानत्रयीच्या व बहुजनसमाज हा ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामाची गाथा या मराठी प्रस्थानत्रयीच्या चर्वितचर्वणात गर्क होता. पंडित द्वारकाप्रसाद मिश्र हे एकदा गमतीने म्हणाले होते की, "आमच्या महाकोसलमध्ये अजूनही 'सियावर रामचंद्र की जय' याचेच राज्य चालू आहे. रामलीला आणि कृष्णलीला यांतून काही आमचे लोक अद्याप बाहेर पडलेले नाहीत. ते तुलसीदासाच्या 'रामचरितमानसा'तच गटंगळ्या खात आहेत!" अशा स्थितीत, बिचारे राष्ट्र आणि राज्य कोणाच्याही ध्यानीमनी नसले, तर त्यात काय आश्चर्य? पंडित आणि संत वेदांतात आणि हरि-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भजनात गढलेले होते; व राजे आणि मुत्सद्दी आपापली छोटी मोठी राज्ये आणि जहागिरी सांभाळण्यात गुंतलेले होते. त्यामुळे, पोर्तुगीजांपासून इंग्रजांपर्यंत प्रत्येक नव्या आक्रमकाने, त्यांच्याशी वेगवेगळे करार-मदार करून, त्यांना हळूहळू आपल्या आर्थिक आणि राजकीय वर्चस्वाखाली आणले, अशा रीतीने, चातुर्वर्ण्य आणि जातिभेद यांनी छिन्नभिन्न केलेल्या व 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' आणि 'सियावर रामचंद्र की जय' यांच्या चाकोरीत रखडत असलेल्या भारतीयांचा अखेर पाडाव होऊन, सगळा देश इंग्रजांसारख्या भौतिक शास्त्रांच्या जोरावर बलाढ्य होऊन बसलेल्या कूटनीतिज्ञांच्या ताब्यात गेला.

तरी देखील विसावे शतक उजाडेपर्यंत आमचे डोळे काही उघडले नाहीत. किंबहुना, दोन जागतिक महायुद्धे होऊन गेली आणि भौतिक शक्तींच्या जोरावर भूलोकाप्रमाणे अंतराळावरही पाश्चात्यांनी आक्रमण केले, तरी सुद्धा आम्ही सावध झालो नाही. सत्य आणि अहिंसा, चरखा आणि खादी, रामराज्य आणि सर्वोदय यांच्या चाकोरीतच आम्ही आजही रखडतो आहोत. आजही जातपात आणि धर्मपंथ यांनी सगळे राजकारण आणि राज्यकारभार नासून टाकलेला आहे. अजूनही भारताला सार्वभौम राज्य आणि राष्ट्र म्हणून स्वतःचे व्यक्तित्व आणि अस्मिता यांचा साक्षात्कार झालेला आहे, असे वाटत नाही. मोक्षमूल्ये आणि सत्तामूल्ये यांच्या कचाटयातून बाहेर पडून निखालस ऐहिक, भौतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचा जोपर्यंत आपण अवलंब करीत नाही, तोपर्यंत भारताला एकसंध सार्वभौम व्यक्तित्व आणि राष्ट्रत्व प्राप्त होणे अशक्य आहे. जी स्थिती भारताची, तीच महाराष्ट्राचीही !

मित्र हो, ही नवी मूल्ये जनतेपुढे ठेवण्याची जबाबदारी समाजाच्या विचाराग्रणींवर आहे. म्हणूनच पारमार्थिक आणि पारलौकिक जीवनमूल्यांमुळे गेल्या हजार वर्षात झालेल्या या देशाच्या अवनतीचा आढावा घेण्यात मी इतका वेळ खर्च केला. साहित्यिक म्हणजे समाजाची प्रज्ञा आणि प्रतिभा ! श्रीसमर्थांनी म्हटलेच आहे की, "कर्तृत्व जितुके झाले । शारदागुणें ॥" आपल्या सर्वांच्या हृदयांत असलेली ती शारदा जोपर्यंत कालसंमुख आणि लोकसंमुख होत नाही, वैषम्य आणि नैष्कर्म्य उत्पन्न करणाऱ्या जुनाट पारलौकिक आणि पारमार्थिक जीवनमूल्यांची कोंडी फोडून बाहेर पडत नाही व सार्वभौम राष्ट्रत्व आणि राज्यत्व यांची उत्कट जाणीव लोकांत निर्माण करीत नाही, तोपर्यंत या देशाला आपल्या व्यक्तित्वाचा आणि अस्मितेचा साक्षात्कार होणे अशक्य आहे. तो साक्षात्कार होण्यासाठी अवश्य असलेले वाङ्मयतप करण्याची स्फूर्ती हे शारदेचे व्यासपीठ देशातील सर्व विचाराग्रणींना देवो, एवढीच शेवटी प्रार्थना !

———

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्रातील संगीत परंपरा

—डॉ. श्री. रं. कुळकर्णी

(उत्तरार्ध)

मराठी टीकेच्या स्वरूपाचे विवेचन करण्यापूर्वी दामोदर पंडितांविषयी थोडी माहिती देणे आवश्यक वाटते. 'संगीतदर्पण' या संस्कृत ग्रंथाचा कर्ता लक्ष्मीधरसुत चतुर दामोदरपंडित इ. स. १६२५च्या सुमारास होऊन गेला असे कै. भातखंडे यांनी नमूद केले आहे.[१] 'अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापूर्वी या ग्रंथाचा फारशी भाषेत अनुवाद झाला होता. भावभट्टाच्या 'अनुपमविलास' या संगीतविषयक ग्रंथात (इ. स. १६७४–१७०९) आणि 'तोफेतुल्हिंद' या मिर्झाखानाच्या फारशी ग्रंथात संगीतदर्पणाचे आधार देण्यात आले आहेत. बंगाल प्रांतात दामोदर पंडितवरीच मान्यता पावला होता असे कै. भातखंडे सांगतात.[२] १५ ते १८ या शतकातील महत्त्वाच्या संगीतपद्धतींचा आढावा घेताना कै. भातखंडे यांनी 'संगीतदर्पणा'चा परामर्श घेतलेला नसला तरी 'श्रीमल्लक्ष्यसंगीतम्' या आपल्या संस्कृत ग्रंथात त्यांनी 'संगीतदर्पणा'चे आधार दिले आहेत.

'संगीतरत्नाकरा'प्रमाणेच 'संगीतदर्पणा'चेही सात अध्याय असून प्रत्येक अध्यायाचा विषयही दोन्ही ग्रंथांत एकच आहे. या ग्रंथाचे प्रकाशन तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयाने व हथरसच्या संगीत विद्यालयाने केल्याची नोंद आढळते. १९१० साली मुंबईहून श्री. रतनलाल ठक्कर यांनी 'संगीतदर्पण' देवनागरी लिपीतील गुजराती भाषेतील स्पष्टीकरणासह प्रसिद्ध केले आहे. या आवृत्तीत दोनच अध्याय आहेत. मराठी टीकेचे अध्याय ३ असले तरी पहिल्या दोन अध्यायावरील ही टीका आहे.

पुण्याचे संगीतभक्त सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्या संग्रहात 'संगीतदर्पणा'ची दोन हस्तलिखिते आहेत. एक पूर्ण व दुसरे ६ व्या अध्यायापर्यंतचे. दोन्ही हस्तलिखितांवर प्रतलेखनकाल नाही. परंतु पूर्ण असलेले हस्तलिखित पृष्ठमात्रा पद्धतीने लिहिलेले आहे हे विशेष. सरदार मुजुमदारांच्या संग्रहात आणखी एक हस्तलिखित आहे. ते अलिकडचे असावे. निरनिराळ्या हस्तलिखितांच्या आधारे सिद्ध करण्यात आलेली ही 'संगीतदर्पणा'ची प्रत आहे.

सरस्वती महाल व हथरस येथील संगीत विद्यालय यांनी प्रकाशित केलेल्या 'संगीतदर्पणा'च्या आवृत्तीत किती अध्याय आहेत याची कल्पना नाही. परंतु, मराठी टीकेचे हस्तलिखित आणि श्री. ठक्कर यांनी प्रकाशित केलेली आवृत्ती यांवरून 'संगीतदर्पणा'चे दोनच अध्याय प्रचलित असावेत असे मत बनते. 'स्वराध्याय' आणि 'रागविवेक' हे दोनच विषय संगीतोपासकांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे असल्याकारणाने उर्वरित पाच अध्यायांची आवश्यकता ग्रंथसंग्रह करणारांना वाटली नसावी.

मराठी गद्यटीकेत अध्यायांचा क्रम व संख्या यात बदल झाला आहे. मूळ ग्रंथाचा १ ला अध्याय मराठी टीकेत तिसरा असून मूळ ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायाचे टीकाकाराने दोन अध्याय केले आहेत. अशी तीन अध्यायांची व २९ पत्रांची ही संहिता आहे. पोथीवर पत्रलेखन काल नाही. त्याचप्रमाणे मराठी टीका लिहिणाराचे नावही आढळत नाही. त्यामुळे या टीकेचा

१. 'उत्तरभारतीय संगीतका संक्षिप्त इतिहास', पृ. ३२.

२. तत्रैव, पृ. ३४.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व प्रतीचा काल निश्चित करता येत नाही. मूळ ग्रंथ सतराव्या शतकातला असल्याने मराठी टीका उत्तरकालीन आहे हे ओघानेच ठरते. भाषेच्या स्वरूपावरून मराठी टीकेचा काल निश्चित करणे युक्त नाही. कारण, मराठी टीकाभाष्यात्मक गद्य भाषापद्धतीच्या बाबतीत बरेच 'सनातन' राहिले आहे हे साधार सिद्ध करता येते. दहाव्या शतकातील श्रीपतिभट्टाच्या 'ज्योतिषरत्नमाले'ची मराठी टीका व आंग्लाईच्या प्रारंभापूर्वी लिहिण्यात आलेल्या गीताटीका यांची भाषा कालाचे अंतर दर्शविण्यास असमर्थ ठरते. म्हणून या टीकेच्या बाबतीत तसा प्रयत्न केल्यास तो फारसा फलद्रूप होईल असे वाटत नाही.

शास्त्रीय स्वरूपाच्या ग्रंथात देखील मराठी भाषा किती सहजतेने संचार करीत होती याचा प्रत्यय 'संगीतदर्पणा'वरील मराठी टीकेने येतो. प्रत्येक रागाचे 'ध्यान' अथवा स्वरूपवर्णन हे दामोदरपंडितांचे महत्त्वाचे वैशिष्टय गणले जाते. केवळ स्वरसंवेद्य असलेल्या रागांना मूर्तरूप देण्यात दामोदरपंडिताचे भाषाप्रभुत्व पणास लागलेले दिसते. मराठी टीकाकाराने देखील मुळातले स्वरूपवर्णन अत्यंत चपखल शब्दात अनुवादित करून आपले भाषाप्रभुत्व प्रगट केले आहे. त्यामुळे मराठी साहित्याच्या दृष्टीने देखील ही लहानशी टीका मला महत्त्वाची वाटते. दोनच उदाहरणे देतो.

दामोदरपंडित 'भैरवा'चे ध्यान पुढीलप्रमाणे देतो,

> गङ्गाधरः शशिकलातिलकास्त्रिनेत्रः
> सर्पैर्विभूषिततनुर्गजकृत्तिवासाः ।
> भास्वत् त्रिशूलकर एष नृमुण्डधारी
> शुभ्राम्बरो जयति भैरव आदिरागः ॥

मराठी टीकाकार हे ध्यान पुढीलप्रमाणे अनुवादित करतो,

> भैरवाचें स्वरूप सांगतों ॥ जटाजूटीं गंगा धरिली । चंद्रकलेचा भाळीं तिलक शोभतो । त्रिनेत्र ॥ सर्पेकरून शरीर शोभायमान । गजचर्म परिधान केलें आहे ॥ दैदिप्यमान त्रिशूल हातीं धरिलाहे । मनुष्यांच्या मुंडमाला धरिल्या आहेत ॥ शुभ्रवस्त्र परिधान केलें आहे । असें सर्वोत्कर्षेकरून भैरवाचें रूप आहे ॥

आता 'भैरवी' रागिणीचे दामोदरकृत ध्यान पहा :

> स्फटिकरचितपीठे रम्य कैलासशृङ्गे
> विकचकमलपत्रैरर्चयन्ती महेशम् ।
> करधृत घनवाद्या पीतवर्णायताक्षी
> सुकविभिरियमुक्ता भैरवी भैरवस्त्री ॥

मराठी टीका ॥ "कैलासाच्या शृंगावर स्फटिकनिर्मित आसन । त्यावर बसोन विकसित कमलपत्रें करोन शंकरपूजन करिती । हातीं रम्य थोर वाद्य आहे । पीतवर्णी । विशालनेत्रा । संगीतशास्त्रीं जे निपुण ते भैरवीचे ध्यान असे बोलताहेत ॥"

रागांच्या स्वरूपवर्णनात मराठी टीकाकाराचे भाषाप्रभुत्व दिसून येते त्याचप्रमाणे अन्यत्र विषय सुबोध करून मांडण्याची टीकाकाराची शैलीही प्रत्यास येते. तिसऱ्या अध्यायाच्या या प्रारंभावरून शैलीची थोडीफार कल्पना येईल.

> "संगीत म्हणजे काय" गीत म्हणावें गायनास । नर्तनास नृत्य म्हणावें । शब्द होतो त्यास वाद्य म्हणावें । तिहींयुक्त त्यास संगीत म्हणावें ॥ संगीताचे दोन भेद सांगतों ॥ येक मार्ग संगीत । येक देशसंगीत । ऐसे दोन भेद ॥ ब्रह्मदेव जो तेणें अभ्यासिलें तेंच भरताने महादेवापुढें प्रगट केले । तें अगम्य आहे । त्यास मार्गसंगीत म्हणावें ॥ मोक्षदायक आहे ॥ त्या मार्गसंगीतास लोक अंगमात्र म्हणताहेत । ज्या देशीं जे रीती निघाली । त्यास देशसंगीत म्हणावें ॥"

संगीताची शास्त्रीय परिभाषा आणि स्वरूपवर्णनाचा साहित्यिक थाट या दोन्ही प्रकारांत लीलेने संचार करणारी मराठी टीकाकाराची ही भाषा लक्षात घेतली म्हणजे शार्ङ्गदेवानंतर महाराष्ट्रात संगीतपरंपरा खंडित झाली नसावी असे मानण्याकडे मनाचा कल झुकतो.

मोक्षप्राप्ती हे सर्वच भारतीय विद्या आणि कला यांचे अंतिम साध्य होते. संगीतशास्त्रावरील सर्वच प्रमाण ग्रंथांत या उद्दिष्टाचा निर्देश करण्यात आला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे.[३] नाद हा परब्रह्मस्वरूप[४] असल्याविषयी देखील सर्व शास्त्रकारांचे एकमत आहे. रंजन हे साधन आणि भवभंजन ही नादब्रह्माच्या उपासनेची फलश्रुती असल्याचे सर्वच शास्त्रकार सांगतात. 'संगीतरत्नाकर' व या ग्रंथावरील विख्यात टीका, 'संगीतसुधा', 'संगीत सारामृत' इतरही मान्यवर ग्रंथ दरबारात वा दरबाराच्या परिसरात निर्माण झाले असले तरी हे शास्त्र मोक्षप्रद असल्याचे विस्मरण शास्त्रकारांना झालेले नाही. तरीही संगीताचा देवळातून दरबारात प्रवेश झाल्यानंतर त्याचे रंजनप्रधान स्वरूपच प्रधान बनणे स्वाभाविक होते. 'भवभञ्जना'च्या उद्दिष्टपूर्तीसाठी संगीताची आराधना मठातून व देवालयातून चालूच राहिली. आजही साधुसंतांच्या मठातून संगीतसाधना चालूच आहे.

संतांची संगीतसाधना हा वस्तुतः स्वतंत्र लेखाचा व संशोधनाचा विषय आहे. परंतु महाराष्ट्राच्या संगीतपरंपरेशी या साधनेचा संबंध येत असल्याने या साधनेचे थोडक्यात दिग्दर्शन करणे आवश्यक वाटते. समर्थ रामदासांचा गाथ्याचा अपवाद वगळल्यास प्रकाशित संतवाङ्मयात पदांच्या शिरोभागी रागांचे नामोल्लेख आढळत नाहीत. संतांचे अभंग वेगवेगळ्या रागात आजही गाइले जातात. साधुसंतांनी रचलेल्या गवळणी व पदे भजनीमंडळे व इतर गायक रागदारीत गातात. पदे आणि गवळणी यांची रचना करताना त्या त्या संताने रागांचा किमानपक्षी 'चालीं'चा विचार केला असणे असंभवनीय वाटत नाही. परंपरेने संतवाङ्मयाच्या नकला करणारांना 'चालीं'चे ज्ञान असल्यामुळे तसा निर्देश करण्याची आवश्यकता त्यांना भासली नसावी. किंवा मुळातच रागदारीसंबंधी अज्ञान असल्यामुळे त्यांचा उल्लेख वगळण्यात तरी आला असावा. समर्थांच्या गाथ्यांतील अनेक पदांवर शिरोभागी राग दिले आहेत. तसेच कोणत्या तरी पदाचा प्रारंभ देऊन चाल दर्शविली आहे. वारकरी संतांच्या साहित्यात असे निर्देश आढळत नाही. तथापि, मूळ रचनाकारांना राग अभिप्रेत नसावेत असेही वाटत नाही.

त्याला एक बलवत्तर प्रमाण महाराष्ट्राबाहेर मिळते. नाथ व इतर सिद्ध यांचे जे साहित्य आज उपलब्ध आहे त्यांतील पदांची रचना रागदारीत करण्यात आली आहे.[५] सिद्ध साहित्यात १८ राग आल्याचे पंडितांनी नमूद केले आहे.[६] सिद्ध आणि उत्तरकालीन संत यांनी ही रागदारी लोकसंगीतावरून उचलली असण्याची शक्यता आहे.[७] पुढे या लोकसंगीताचे संहितीकरण होऊन त्यास रागदारीचे स्वरूप मिळाले असावे. 'नाटचशास्त्रा'च्या ३२ व्या

३. संगीतरत्नाकर, १-१-३०; १-२-१६८. 'स नादसवाहतो लोके रञ्जको भवभञ्जकः।'-संगीतदर्पण.

४. नादोपलब्धिस्तु यतः शरीरात्तस्याभिमानी खलु जीव एकः ॥४७॥ तस्यापि तत्त्वं परमात्मरूपं यतो भवेद् ब्रह्मनिरूपणीयम् ॥४८॥... सदेव सर्वं प्रतिभाति यत्र ब्रह्मात्मकं तं प्रणमामि प्राणम् ॥९३॥ 'संगीतसुधा', पृ. १० व १५.

"अथ निखिलमपि विष्टपमाध्यात्मिकादि तापत्रयनिविष्टमानिनन्दविषुः सर्वेषु तंत्रेषु पशुशिशुभुजगादिसुखकरात्मेन प्रत्यक्षसिद्धं धर्मार्थमोक्षारण्यपुरुषार्थहेतुभूतं शिवप्रसादेन सामवेदादुद्धृत्य पितामहसंगृहीतं संगीततंत्रं प्राणिमात्रदयापरः भरतमुनिः प्राणैषीत् ।...... नादो नाम नामरूपात्मकप्रपञ्च व्याकरणभूतः शरीरे प्रकाशमानः परमात्मस्वरूपः । — संगीतसारामृत, पृ. ३ व ४.

५. "संतों तथा नाथों के संग्रहों में साखियों का वर्गीकरण तो विषय के अनुरूप होता था किंतु पदों का वर्गीकरण रागों के आधारपर होता था।"
सिद्धसाहित्य, पृ. ४७४.

६. हे १८ राग असे : अरू, कामोद, गउडा, गुंजरी, गुर्जरी, देशाख, देवक्री, धनसी, पटमंजरी, बंगाल भैरवी, मल्लारि, मालशी (श्री) मालशी गउडा, रामक्री, बलाड्डि, बराडी, शबरी.
तत्रैव, पृ. २९८.

७. "इस प्रकार उपलब्ध सामग्री के आधारपर हम अधिक से अधिक यह कह सकते हैं कि सिद्धों के इन पदों के राग मूलतया लोकसंगीत से लिये गये थे किंतु उस समय तक शास्त्रीय पद्धति में स्वीकृत होकर नियमानुशासित हो गये थे।" तत्रैव, पृ. २९९.

(टीप पुढील पानावर चालू)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्यायात जातींची उदाहरणे देताना प्राकृत भाषांतील उदाहरणे देण्यात आली आहेत हे या संदर्भात विशेष सूचक वाटते.[८] दरबाराबाहेर चालू असलेल्या संगीत परंपरेस लोकसंगीताचे अधिष्ठान असून 'देशी' या व्यापक संज्ञेत या संगीताचा समावेश शास्त्रकारांनी केला व या स्वरधारेसही प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. ही साधना इतर परंपरांना समांतर अशी चाल होती. साधुसंतांच्या या संगीतसाधनेस इ. स. च्या सहाव्या शतकापासूनचा इतिहास आहे.

दासोपंत आणि समर्थ रामदास यांच्याप्रमाणेच पूर्ववर्ती मराठी साधुसंतांची पदरचना देखील संगीत परंपरेच्या या दरबाराबाहेरच्या साधनेचाच महाराष्ट्रातील आविष्कार होय असे म्हणता येईल. यादवकालोत्तर संगीत परंपरेचे यथायोग्य मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने मराठी संतांच्या पदरचनेचे अधिक संशोधन होणे आवश्यक वाटते.

'संगीतरत्नाकरा'नंतर महाराष्ट्रातील संगीत परंपरेचा अस्त झाला नसून ती संतांच्या कवनात व अन्य साधनांच्या रूपाने प्रचलित होती हे वरील विवेचनावरून निदर्शनास येईलच. साधुसंतांच्या साधनेची सामग्री उपलब्ध असली तरी तिचे परिशीलन व विश्लेषण होणे आवश्यक आहे. अन्य परंपरेसंबंधाने अद्याप पुरेशी साधने उपलब्ध व्हावयाची असल्याकारणाने ही सामग्री प्रकाशात आल्यानंतरच तेरा ते एकोणवीस या सात शतकांतील महाराष्ट्रातील संगीत परंपरेचा सुसंगत इतिहास लिहिणे शक्य होईल.* (पूर्ण)

(मागील पानावरून)

"It may be remarked that a greater part of what now passes under the name of music at one time or other belonged to the world of 'Desi' or Folk Music, and which being refined and affiliated to the rules and systems of traditional classical music have contributed to its growth and development."

Ragas and Raginis, p. 10.

८. 'नाट्यशास्त्रम्' निर्णयसागरप्रत, द्वितीय संस्करण, पृ. ५४०, ५८८,

आधार

१. भरतमुनीप्रणीतं 'नाट्यशास्त्रम्'—सं. पं. केदारनाथ, काव्यमाला ग्रंथावलि, निर्णयसागर प्रेस, मुंबई, द्वितीय संस्करणम्, १९४३.

२. 'संगीत रत्नाकर,' शार्ङ्गदेवविरचित, (खंड १ ते ४) संपादक, पं. सुब्रह्मण्य शास्त्री, Adyar Library, Madras, 1943.

३. 'संगीतसुधा,' तंजावरनृपती रघुनाथविरचित, सं. सुंदरं अय्यर आणि पं. सुब्रह्मण्य शास्त्री, Music Academy, Madras, 1940.

४. 'संगीत सारामृत,' तळजा राजे भोसले विरचित, सं. पं. सुब्रह्मण्य शास्त्री, Music Academy, Madras, 1943.

५. 'संगीतदर्पणम्' पं. दामोदर विरचित, संपादक व प्रकाशक, रतनसी लीलाधर ठक्कर, व्यंकटेश मुद्रणालय, मुंबई, १९१०.

६. 'श्रीमल्लक्ष्यसंगीतम्' भरतखण्डनिवासिना चतुराख्यपंडितेन निर्मितम्। भालचंद्र सीताराम सुखथनकर, पुणे, द्वितीयावृत्ती, १९३४.

७. 'भरत का संगीत सिद्धांत,' कैलासचंद्रदेव बृहस्पती, सूचनाविभाग, उत्तरप्रदेश, १९५९.

८. 'उत्तरभारतीय संगीत का संक्षिप्त इतिहास'— पं. भातखंडे; हिंदी अनुवाद : अरुणकुमार जैन, संगीत कार्यालय, हथरस, १९५४.

* पूर्वपरिचय नसताही पुण्याचे सरदार आबासाहेब मुजुमदार यांनी आपल्या संग्रहातील हस्तलिखिते व प्रकाशित ग्रंथ यांचा उपयोग करू दिला व अत्यंत आत्मीयतेने मार्गदर्शन केले याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे आवश्यक वाटते.

२. मराठवाडा साहित्य परिषदेच्या संशोधन शाखेने आपल्या संग्रहातील हस्तलिखित अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले याबद्दल लेखक संस्थेचा आभारी आहे.

३. लेखकाने संपादिलेल्या 'संगीतदर्पणावरील मराठी टीका' या पुस्तकास जोडलेल्या प्रस्तावनेच्या आधारे प्रस्तुत लेख लिहिला आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

९. 'सिद्धसाहित्य', डॉ. धर्मवीर भारती, किताब महल, इलाहाबाद, १९५५.
१०. 'A comparative study of some of the leading music systems of the 15th, 16th, 17th, & 18th centuries, V. N. Bhatkhande, Matinibai Sukthankar, Bombay.
११. श्रीसमर्थांची गाथा, सं. अनंतदास रामदासी, श्रीसमर्थ गोसेवा मठ, वांई, शके १८५०.
१२. 'Ragas & Raginis', O. C. Gangoli, Nalanda Publications, Bombay, Second Edition 1947.
१३. 'काव्य और संगीत का पारस्परिक संबंध' डॉ. उमा मिश्रा, दिल्ली पुस्तक सदन, नवी दिल्ली, १९६२.
१४. 'नाट्यशास्त्रसंग्रह', सं. के. वासुदेवशास्त्री व इतर, Tanjore Saraswati Mahal Series No. 52, Tanjore, 1953.

विदर्भ साहित्य संघ, शाखा वणी (यवतमाळ)

दोन उत्कृष्ट प्रकाशने

अक्षर-माधव

कै. लोकनायक बापूजी अणे यांच्या मौलिक व वेचक वाङमयीन लेखांचा हा संग्रह. राजकारण-धुरंधर बापूजींच्या एका वेगळ्या पैलूंचे मनोरम दर्शन घडविणारा हा संग्राह्य ग्रंथराज. या ग्रंथाचे साक्षेपी संपादन महाराष्ट्रातील नामवंत कवी व साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर यांनी केले असून मराठीतील सव्यसाची पत्रपंडित आणि ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संपादित लेखांचा परामर्श घेणारी मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे.

डेमी आकार : पृष्ठसंख्या ३५० किंमत १० रुपये

पदाती

विदर्भातील जुन्या पिढीतील एक नामवंत कवी श्री. ना. मा. सरपटवार यांच्या नियत-कालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या निवडक कवितांचा हा काव्यसंग्रह. या संग्रहाला मराठीतील मान्यवर कवी व रसिक काव्यसमीक्षक प्रा. भ. श्री. पंडित यांची रसोद्ग्राही प्रस्तावना लाभली आहे. तसेच आदरणीय अप्रबुद्ध, श्री. य. गो. जोशी, कविवर्य वा. ना. देशपांडे, पद्मभूषण लोकनायक अणे, पद्मविभूषण य. दि. पेंढरकर आणि पद्मश्री ग. दि. माडगूळकर प्रभृतींनी कवितेबद्दल गौरवपर उद्गार काढले आहेत.

पृष्ठसंख्या ८० किंमत : तीन रुपये

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'अंधारयात्रे'तील सौंदर्यमीमांसा

--सु. श्री. पांढरीपांडे

श्री. त्र्यं. वि. सरदेशमुख यांनी आपल्या अंधारयात्रेच्या दुसऱ्या भागात काव्याचे स्वरूप, त्याचे जन्मकारण इ. सौंदर्यशास्त्रीय विषयांवर काही लेखांतून विचार मांडले आहेत. त्यांचे प्रस्तुत लेख वाचून निर्माण होणाऱ्या काही शंका व विचार यांचाच केवळ मी या लेखात विचार करणार आहे.

काव्याचे स्वरूप, त्याचे 'जन्मकारण' आणि त्यापासून होणाऱ्या आनंदाचे स्वरूप व त्याची मीमांसा या सौन्दर्यशास्त्रातील मूलभूत समस्यांचा विचार प्रा. सरदेशमुख यांनी प्रामुख्याने आपल्या 'कविता-सर्ग, स्थिती आणि प्रत्यय' या दुसऱ्या भागातील पहिल्या लेखातून केलेला आढळतो. त्यांचा विचार समजून घेणे हे तितकेसे सुलभ नाही, हे पहिल्यांदाच कबूल करणे भाग आहे. परंतु ही दुर्बोधता विचारगत अथवा विषयगत नाही हेही सांगणे आवश्यक आहे. श्री. सरदेशमुख यांची विशिष्ट नव्हे विलक्षण-भाषाशैली हेच याचे मुख्य कारण आहे. खरे म्हणजे श्री. सरदेशमुखांनी या ठिकाणी कोणताही नवा विचार मांडलेला नाही. परंतु नवेपणाचा आभास मात्र निश्चितच निर्माण केलेला आहे. खरे म्हणजे विचार जुना असायला कुणाचीच हरकत असू नये. परंतु नवेपणाचा आभास निर्माण करण्याला मात्र हरकत असू शकते. कवितेपासून होणारा आनंद आध्यात्मिक अनुभूतीचा आनंद असतो किंवा महान काव्यामधून आध्यात्मिक अनुभूतीचाच आविष्कार झालेला असतो इ. विचार तत्वज्ञानातील आदर्शवादी विचारप्रणालीतील परवलीचे मुद्दे आहेत. (त्यांच्या ग्राह्याग्राह्यतेचा विचार या ठिकाणी अप्रस्तुत आहे.) श्री. सरदेशमुखांनी प्रामुख्याने हेच विचार एका नव्या शब्दजंजाळातून व्यक्त केलेले आहेत. पण तसे करताना त्यांच्या प्रमेयात काही आंतरविरोध निर्माण झाले आहेत; कधीकधी काही शंकास्थाने निर्माण झाली आहेत.

काव्याचे स्वरूप मूलतःच संकीर्ण, एकात्म आणि व्यामिश्र असल्यामुळे त्यांची तंतोतंत व्याख्या करणे कठीण आहे हे सहज समजण्यासारखे आहे. काव्याच्या आजपर्यंत करण्यात आलेल्या व्याख्यांवरून एक नजर टाकली तरीही हे काम किती कठीण आहे याची सहज कल्पना येईल. तथापि, या संदर्भात श्री. सरदेशमुखांनी केलेल्या कामचलाऊ व्याख्येचा थोडासा खोलवर जाऊन विचार करणे आवश्यक आहे. (अशा 'व्याख्या' एकाच लेखामध्ये दोनतीनदा करण्यात आल्या असून त्यात परस्परविसंगती देखील आहे हेही याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. पण त्याचा सविस्तर विचार इष्ट स्थळी करण्यात येईल.) 'कविता म्हणजे उत्कट-भावानुभवजन्य लयबद्ध संस्मरणीय शब्दरचना' अशी एक स्थूल व्याख्या सुरवातीलाच करण्यात आली आहे. व्याख्येतील शब्द वाचल्याबरोबर वर्डस्वर्थच्या सुप्रसिद्ध व्याख्येची जाणत्या वाचकाला आठवण झाल्याविना राहणार नाही. परंतु या दोन व्याख्यांचा तौलनिक विचार केल्यास त्यातील फरक लक्षात येण्यासारखा आहे. 'Poetry is a spontaneous overflow of powerful feelings recollected in tranquility' अशी वर्डस्वर्थची व्याख्या आहे. या व्याख्येच्या ग्राह्याग्राह्यतेचा या ठिकाणी विचार करावयाचा नाही. कवितेतून उत्कट भावानुभव प्रवाहित झालेला असतो हे वर्डस्वर्थच्या व्याख्येतून स्पष्ट झाले आहे. दुसऱ्या शब्दात, काव्यातून भावनाविष्कार होत असतो. अशा प्रकारच्या पारम्परिक आविष्कारवादी (expressionist) सिद्धान्ताशी वर्डस्वर्थचे नाते जवळचे आहे याची सहज

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कल्पना यते. परंतु श्री. सरदेशमुखांच्या व्याख्येनुसार काव्यातील 'शब्दरचना' 'उत्कट भावानुभवजन्य' असते. काव्यातून उत्कट भावानुभव आविष्कृत झालेला असतो असे ते मानीत नाहीत. एकतर भावनानुभव ज्यावेळी खऱ्या अर्थाने उत्कट असतो त्यावेळी 'शब्द-रचना' शक्य आहे काय ? हाच एक महत्त्वाचा शरीर-शास्त्रीय व मानसशास्त्रीय प्रश्न आहे. वास्तविक उत्कट भावावेग अथवा भावनानुभूती माणसाला जवळजवळ नेहमीच मूक करीत असते. मग हा आवेग दुःखाचा असो अगर सुखाचा असो. वर्डस्वर्थने ही अडचण लक्षात घेतली होती व म्हणूनच त्याने 'recollected in tranquility' अशी महत्त्वाची पुस्ती आपल्या व्याख्येला जोडली. त्याचप्रमाणे या व्याख्येसंबंधाने आणखी एक महत्वाची अडचण आहे. क्षणभर वादासाठी उत्कट भावानुभवजन्य शब्द-रचना मान्य केल्यास प्रत्यक्ष भावानुभूती आणि शब्दरचना यामध्ये कोणत्या स्वरूपाचे नाते असते हा प्रश्न शिल्लक राहतो. भावानुभूती आणि काव्य-निर्मिती यांच्यामध्ये आविष्काराच्या स्वरूपाचा संबंध नसतो अशा प्रकारची भूमिका असू शकते आणि अनेक सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासकांनी तशी भूमिका घेतलेली आढळून येते. उदाहरणार्थ, सुसान लँगरने कला-कृतीला भावानुभवाचे प्रतीक मानून आविष्कारवादी सिद्धांतातील अंगभूत अडचणींवर मात करण्याचा एक प्रयत्न केला आहे. परंतु अशा भूमिकेमध्ये प्रत्यक्ष भावनानुभूती आणि तिचे प्रतीक यातील संबंध कोणत्या प्रकारचा असतो हे स्पष्ट करणे आणि त्यातील 'इंटरप्रिटंट' निश्चित करणे या सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टी आहेत. श्री. सरदेशमुखांनी अशा स्वरूपाची भूमिका घेतली आहे असे वाटत नाही; आणि असल्यास वरील संबंध त्यांनी पूर्णपणे दुर्लक्षित केलेला आहे. भावानुभवजन्य काव्यामध्ये निबद्ध झालेली अनुभूती आणि त्या काव्याने रसिकाच्या अंतरंगात निर्मिलेला 'भावकल्प' हे जवळजवळ एक-रूप असतात असे सरदेशमुख मानताना दिसत नाहीत. एरवी ती काव्यानुभूतीची एक सरळसरळ आविष्कार-वादी भूमिका ठरली असती. पण त्याबरोबरच हा 'भावकल्प' का व कसा निर्माण होतो, म्हणजेच त्यांचे परस्परांचे नाते कसे असते, हेही श्री. सरदेश-मुख स्पष्ट करीत नाहीत. काव्य हे भावकल्पाचे 'उपादान' (cause) आहे की 'कारण' (reason) आहे हेही कळत नाही. ते जर 'उपादान' मानले तर कार्याचा (या ठिकाणी भाव-कल्प) कारणाशी (या ठिकाणी काव्य) यांचा बाप-लेकासारखा संबंध सुनिश्चित करावा लागेल. आणि ते जर कारण (reason) मानले तर भावकल्प आणि काव्यातून निबद्ध झालेली भावानुभूती परस्परा-पासून पूर्णपणे वेगळी राहू शकते ही संभवनीयता गृहीत धरावी लागेल. आणि एवढे करूनही या खेळाचे नियम निश्चित करावे लागतील.

'भावकल्प' या शब्दानेही काही अडचणी निर्माण केल्या आहेत. भावकल्प म्हणजे नेमके काय हे लेखकाने कुठेच स्पष्ट केलेले नाही. श्री. सरदेशमुखांना यातून नेमके काय सुचवावयाचे आहे ? भावनांचा आकृतिबंध (pattern) की भावप्रतिमा (image) की भावनांची एक संकल्पना (concept) ? या तीनपेक्षा आणखी एखादा वेगळा अर्थ असल्यास त्याची त्या शब्दावरून तरी कल्पना करणे शक्य नाही आणि वरील तीनही पर्यायांमधून श्री. सर-देशमुख यांना नक्की काय म्हणावयाचे आहे हे कळत नाही. भावाकृतिबंध असा अर्थ अभिप्रेत आहे असे गृहीत धरल्यास प्रत्येक भावनेला काही ना काही तरी आकार असतो असे मानावे लागते. आणि असे का मानावे याला मात्र आधार मिळत नाही. आजकाल 'तिरकस संवेदना' किंवा 'स्क्वेअर मेलडी' अशा प्रकारचे शब्दप्रयोग करण्यात येतात. पण याचा अर्थ इतकाच की एखादी जाणीव आंतरसंवेदना क्षेत्रीय (inter-sense-field) असू शकते. एका विशिष्ट जाणिवेचे वर्णन त्या जाणिवेच्या मूलभूत संकीर्ण, तरल आणि व्यामिश्र स्वरूपामुळे, इतर संवेदनीय अनुभ-वांच्या परिभाषेत व्यक्त करणे आवश्यक होते. परंतु याचा अर्थ ती जाणीव एखादी भूमितीतील आकृती आपल्या मनात निर्माण करते अथवा त्या भावनात्मक अनुभवालाच एखादा आकार असतो हे सिद्ध होत नाही. भावकल्प याचा जर भावप्रतिमा असा अर्थ केला तरीदेखील अशाच अडचणी निर्माण होतात. रसि-कांच्या अंतरंगात निर्माण झालेली 'भावप्रतिमा' ही निश्चितपणे काव्यांतर्गत भावप्रतिमा आहे हे पडताळून पाहण्यासाठी आपल्याला दुसरा कोणताही मार्ग नाही. एक गोष्ट दुसऱ्याची प्रतिमा आहे हे मानताना मूळ

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोष्टीच्या आकाराची आपल्याला स्वतंत्रपणे जाणीव होणे आवश्यक आहे. एरवी प्रतिमेचा प्रामाणिकपणा ठरविण्याचा दुसरा कोणताही मार्ग शिल्लक राहणार नाही. याच ठिकाणी एका आनुषंगिक मुद्याचाही विचार करणे अप्रस्तुत ठरणार नाही. काही वेळासाठी वर खोडून काढलेल्या दोन्ही पर्यायी कल्पना मान्य केल्या तरी काव्याची श्रेष्ठकनिष्ठता ठरविण्याचा कोणताही मार्ग त्यातून दिसत नाही. जर प्रत्येक कलाकृती असा एखादा भावाकृतिबंध अथवा अशी भावप्रतिमा निर्माण करीत असेल, तर एक आकृती अगर प्रतिमा दुसऱ्याहून अधिक चांगली अथवा वाईट हे ठरविण्याचा कोणताही उपाय यातून सुचविण्यात आलेला नाही. जी 'भावनानुभूती श्रेष्ठ आहे ती कविता श्रेष्ठ आहे' अशा सारखे उत्तर यावर देण्यात येईल. परंतु भावनानुभूतीचे श्रेष्ठत्व ठरविण्याचा काव्यगत आणि वस्तुनिष्ठ निकष कोणता, याही प्रश्नाचे उत्तर श्री. सरदेशमुखांच्या मीमांसेत सापडत नाही. आता तिसरा पर्याय. भावकल्प म्हणजे भावनांची एखादी संकल्पना, एखादी 'कॉन्सेप्ट' निर्माण होते असे जर मानले तर श्री. सरदेशमुखांच्या मूळ काव्य-विषयक भूमिकेवरच आघात होतो. संकल्पनेची निर्मिती बौद्धिक विश्लेषणातून होते हे मान्य करणे भागच आहे. अनुभव व्यामिश्र आणि संकीर्ण राहू शकेल; परंतु अनुभवांच्या समुच्चयातून संकल्पनेची निर्मिती होण्यासाठी अनुभवांचे विश्लेषण, त्यांची विभागणी इ० विचारप्रक्रियांतून प्रवास करणे आवश्यक आहे. कलानुभवाचे स्वरूप असे बौद्धिक अथवा विश्लेषणात्मक असते काय? कदाचित असेलही. परंतु श्री. सरदेशमुख मात्र तसे मानीत नाहीत '...कवितेची रचना प्रधानत: भाव-वासना-कल्पना यांतून प्रेरित होते व यांना प्रेरणा देते' असे मान्य करून विश्लेषण हा गद्याचा विशेष मानल्यानंतर काव्यानुभवात भावनांची 'कॉन्सेप्ट' निर्माण होते असे मानणे वदतोव्याघाताचेच उदाहरण होईल. याच दमात श्री. सरदेशमुखांनी एक मोठे विलक्षण विधान केलेले आहे. काव्य आणि गद्य यांतील फरक आपल्या नेहमीच्या शैलीत वर्णन करून सांगताना श्री. सरदेशमुख म्हणतात, 'अथपासून इतीपर्यंत कवितेच्या रचनेत एका मनोऽवस्थेच्या आळवणीचे केंद्र हेरण्याचा प्रयत्न केलेला असतो.' व हा प्रयत्न बुद्धिपुरस्सर व अबोधपूर्वक अशा दोन्ही प्रकारचा असू शकतो असेही ते मानतात. काव्य 'उत्कट भावानुभूतीजन्य' जर असेल, तर ते त्याचवेळी 'बुद्धिपुरस्सर' राहणे शक्य आहे काय? त्याचप्रमाणे मनोवस्थेची आळवणी म्हणजे काय? एखाद्या अनुभूतीतून निर्माण झालेली भावावस्था मी समजू शकतो. ही भावावस्था म्हणजेच मनोऽवस्था असावी. या मनोऽवस्थेचा आविष्कारही मी समजू शकतो. परंतु या मनोऽवस्थेची 'आळवणी' करण्यासाठी मनोऽवस्थेच्या जाणिवेची पुन्हा एक वेगळी भावात्मक जाणीव गृहीत धरावी लागते, व अशा रीतीने प्रत्यक्ष अनुभूतीपासून काव्य निदान दुप्पट (twice removed) दूर असते. आणि याशिवाय अशा प्रकारची निखळ भावानुभूती (Emotional experience)-अशी की जी एकाच वेळी भावानुभूतीची आणि त्याच भावानुभूतीच्या आंतरिक स्वरूपाची जाणीव करून देते-मानसशास्त्रीय दृष्टया शक्य मानण्यात आलेली नाही. हे असंभवनीय आहे. या सर्व अडचणीही सबंध प्रक्रिया अबोधपूर्वक मानून देखील शिल्लकच राहतील. शिवाय ही क्रिया जर अबोधपूर्वक मानली, तर कवीसाठी काव्यनिर्मिती म्हणजे केंद्र हेरण्याचा प्रयत्न राहू शकत नाही. तीही एक स्वतंत्र व उत्कट अशी अनुभूतीच राहील असे मानावे लागेल. तो कशाचा प्रयत्न आहे हे टीकाकाराला किंवा रसिकालाच ठरवावे लागेल.

लयबद्धता कलेचे अविभाज्य अंग आहे असे श्री. सरदेशमुख मानतात. व काव्यातील किंवा कलेतील ही लय सृष्टीतील चैतन्यतत्वाची वाचकाला आठवण करून देत असते आणि हेच काव्यानंदाचे खरे रहस्य आहे असाही विचार ते मांडतात. सृष्टीतील चित्सौंदर्य आपल्या 'जीवनाचा आणि जीवनानंदाचा' भाग आहे याची आठवण लयतत्वाद्वारेच मानवाला घडत असते. मग ही लय काव्यांतर्गत असो अगर मानवी रक्तासकट सृष्टीमध्ये जे काही म्हणून वाहणारे आहे त्याची असो. हा सारा विचार अध्यात्माच्या सीमेवर धडक मारणारा आहे हे स्पष्टच आहे. परंतु हे सारे असे घडते हे मानायला काही पुरावा नाही. कला ही लयाश्रयी असते असे मानूनही कलागत लयतत्त्व व चित्सौंदर्य व्यक्त करणारी लय एकच आहे ही जाणीव कशी होते हे लेखक सांगत नाही. वायू, जल, नाद, रक्तप्रवाह यांच्या द्वारे निसर्गाची अखंड सचेतनता दिसते हे खरे. या सर्व तत्त्वांना लय असते असेही क्षणभर मानता येईल. परंतु

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावरून कलान्तर्गत लय आणि सृष्टीतत्वान्तर्गत 'लय' एकच आहे हे कसे काय ठरू शकते कळत नाही. मानवी हृदयाच्या स्पंदनांचा आलेख काढणारे कार्डीयोग्राम सारखे यंत्र किंवा रक्तप्रवाहाची नोंद करणारे एखादे यंत्र अगर वनस्पतींच्या वाढीमधे होणारे सूक्ष्मातिसूक्ष्म फेरबदल दाखविणारी सर जगदीशचंद्र बोसांची सुई व त्यावरून तयार झालेला आलेख आणि रोली अथवा शेक्सपियर अथवा रिल्के यांच्या काव्यातून आविष्कृत झालेली 'लय' सारखीच राहील काय आणि रसिकाला सारखाच आनंद देईल काय? श्री. सरदेशमुख यांचा तर्क जमेस धरून याचे उत्तर 'हो'कारार्थीच द्यावे लागणार. आणि असेच जर असेल तर मग एखाद्या 'कुब्लाखाना'पेक्षा (Kublakhan) एखादा कार्डियोग्राम अधिक श्रेष्ठ ठरल्यास नवल नाही. या सर्व खटाटोपामागे श्री. सरदेशमुखांची मुख्य अडचण ही आहे की काव्यानंदाचे निधान आध्यात्मिक अनुभूतीच असते असे त्यांना सिद्ध करून दाखवावयाचे आहे. अनुभूतीचे श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी अध्यात्माचाच तेवढा हवाला देण्याची आमची जुनी खोड आहे. अर्थातच काव्यानुभूतीचे स्वरूप आध्यात्मिक असू शकत नाही असे मी मानत नाही. ते तसे असेलही किंवा नसेलही. मात्र ज्या पद्धतीने श्री. सरदेशमुखांनी हा संबंध लावण्याचा प्रयत्न केला आहे तो कसा अयशस्वी व काहीसा हास्यास्पद होतो एवढेच या ठिकाणी दाखवायचे आहे. कलाविषयक मीमांसेमध्ये आदर्शवादी भूमिका घ्यावयाची असल्यास आज तरी जी. ई. मूरने आदर्शवादी तत्वज्ञानाच्या खंडनासाठी मांडलेल्या मुद्यांचा विचार करणे आवश्यक आहे व त्यांना समाधानकारक उत्तर देणेही आवश्यक आहे. अनुभवाचा आशय आणि अनुभवाची जाणीव यांच्यात फरक आहे. 'आशयनिरपेक्ष अनुभूति' आणि 'जाणीव निरपेक्ष आशय' अशा स्वरूपाची अनुभूती आपल्याला कधीच येत नसल्याने आपण या दोन्ही गोष्टी एकच मानतो. परंतु एकदा आशयापेक्षा जाणीव भिन्न मानली म्हणजे जाणीवेप्रमाणेच व सोवतच आशय देखील व्यक्तिनिष्ठ अथवा मनोनिष्ठ असू शकतो—म्हणजेच अध्यात्मिक अनुभवाशय वस्तुनिष्ठ नसू शकेल—ही सम्भवनीयताही मानणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत आध्यात्मिक अनुभूतीचा कणाच मोडल्यासारखा होतो. आणि त्यासोबतच इतर अनुभूतींचा त्याबरोबर बांधलेला सांधाही तुटून पडतो. ही एक महत्वाची अडचण असून तिचा श्री. सरदेशमुखांनी विचार केलेला नाही ही गोष्ट लक्षात ठेवावयास हवी.

मानवी क्रीडाशीलता आणि कलानिर्मितीच्या मागील प्रेरणा यांच्यामधे जवळचा संबंध आहे असे काही तत्वज्ञांनी मानले आहे. जर्मन तत्वज्ञ शिलर हा त्यांच्यापैकी प्रमुख होय. परंतु शिलरने सुरवातीला गृहीत धरलेली कल्पना पुढेपुढे सोडून दिली आणि क्रीडा आणि कला यांच्यामधील संबंधाची त्याची कल्पना बरीच सखोल व व्यापक झालेली दिसून येते. या तुलनेत श्री. सरदेशमुख यांनी क्रीडा व कला यांमधील कल्पिलेले नाते फारच उथळ आहे असे वाटते. देहधारणेसाठी आवश्यक असलेली जीवनशक्ती सोडून उरलेली जी अतिरिक्त जीवनशक्ती असते त्याचाच एक आविष्कार क्रीडेतून होतो तर दुसरा कलानिर्मितीतून होतो असे ते मानतात. ही संपूर्ण विचारधाराच फार ढिसाळ आणि जुजबी अशी वाटते. 'शोकः श्लोकत्वं गतः' या वचनाची मूर्तिमंत प्रचीती आणून देणारे रामायणासारखे अन्तःकरण व्याकूळ करणारे महाकाव्य, 'poetry is a painful toil' हे वाक्य पानोपानी खरे करणारे 'सॉरोज ऑफ वर्दर' सारखी कलाकृती किंवा लियर आणि हॅम्लेट यांची निर्मिती मानवाच्या मूलभूत क्रीडाप्रवृत्तीमधून आहे हे कोणत्याही रसिक वाचकाला पटण्यासारखे असे वाटत नाही. याशिवाय क्रीडा आणि कला यांच्यामधील फरक दाखविणारे अनेक मूलभूत मुद्दे उपस्थित करता येतील. एखाद्या क्रीडापटूस क्रीडेपासून होणारा आनंद कलाकाराला होणाऱ्या आनंदासारखा असतो असे आपल्याला मानता येईल का? क्रीडेपासून होणारा आनंद प्रामुख्याने शारीरिक आणि मानसिक शीण घालविण्यापासून निर्माण होणारा आनंद असतो. 'लय', त्यापासून होणारी 'काल्पनिक सहसंवेदना', त्यातील 'घटकांचे परस्परसंवादित्व' व त्यापासून निर्माण होणारा एक 'आकृतिबंध' अशा स्वरूपाची परिभाषा आपल्याला क्रीडानंद व्यक्त करण्यासाठी वापरता येईल असे वाटत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे क्रीडा आणि कला यांच्या निर्मितीच्या आणि यांच्यापासून होणाऱ्या आनंदाच्या प्रेरणा परस्पराहून फार मोठ्या प्रमाणात भिन्न आहेत हेच होय. प्रतिभासंपन्न नवनिर्मिती हे कलेचे वैशिष्ट्य क्रीडेचेही वैशिष्ट्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे असे आपण खऱ्या अर्थाने म्हणू शकू काय ? कलाकाराच्या दृष्टीने कलेची साधने आणि कलेचे माध्यम यांना मूलभूत आणि अपरिहार्य असे अनन्य-साधारण महत्व असते. तसे ते एखाद्या खेळाडूला असते असे म्हणता येत नाही. क्रीडा ही कला असू शकेल पण कला ही क्रीडा आहे असे मानता येणार नाही. याशिवाय काही मानसशास्त्रीय अडचणी देखील आहेत. श्री. सरदेशमुखांच्या मतानुसार प्रतिभासंपन्न कवी अगर कलाकार सर्वसाधारणपणे आपल्या बालपणी तरी खेळामधे विशेष रुची दाखविणारा असावा. परंतु अनेक बाबतीत हे घडलेले नाही असे दिसून येते. इतकेच नव्हे तर अनेक व्युत्पन्न कवी किंवा कलाकार अगदी बालपणापासूनच कलेच्या सेवेतच निमग्न झालेले आपण बघतो. एम्. डेझ्राॅईरने केलेल्या सांख्यिकी पर्यवेक्षणा-वरूनही हेच दिसून आले आहे. तेव्हा मानवी जीवन-क्रीडा आणि कलाव्यापार यांच्यातील संबंध विशेष निकटचा अथवा विशेष मूलभूत आहे असे मानणे गैर आहे.

मानवाची अतिरिक्त जीवनशक्ती अत्युत्कट अशा काव्योद्गारातून आविष्कृत होत असते असे मानून श्री. सरदेशमुख, रविंद्रनाथ, वर्डस्वर्थ आणि टी. एस्. इलीयट यांच्या काव्यविषयक विचारामधे कसे साधर्म्य आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करतात. या साधर्म्याला देखील अध्यात्माची झिलई आहे व परिणामत: श्री. सरदेशमुखांना निश्चित काय सुचवावयाचे आहे हे समजणे कठीण होऊन गेलेले आहे. इतकेच नव्हे तर वर उल्लेखिलेल्या कवींच्या काव्यविचारांचे, त्यांचे आकलनही सदोष आहे अशी शंका येते.

आपला हा विचार स्पष्ट करीत असताना श्री. सरदेशमुखांनी भाव आणि भावना आणि काव्यनिर्मिती-मागील 'मन' या संस्थेचे स्थान व कार्य यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विश्ले-षणातील सदोषता समजून घेणे आवश्यक आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने स्वयंभू आणि स्वतंत्र अशा आत्म्याचा मनाच्या माध्यमातूनच जड आणि परतंत्र अशा शरीराशी संबंध येत असतो असे लेखक मानतात. संवेदनांची संघटना करणे, त्यांचे विश्लेषण करून, निवड करून आणि त्यांना अर्थ बहाल करून मग त्यांचा स्वीकार अगर इन्कार करणे इ. काहीशा यांत्रिक स्वरूपाच्या क्रिया मनाकडून घडत असतात असे त्यांचे म्हणणे आहे. संज्ञेतूनच प्रज्ञा परिणत होत असते. आणि मधेच बौद्धमताचा हवाला देऊन मनही सर्व गोष्टींप्रमाणे क्षणिक असते असे आपल्याला सांग-ण्यात येते. (वास्तविक हे विधान करण्याची या ठिकाणी काहीच गरज नव्हती). या सर्व विचारधारे-मागील मौज अशी आहे की मन ही शरीरापासून पूर्णपणे वेगळी अशी 'एकता' (entity) मान-ण्यात आली असून तिचे स्थान मात्र शरीरान्तर्गतच मानले गेले आहे. इतकेच नव्हे तर 'मन' या संस्थेचे कार्य देखील ज्याला आपण 'यांत्रिक' म्हणू अशा स्वरूपाचेच आहे. खरे म्हणजे मनाचे म्हणून जे कार्य वर सांगण्यात आले आहे ते सर्व काम मानवी मस्तिष्का-कडून होत असते असे आधुनिक स्नायुशास्त्र व मानसशास्त्र यांनी मान्य केले आहे. परंतु आदर्शवादी तत्त्वज्ञानाने मन ही एक स्वतंत्र एकता कल्पून तिला शरीरनिरपेक्ष मानले आहे. तथापि, त्याच्या कार्य-प्रणालीचे नियम (Laws of function) मात्र शारीरीय अथवा जडस्वरूपच आहेत. सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ गिलबर्ट राईल याने या विचारसरणीला 'ghost in the machine' असे संबोधले आहे. "Mind is thought of as a ghost in the sense that it is regarded as immaterial; but it is believed to press levers, open windows, receive shocks, and exert reactions much as if it were material." ज्या पद्धतीने आपण भाषेचा वापर करतो त्यात 'मानसिक प्रक्रिया', 'मानसिक घटना' इ. शब्द आपण वापरतो; व परिणामत: 'भौतिक घटना' अथवा 'भौतिक प्रक्रिया' यांच्याप्रमाणेच मानसिक गोष्टी घडत असतात असे आपण कळत न कळत मानत असतो. हा एकप्रकारचा वाक्प्रचार प्रमाद (solecism) आहे. ॲरिस्टॉटलच्या परिभाषेत ही एक 'कॅटेगोरिकल मिस्टेक' (categorical mistake) होईल. श्री. सरदेशमुखांची मना-विषयीची ही संकल्पना या दृष्टीने सदोष आहे असेच म्हणावे लागेल.

या शिवाय, वर सांगितल्याप्रमाणे त्यांनी याच संदर्भात बौद्धमताचाही उल्लेख केला आहे. या मतानुसार मनही क्षणिक मानले आहे. पण या मताचा सौंदर्य-शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास या आधारावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कलानिर्मिती शक्य अथवा संभवनीय आहे अगर नाही याचा श्री. सरदेशमुखांनी मुळीच विचार केलेला नाही. बौद्धकला आजही अस्तित्वात आहे हे यावरील उत्तर नव्हे हे सांगण्याची गरज नाही. एकदा मन क्षणभंगुर मानले व प्रत्येक अनुभूती स्वयंभू, स्वतंत्र आणि भूत व भविष्य यांनी अभिसंधित न झालेली मानली म्हणजे मग 'स्मृती' नामक अशी काही चीजच शिल्लक राहत नाही. आणि स्मृतीच्या पूर्ण, निखळ, अनुपस्थितीत कालाविष्कार (कालानुभव असे मी म्हणत नाही) संभवनीय असू शकत नाही. 'क्षणिक मानसीय स्फुंदनाची साखळी' असे श्री. सरदेशमुख याचे वर्णन करतात. पण ही साखळी आहे हे कशावरून ? दोन स्फुंदनांना साखळणारा दुवा कोणता ? या उलट परस्परविभिन्न आणि परस्परनिरपेक्ष अशा अनुभूतींचा तो एक ओघ, एक अनुक्रम असतो. कदाचित कलानुभव अशा स्वरूपाचा असू शकेल. तेही निश्चित नाही. पण काव्याविष्कार स्मृतीला या ना त्या स्वरूपात मानल्याशिवाय शक्य नाही. शिवाय, भारतीय दृष्टिकोन आणि बौद्ध मत यांपैकी श्री. सरदेशमुख कोणते ग्राह्य मानतात हेही स्पष्ट झालेले नाही. बौद्धमत जर त्यांनी मानले तर यापुढील त्यांचे सारे विवेचन अनावश्यक आणि अप्रस्तुत ठरते. पण ज्या अर्थी त्यांनी हा प्रपंच केला आहे त्या अर्थी त्यांना भारतीय दृष्टिकोन अधिक मान्य आहे हे मान्य करून चालावयास हरकत नसावी.

या त्यांच्या विवेचनाच्या आरंभीच त्यांनी 'प्रवृत्ती' या शब्दाची 'प्रतिक्षिपांची संघटित व सुसंबद्ध' प्रतिक्रिया म्हणजे प्रवृत्ती अशी व्याख्या केली आहे. दुसऱ्या शब्दात 'प्रतिक्रिया म्हणजे प्रवृत्ती' असे लेखकाचे मत आहे. ही एक दुर्दैवी व्याख्या आहे असे मला वाटते. ज्यावेळी एखाद्या व्यक्तीची एखाद्या विशिष्ट उद्दीपकाच्या संदर्भात नेहमीच तीच आणि एकाच प्रकारची प्रतिक्रिया होत असते त्यावेळी आपण त्याला प्रवृत्ती म्हणतो. परंतु याचा अर्थ सर्वच प्रतिक्रिया 'प्रवृत्ती' असतात असा होत नाही. प्रवृत्ती ही प्रतिक्रिया असते; मात्र दरेक प्रतिक्रिया ही प्रवृत्ती असेलच असे नाही. पण श्री. सरदेशमुखांनी सरसहा असेच मानलेले दिसते. तसेच भाव आणि भावना यांमधे त्यांनी जो तथाकथित सूक्ष्म फरक केलेला आहे तो देखील असाच सदोष वाटतो. 'भावना ही मूल-भावाची प्रवाही स्थिती होय' अशी त्यांची व्याख्या आहे. याचा अर्थ असा की भावना-निरपेक्ष अशा संदर्भात आपल्याला 'मूल-भावाची' जाणीव होत असते असे लेखक मानतात. पण अशी-भावनेच्या अवस्थेत नसलेली मूल-भावाची जाणीव आपल्याला कशी आणि केव्हा होते हे मात्र त्यांनी स्पष्ट केलेले नाही. आणि जर अशाप्रकारची भावनानिरपेक्ष जाणीव होतच नसेल तर मूल-भावाला वेगळे-एखाद्या कोठाराप्रमाणे अस्तित्व असते असे मानण्याला काहीही पुरावा नाही. ते केवळ एक अनुमान होईल; पण त्याला आधार नाही व अपरिहार्यताही नाही. आपल्या मनामधे कुठेतरी मूल-भावांचा एक अक्षय खजिना आहे अशा स्वरूपाची एक भोळी कल्पना या विचारामागे दडलेली दिसते. हर्ष आणि आनंद, राग आणि चीड, हुरहुर आणि काळजी अशा शब्दांतून सूचित होणाऱ्या तरल आणि सूक्ष्म मूल-भावांची उपस्थिती सतत मनामधे असते असे या सिद्धान्तानुसार मानावे लागेल. खरे म्हणजे वरील शब्दांतून व्यक्त होणाऱ्या मूल-भावातील भेद कित्येकदा तीव्र अशा आत्मपरीक्षणातूनही समजणे कठीण असते. आणि आपल्या भाषेमधे असलेल्या असंख्य शब्दांतून व्यक्त होणाऱ्या तरल, सूक्ष्म आणि पुसट अशा सर्वच्या सर्व भावनांचे मूल-भाव मानवी मनात अस्तित्वात असतात असे मानणे व्यावहारिक वाटत नाही. व वर स्पष्ट केल्याप्रमाणे तसे मानण्यास कोणताही पुरावा नाही. एरोल बेडफोर्डने म्हटल्याप्रमाणे What evidence is there for the existence of a multitude of feelings corresponding to the extensive and subtle linguistic differentiation of our vocabulary for discussing emotions ? इतकेच नव्हे तर विविध भावनांना वेगवेगळी स्वतंत्र आणि अनन्यसाधारण अशी भावनिक जाणीव जोडलेली असते असे देखील आज सामान्यपणे मानले जात नाही. "There is little evidence that a peculiar, unique type of consciousness accompanies and identifies the different emotions." या दृष्टिकोनातून बघितल्यास श्री. सरदेशमुखांच्या विधानाला अर्थ उरत नाही.

याच ठिकाणी आणखी एका मुद्याचा विचार करणे आवश्यक आहे. श्री. सरदेशमुखांसोबत कलानिर्मितीच्या संबंधात अथवा कलास्वादाच्या बाबतीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होणारे भावोद्दीपन अगर ' भावप्रवाहन ' कलाकाराच्या अथवा रसिकाच्या मनःकोषात होत असते असे मानले तर कलानुभूती आणि कलास्वाद संपूर्णपणे व्यक्तिनिष्ठ ठरतो इतकेच नव्हे तर कलावस्तू आणि कलाकाराची किंवा रसिकाची भावावस्था यांच्यामधील कार्यकारण-स्वरूप सिद्ध करणारा कोणताही दुवा सिद्ध करता येत नाही. फार काय, कलाकार अथवा रसिक यांच्या मनात निर्माण होणारी भावावस्था कलावस्तू-मुळे निर्माण झाली आहे असे देखील तर्कशुद्धपद्धतीने म्हणता येत नाही. क्लाईव्ह बेल, रोजर फ्राय, क्रोचे, कॉलिंगवुड इ. सौंदर्यशास्त्रज्ञांचे कलाविषयक सिद्धांत मानण्यामधे हीच महत्त्वाची अडचण आहे. अशा सिद्धांतांमधे परिणामाच्या स्वरूपातच कलावस्तूचे मूल्यांकन होत असते. आणि ज्याला आपण परिणाम म्हणून ओळखतो त्याचे कार्याशी निश्चित नाते आपल्याला समजलेले नसते. दुसऱ्या शब्दात, कलेचे मूल्यमापन म्हणजे रसिकाच्या आत्मचरित्रातील काही घटनाच ठरतात. A aesthetic theory it is open to exactly the same objections as the expressionist theory. It shifts the focus of attention away from the work of art to its alleged effects. परिणामतः भावानुभव कलामूल्य ठरवू शकेल किंवा काय याचाही विचारच करावा लागेल. ओटो बेन्स्च, आल्ड्रीच, सुसान लँगर इ. आधुनिक सौंदर्यशास्त्रज्ञांनी याच प्रश्नाची उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचा विचार करण्याची या ठिकाणी गरज नसली तरी श्री. सरदेशमुखांना ही शंका चाटून गेलेलीही दिसत नाही ही गोष्ट नमूद करणे भाग आहे.

आतापर्यंत ज्या भावना-विचारांचे खंडन करण्यात आले त्याच्याच आधारावर श्री. सर-देशमुखांनी ईलियट, वर्डस्वर्थ आणि रविन्द्रनाथ यांच्या काव्यविचारांचे तौलनिक विश्लेषण करण्याचा जो प्रयत्न केला आहे तोही योग्य वाटत नाही. रवि-द्रनाथ, वर्डस्वर्थ आणि ईलियट यांच्यामधील फरक वरवरचा आहे आणि अंततोगत्वा या सर्वांच्या विचारा-मध्ये एक सामान्य दुवा आहे असे सुचविल्याचा भास या संपूर्ण विवेचनातून झालेला आहे. ईलियटने एक सुव्यवस्थित, सुसंघटित अशी समीक्षापद्धती निर्माण केली असे आज सर्वच मानतात असे नाही. इतकेच नव्हे तर हे न मानणारेच अधिक आहेत. तसेच या समीक्षेमधील काही उणीवा, विचारदोष व त्यांच्या पोटी जन्मलेले आंतर्विरोध यांचाही आजकाल प्रकर्षाने विचार होत आहे. अशा परिस्थितीत श्री. सर-देशमुखांनी केलेले विवेचन अचूक आहे असे वाटत नाही. व्यक्तिमत्व अथवा ' परसनॅलिटी ' या शब्दाची श्री. सरदेशमुखांना अभिप्रेत असलेली व्याख्या या ठिकाणी सापडत नाही. आधुनिक मानसशास्त्राने केलेली जी व्याख्या आहे ती प्रामुख्याने वर्तनवादी असून तीत व्यक्तीच्या व्यावहारिक जगातील उद्दी-पकांच्या प्रति करण्यात आलेल्या प्रतिक्रियांचाच प्रामुख्याने समावेश करण्यात आलेला आहे. अशी व्याख्या मान्य केल्यास एखाद्या उत्कट परंतु लहानशा भावकवितेतून कवीचे सारेच्या सारे व्यक्तित्व आवि-ष्कृत होऊ शकते असे मानणे विशेष पटण्यासारखे वाटत नाही. फार फार तर त्यातून एक अल्पकालीन भावनोद्रेक प्रकट झाला आहे असे म्हणता येईल. पण याला व्यक्तिमत्वाचा आविष्कार म्हणून संबोधिता येईल असे वाटत नाही. परंतु श्री. सरदेशमुखांनी भावनेचे जे स्वरूप गृहीत धरले आहे तेच मुळात ईलियटला मान्य होण्याजोगे वाटत नाही. खरे म्हणजे ज्याला उत्तप्त अगर उत्कट असा भावावेग म्हणता येईल अशी अवस्था काव्यनिर्मितीसाठी योग्य आहे असेच ईलियटला मान्य नाही. भावनाविष्कारा-वर त्याने कधीच भर दिलेला नाही. काव्याचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरविण्याचा मापदंडही त्याच्या दृष्टीने भावनाविष्काराची उत्कटता हा नाही. मात्र श्री. सर-देशमुखांचे प्रमेय मान्य केल्यास हाच मापदंड मानावा लागेल. फीलिंग आणि इमोशन असे दोन शब्द ईलियटने सतत वापरले आहेत. आणि त्याच्या दृष्टीने ईमोशन ही काव्यवस्तूच्या घाटामध्ये-स्ट्रक्चर (structure)-मध्येच केवळ असते. या उलट ज्याला फीलिंग म्हणता येईल ते कवीच्या जाणीवेच्या कक्षेत असेलच असे नाही. नेणीवेमध्ये असण्याचा संभव आहे. हे एकदा लक्षात घेतल्यास श्री. सरदेशमुखांनी आधारासाठी घेतलेला भावनाविचार मुळातच ईलियटला कसा अमान्य आहे हे सहज दिसून येईल. त्याची ' ऑब्जे-क्टिव्ह को रिलेटिव्ह 'ची कल्पना देखील याच विचा-राशी बांधलेली आहे. भावना नेहमी objective Co-relative मधून निर्माण होत असते; तिचा आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवीच्या प्रत्यक्ष भावानुभूतीचा तसा संबंध नाही असेच तो मानतो. आणि नेमके हेच, त्याच्या दृष्टीने हॅम्लेट-मध्ये घडत नसल्याने ती शोकान्तिका फसलेली आहे असे तो मानतो. त्याच्या प्रस्तुत मताशी आपल्याला काही करावयाचे नाही. केवळ त्यातून दिसून येणारा त्याचा समीक्षाविचारच काय तो बघावयाचा आहे. ज्याला श्री. सरदेशमुख व्यक्तिमत्व मानतात ते ईलियटला मुळीच अभिप्रेत नाही व त्याचा काव्याच्या श्रेष्ठकनिष्ठपणाशी सुतराम संबंध नाही हे ईलियटच्या या वाक्यावरून दिसून येईल. "...... The mind of the nature poet differs from that of the immature one not precisely in any valuation of 'personality' not being necessarily more interesting, or having 'more to say' but rather by being a more finely perfected medium in which special, or very veried, feelings are at liberty to enter into new combinations." शब्द, प्रतिमा आणि कल्पना यांच्या द्वारे निर्माण झालेल्या वस्तुनिष्ठ संनिकर्षातून (Objective Co-relative) भावनानिर्मिती करणे, म्हणजेच एकप्रकारचे वस्तुनिष्ठ समीकरण साधणे हेच कवीचे कार्य होय. या दृष्टीने कवीच्या व्यक्तित्वाचा प्रत्यक्ष काव्याविष्काराशी जो संबंध येईल तो कार्यकारण स्वरूपाचा नसून माध्यमाच्या स्वरूपाचाच येईल तेव्हा ईलियटच्या दृष्टिकोनातून कवी एकप्रकारचा 'कॅट्यालिस्ट' आहे. मार्क्सच्या तत्वज्ञानात वर्गसंघर्षाच्या कल्पनेचे जे स्थान आहे तेच काव्यनिर्मितीमध्ये कवीचे आहे असेच ईलियट मानतो. कार्ल मार्क्सने वर्गसंघर्षाला क्रांतीची सुईण (midwife) मानले आहे. सुईण जितकी कुशल तितके बाळंतपण यशस्वी आणि सुकर! त्याचप्रमाणे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन परम्परेच्या (tradition) संदर्भात कवी जितका संपन्न तितकाच त्याचा आविष्कार सकस, संकीर्ण आणि श्रेष्ठ!

या दृष्टीने विचार केल्यास श्री. सरदेशमुख मानतात ती व्यक्तिमत्वाची कल्पना व त्याच्या आविष्काराचा सिद्धान्त ईलियटला लागू करणे चुकीचे होईल. ईलियटचा विचार मान्य करणे अगर न करणे काही काळ बाजूला ठेवून देखील एक गोष्ट सहज ध्यानात येते व ती म्हणजे ही की त्याने निदान आपल्या काव्य-समीक्षा-विचारात अध्यात्म ओढलेले नाही. श्री. सरदेशमुखांनी गरज नसताना तसे केलेले आढळते. कवितेच्या श्रेष्ठत्वाविषयी श्री. सरदेशमुख म्हणतात, "श्रेष्ठ कवितेत प्रकट होणारी भावना अंतःशोधनाच्या तिच्या सामर्थ्यामुळे इतकी उदात्त व व्यापक झालेली असते की ती आपोआपच कवीबरोबर असंख्यांची होऊन बसते." या वाक्याशेजारीच ईलियटचे खालील वाक्य ठेवल्यास या दोन विचारातील भेद चटकन लक्षात येईल. "It is the real right thing, the power of establishing relations between beauty of the most diverse sorts; it is the utmost power of the poet."

या नंतरचे कलानिर्मिती आणि कलास्वाद यांच्या संबंधातील काहीसे प्रदीर्घ विवेचन आदर्शवादी तत्वज्ञानाला धरूनच असल्याने त्यात नाविन्य असे काहीही नाही आणि या विचारसरणीसंबंधाने प्रस्तुत लेखात यापूर्वी घेण्यात आलेल्या आक्षेपांचे निरसन याही वेळी होत नाही. त्या सर्व आक्षेपांची पुनरावृत्ती करण्याची गरज नसावी. टी. एस्. ईलियट ज्याला 'व्यक्तित्वाचा निरास' (extinction of personality) म्हणतो, तो खरा निरास नसून ते 'उन्नयन' आहे व पर्यायाने ईलियटचा शब्दप्रयोग मोठासा सुखद नाही असे श्री. सरदेशमुख वारंवार सांगतात. स्थूलमानाने विचार केल्यास ईलियटच्या मतानुसार संपन्न असलेल्या व्यक्तित्वाच्या कलाकाराचा आविष्कार–म्हणजेच जे मन उत्कृष्ट 'माध्यम' बनले आहे अशा मनाचा आविष्कार–आणि श्री. सरदेशमुख यांच्या दृष्टीने जी भावना अहंनिष्ठेच्या वर उठून साधारणीकृत झाली आहे तिची अनुभूती या दोन्ही गोष्टी एकमेकांजवळ येतात. तथापि, ईलियट व्यक्तिनिष्ठ आत्माविष्कार मानीत नसल्याने तत्संबंधी काही अडचणीतून सुटतात तर श्री. सरदेशमुख त्यांना उत्तरे देऊ शकत नाहीत. रामायण अथवा महाभारत यासारख्या भावगर्भ महाकाव्यांमधे शोध करूनही त्यांच्या लेखकाचा हा आत्माविष्कार आहे असे स्थूलमानाने देखील म्हणणे कठीण जाते; आणि ब्रॅडलेसारख्या रसिक चिकित्सकाला प्रयत्न करूनही नाटकांमधील शेक्सपियर अखेरपर्यंत माणूस या नात्यानं गवसतच नाही या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही. महान काव्यातून विराट अशा अननुभूत अशा भावविश्वाचे दर्शन घडते असे काही

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काळ मान्य करूनही हे विराटदर्शन एका आत्मनिष्ठ–नव्हे सुरवातीला अहंनिष्ठ–असलेल्या भावानुभूतीतून विकसित झालेले आहे याचे 'लिंग' निदान काव्यात तरी आढळून येत नाही. हा केवळ कयास ठरेल. पण त्याला आधार नाही. तसेच काव्यास्वाद रसिकाच्या सुजाणतेपणावर अवलंबून असतो हे एका मर्यादेपर्यंत मान्यच करावे लागणार. परंतु रसिकाचा 'जीवितानुभव' यांनाच जर काव्याची श्रेष्ठकनिष्ठता ठरविण्याच्या कसोटचा मानल्या तर मोठा अनवस्था प्रसंगच ओढवण्याचा संभव आहे. एकीकडे काव्याविष्कार फार मोठ्या प्रमाणात व्यक्तिनिष्ठ आहे असे श्री. सरदेशमुख मानतात, तर दुसरीकडे त्याच दमात त्याचा आस्वाद रसिकनिष्ठ असतो असेही ते सुचवितात. त्यांना म्हणावयाचे तरी काय आहे ? वर उल्लेखिलेल्या दोन कसोटचांच्या चौकटीत कलावस्तूचे वस्तुनिष्ठ मूल्यमापनच जवळजवळ असंभवनीय होऊन जाते.

व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचे श्री. सरदेशमुखांनी जे स्वरूप वर्णन केले आहे ते स्पष्ट नाही. संवेदना, अंतःप्रेरणा, विचार आणि भावना हे चार मानवाचे मूलभूत प्रकृतिधर्म आहेत असे ते मानतात. अंतःप्रेरणा (intuition) हा प्रकृतिधर्म आज सर्वमान्य आहे असे मानता येत नाही. कारण तसे मानण्यास निश्चित आधार नाही. तसेच विचार आणि भावना हे प्रकृतिधर्म परस्परांपासून पूर्णपणे वेगळे आहेत असे मानता येईल काय हाही एक प्रश्नच आहे. अर्न्स्टकझीरर सारखे काही तत्त्वज्ञ विचार आणि भावना यांचा आज दिसून येणारा विच्छेद मानवी जीवनाच्या इतिहासातील एक बरीच अलिकडची घटना मानतात. आणि तसे जर मानले तर अस्तित्वाची ती 'कॅटेगरी' होऊ शकणार नाही. या संदर्भातच नेणीव अथवा अबोधमन (unconscious) या कल्पनेचाही श्री. सरदेशमुखांनी विचार केलेला आहे. अबोधमनाची कल्पना जशी युंगने मांडली तशीच पूर्वी ती फ्राइडनेही मांडली होती. या दोघांच्या कल्पनांमधे महदंतर आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु फ्राइडपेक्षा युंगची कल्पना श्री. सरदेशमुखांना अधिक आवडण्याचे अथवा स्वीकारार्ह वाटण्याचे कारण मात्र त्यांनी सांगितलेले नाही. स्मृतीचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व आवर्जून सांगून या स्मृतीच्या द्वारेच अबोधमनातील प्रकाशशलाका मानवाला कधीकधी दृग्गोचर होत असतात. काव्यातून कधीकधी याचाच साक्षात्कार होत असतो. उदाहरणादाखल श्री. सरदेशमुखांनी कोलरीजच्या 'कुब्लाखान' (kublakhan) मधील 'Ancestral voices prophesying war !' ही व याच्या वरची ओळ दिली आहे. अबोधमनाच्या–सामाजिक अबोधमनाच्या–क्षणिक जाणीवेतून 'युगमन' (Zeitgist) प्रकट होत असतो किंवा त्या युगाचा 'आरकिटाईप' (archytype) व्यक्त होत असतो असे युंगने मानले आहे. आधुनिक कलेतून युगमन अथवा एक बदलता आरकिटाईप व्यक्त होत आहे असे युंगने अनेक पुस्तकांतून मांडले आहे. तथापि, prophesying या शब्दातून व्यक्त होणारी भविष्याविषयीची पूर्वकल्पना युंगच्या संज्ञेमधे अंतर्भूत आहे असे मला वाटत नाही.

काव्यव्यवहारातील स्मृतीचे अनन्यसाधारण स्थान व महत्त्व पुष्कळ अंशी पटण्यासारखे आहे. परंतु याच पुस्तकातील पूर्वार्धातील गोविंदाग्रजांवर लिहिण्यात आलेल्या 'काळोखातील एकान्त' या लेखात श्री. सरदेशमुखांनी जे. कृष्णमूर्तींचे काही उद्‌गार उधृत करून त्यांनी गोविंदाग्रज 'प्रचोदित' अगर 'उद्दीपित' झाले असते असे सुचविले आहे. 'स्मृती' आणि त्यासोबतच अबोधमन इ. गोष्टी जे. कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानात मुळातच बसू शकत नाहीत, ज्याला आपण दुर्दैवाने 'अनुभव' म्हणतो त्यातील 'अनु' हा प्रत्यय सुद्धा कृष्णमूर्तींना पटत नसल्याने त्याचा इंग्रजीतील पर्यायी शब्द ते (ex)perience अशा पद्धतीने लिहितात. त्यांना 'अवलोकन' मान्य आहे परंतु इंग्रजीमधे ज्याला 'परसेप्शन' (perception) म्हणतात ते मान्य नाही. कारण ती जाणीव नेहमीच बाह्य घटकांनी अभिसंधित झालेली असते. परसेप्शन परिशुद्ध राहू शकत नाही. जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा हा काहीसा विस्तार एवढ्यासाठीच केला की या संदर्भात कलानिर्मिती शक्य आहे अथवा नाही हाही एक प्रश्नच आहे. श्री. सरदेशमुख म्हणतात त्याप्रमाणे कलानिर्मितीसाठी स्मृती अपरिहार्य असेल तर वर स्पष्ट केलेल्या विचारांनी 'प्रचोदित' होता येणार नाही असे नाही. पण त्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अवस्थेत काव्यनिर्मिती असंभव होईल हे मात्र मान्य करावे लागेल.

यानंतरचे बरेचसे विवेचन आस्वादात्मक असल्यामुळे त्याला व्यक्तिगत प्रतिक्रियेचे स्वरूप आले असून त्याचा वर आतापर्यंत चर्चिल्या गेलेल्या सौंदर्यशास्त्रीय विचाराशी संबंध नाही. तेव्हा या ठिकाणी त्याचा विचार करण्याची गरज नसावी. प्रस्तुत लेखाला आधारभूत असलेल्या लेखाच्या अखेरीअखेरीस श्री. सरदेशमुख यांनी काव्यनिर्मितीमधील घटकांचा एक अनुक्रम देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि त्यावरून एक काव्यानुभव किती व्यामिश्र असतो हे सुचविले आहे. या विवेचनाच्या खोलात शिरून विचार करण्याची आवश्यकता वाटत नाही. 'भावानुभूतीचा उत्कट आविष्कार' अशी काव्याची व्याख्या जर जमेस धरली, तर लेखाच्या शेवटी दिलेला अनुक्रम मान्य होण्यासारखा नाही. त्या अनुक्रमामधे उत्कटता विरून जाईल की काय अशी भीती वाटते.

श्री. सरदेशमुख यांच्या सौन्दर्यशास्त्रीय विचारांचा या ठिकाणी परामर्श घेण्याचा एक प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत लेखासाठी त्यांचा 'कविता : सर्ग, स्थिति आणि प्रत्यय' हा लेख प्रामुख्याने आधार म्हणून वापरण्यात आला आहे हे स्पष्टच आहे. परंतु याच लेखातून त्यांनी सौन्दयशास्त्रीय चिंतन त्यातल्या त्यात सुसंघटितपणे केले असल्याने ही निवड करण्यात आली आहे. तेव्हा माझ्या लेखातील आक्षेप त्यांच्या एकूण सौन्दर्यशास्त्रीय विचारावरचे आक्षेप आहेत. तसेच पुस्तकाच्या पूर्वार्धात त्यांनी काही कवींचा पुनर्आस्वादात्मक अन्वय लावण्याचा जो प्रयत्न केला आहे त्याच्याशी त्यांच्या समीक्षाविचारांची तुलना इ. करणे जरी मनोरंजक ठरले असते तरी तसे या ठिकाणी करण्यात आलेले नाही. कारण ते लेखाच्या नियोजित कक्षेच्या बहेरचे आहे.

श्री. सरदेशमुख यांचा मराठी व इंग्रजी वाङ्मयाचा व्यासंग, जाण आणि आकलन दांडगे आहे, याचा प्रत्यय पुस्तक वाचत असताना पदोपदी येतो. त्यांचे तत्वज्ञानाचेही वाचन आहे. परंतु त्यांच्या सौन्दर्यशास्त्रीय विचारात तर्कशुद्धता मात्र दिसून येत नाही. त्यांच्याच विचारांचे काही आयाम त्यांच्या नजरेतून सुटल्यासारखे वाटतात. त्यांचा विचार त्यांच्या काहीशा काव्यात्म भाषाशैलीमुळे अधिकच ढिसाळ स्वरूपाचा झाला आहे. काव्यात्म भाषाशैलीसाठी शास्त्रीय विषयाच्या संबंधात तर्कशुद्ध विचारसरणीची किंमत देणे योग्य की अयोग्य हे अखेरीस ज्याचे त्यानेच ठरवावे लागते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी पाहिलेले महात्मा गांधी

—ह. वि. कामत

त्यांचा विचार मनात आला की माझे मन अर्ध शतक मागे जाते. त्यावेळी मी मंगलोर येथे हायस्कुलात शिकत असणारा तेरा वर्षांचा एक मुलगा होतो. एका वर्षापूर्वीच त्यांनी 'सैतानी' सरकारशी लढा देण्यासाठी, त्याच्याशी अहिंसात्मक असहयोग पुकारण्यासाठी व कष्ट सोसायला व त्याग करायला तयार होण्याविषयी देशाला आवाहन केले होते. दैवयोग असा की 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच' असा मंत्र देशाला देऊन सर्वत्र असंतोषाची चळवळ भडकवणारे लोकमान्य टिळक १९२० च्या ऑगस्ट महिन्यात स्वर्गवासी झालेले होते. त्यानंतर लगेच गांधींनी राजकारणाची सूत्रे आपल्या हाती घेतली, आणि स्वराज्यप्राप्तीसाठी त्यांनी जनमानसातील हा खदखदणारा असंतोष सत्याग्रहाच्या मार्गाने वळविला.

पहिल्या जागतिक महायुद्धाच्या वेळी गांधींनी भारताच्या राजकीय क्षितीजावर पदार्पण केले. त्यावेळी त्यांची ख्याती 'निष्क्रिय प्रतिकारवादी' आणि 'सहकारवादी' अशी होती. पण युद्धोत्तर काळात विजय–प्राप्तीमुळे चढलेल्या उन्मादाच्या भरात ब्रिटिश राजवटीने भारतात जे अत्याचार केले, जालियनवाला बाग व अन्य ठिकाणी त्यांनी जो धुडगूस घातला, त्यामुळे गांधींच्या भूमिकेत फार मोठी क्रांती घडून आली आणि ते कणखर बंडखोर बनले. 'राजद्रोह हा माझा धर्म आहे' असे त्यांनी घोषित करून टाकले. १९२०–१९२२ च्या त्या काळातील खवळत्या वातावरणाला धार्मिक पुनरुत्थानाचेच रूप प्राप्त झाल्यासारखे झाले.

१९२१ मधे गांधीजी मंगलोरात आले होते. त्यापूर्वी त्यांच्याविषयी उलट सुलट अशा इतक्या गोष्टी गावात चर्चिल्या जात होत्या की, माझ्या बाळ मनात अपार असे कुतूहल आणि उत्कंठा निर्माण झालेली होती. संध्याकाळच्या वेळी मी माझ्या काही शाळकरी मित्रांसोबत मैदानाकडे गेलो. मैदान माणसांनी फुलून गेलेले होते. गर्दीच्या मागच्या बाजूला कानी पडेल ते ऐकण्यासाठी मी उभा होतो. त्याकाळी दूर–ध्वनि–क्षेपकासारख्या उपकरणांचे नावही लोकांनी ऐकलेले नव्हते. गांधीजी अगदी खालच्या आवाजात बोलत होते. पण श्रोत्यात पसरलेल्या गाढ नि:शब्दतेत त्यांच्या भाषणातले काही शब्द, काही वाक्ये माझ्या कानापर्यंत पोचत होती. व्याख्यानातले प्रारंभीचे शब्द अजूनही मला आठवतात. ते म्हणाले होते, 'मला माझे बंधु शौकत अली त्यांच्या बरोबर भारताच्या ह्या उद्यान–भूमीतून प्रवास करायला मिळाला, ह्याचा मला फार आनंद वाटतो.' मौलाना एक प्रचंड देहाचे उंचे–पुरे गृहस्थ होते. त्यांच्यापुढे महात्मा गांधींची ती किरकोळ आणि बुटकी मूर्ती माझ्या बाल मनाला अगदी क्षुद्र अशीच भासली.

त्यानंतर गांधीजींच्या पुढे बसून त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मला मिळाली ती सोळा वर्षे उलटून गेल्यानंतर. ह्या सोळा वर्षांच्या खळबळीच्या काळात गांधीजींनी उभारलेली चळवळ चांगलीच फोफावली होती. खंडित स्वरूपात प्रांतीय स्वायत्तता बहाल करणाऱ्या १९३५ च्या कायद्याला अनुसरून देशातल्या अकरा प्रांतांपैकी सात प्रांतात कांग्रेसने १९३७ मध्ये आपली मंत्रिमंडळे बनवलेली होती. ह्याच काळात जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस भारताचे नेते म्हणून आपले सामर्थ्य सिद्ध करून दाखवीत होते. ह्यांच्यापैकी सुभाषबाबूंनी आपले राजकीय तत्त्वज्ञान आणि लढ्याचे धोरण ह्या बाबतीतले आपले धैर्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि चिकटपणा नेहरूंपेक्षा अधिक प्रमाणात प्रस्थापित करून दाखविला होता.

ह्याच सुमारास, बराचसा अंतर्विरोध सहन केल्यानंतर, एका वर्षापूर्वी लंडन येथे परीक्षेच्या चढाओढीत यश मिळवून मी १९३० मधे सनदी नोकरीत (Indian Civil Service) प्रविष्ट झालो होतो. पण हे नवे जोखड जे माझ्या खांद्यावर लादले गेले होते त्यांत मला आनंद नव्हता की सुखही वाटत नव्हते. माझ्या भारतीय आणि इंग्रज वरिष्ठांशी माझे वारंवार झगडे होत. शेवटी, १९३७ च्या शेवटी शेवटी, झाले तेवढे बस्स झाले असे मी मनाशी ठरविले, आणि महात्माजी, नेहरू व सुभाषबाबूंना पत्रे लिहून मला पुढे मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. नेहरूंनी, मी नोकरी न सोडता तशीच चालू ठेवावी म्हणून सल्ला दिला, पण नेताजींनी मोठ्या प्रेमाने माझे स्वागत केले. 'नोकरीतून बाहेर पडल्यानंतर मला भेटा' असे गांधीजींनी सांगितले. मी त्यांना मुंबई येथे जुहूवरील एका झोपडीत ते होते तेथे जाऊन भेटलो. त्या वेळी ते चरख्यावर सूत कातीत बसले होते. मित्रत्वाने स्मित करून त्यांनी माझे स्वागत केले आणि बसायला खुणावले. मी आय्. सी. एस्. मधून बाहेर पडून एक महिना झाल्यानंतरची ही गोष्ट आहे. मला कोणते काम देण्यात आले आहे ते गांधींनी मला विचारले. ऑल इंडिया कांग्रेस कमिटीच्या पार्लमेंटरी को–ऑर्डिनेशन कमिटीचा सेक्रेटरी म्हणून मी काम करतो आहे हे मी त्यांना सांगितले. त्याबरोबरच, कांग्रेसचे अध्यक्ष सुभाषबाबू यांच्या कामातही मी त्यांना मदत करतो असेही सांगितले. ते म्हणाले, 'तुमच्या महत्वाकांक्षेला एवढे पुरे असं वाटतं मला.' मी शांतपणे म्हणालो, 'सेवा करण्यापलीकडे माझी दुसरी महत्वाकांक्षा नाही.' माझ्या त्या उत्तरात उद्धटपणाचा भाग आहे असे त्यांना वाटले की नाही कोण जाणे, पण त्या महापुरुषाने जे शब्द उच्चारले ते हे,–'कार्याचे क्षेत्र किती तरी विशाल आहे, आणि काम करणारे फार थोडे आहेत.'

१९३९ च्या सप्टेंबर महिन्यात युरोपात महायुद्धाची टिपरी पडली. जर्मनीचा हिटलर आणि इटालीचा मुसोलिनी ह्यांच्या युतीविरुद्ध उभ्या ठाकलेल्या मित्र–राष्ट्रांना अडचणीत टाकू नये अशी गांधींच्या मनाची पहिली प्रतिक्रया होती. पण १९४० च्या एप्रिल महिन्यात नेताजींच्या नेतृत्वाखाली फॉवर्ड ब्लॉकने युद्ध–विरोधी मोहीम सुरू केली. त्या संघटनेचा संघटक–सचिव (Organising Secretary) म्हणून मी आणि शेकडो योद्धे पकडले जाऊन राजद्रोहाच्या व यद्ध–प्रयत्नांना विरोध करण्याच्या गुन्ह्याखाली तुरुंगात डांबले गेलो. एका वर्षानंतर तुरुंगातून सुटून आल्यानंतर मी गांधीजींना भेटण्यासाठी सेवाग्रामला गेलो. महत्त्वाचे अनेक प्रश्न होते, त्यावर मोकळेपणाने चर्चा करण्याची त्यांनी मला मोठ्या मनाने परवानगी दिली. दोस्त राष्ट्रांना अडचणीत न टाकण्याचे आपले पहिले मत आता गांधीजींनीही बदलले होते. व्यक्तिशः सत्याग्रह करण्याची हाक त्यांनी दिलेली होती, आणि विनोबा भावे, पंडित नेहरू आणि दुसऱ्या कितो तरी लोकांनी त्याप्रमाणे सत्याग्रह पुकारलाही होता. मी गांधीजींच्या पुढे . त्यांच्या झोपडीत बसलो होतो. खोलीच्या भिंती उघड्यानागड्याच होत्या. नाही म्हणायला एका भिंतीवर मात्र लक्ष वेधून घेणारे असे येशू ख्रिस्ताचे एक चित्र लावलेले मला दिसले. गांधींच्या पुढ्यातल्या डेस्कवर तीन माकडांच्या त्या प्रख्यात मूर्ती होत्या––"मी वाईट पाहणार नाही, वाईट ऐकणार नाही, वाईट बोलणार नाही ! " नेहमी प्रमाणे ते सूत कातीत होते आणि बोलत होते. त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टींपैकी एक गोष्ट त्यांनी सांगितली ती अशी,–"परदेशी घडामोडींविषयी मला फारसे काही ठाऊक नाही. पण त्या बाबतीत मी जवाहरलालवर विसंबून असतो; त्या बाबतीत ते करतील ते मार्गदर्शन स्वीकारण्यात मला समाधान आहे." ह्या थोर माणसाच्या विनम्रतेचे हे निदर्शक आहे असे मला वाटते. भेट संपल्यावर मी जायला उठलो त्यावेळी गांधीजींच्या स्वभावातली, व्यक्तिगत स्वरूपाची अशी दुसरी एक गोष्ट प्रगट झाली. त्यांनी विचारले, "तुम्हाला कॉफी आवडते का ? आवडत असली तर वा देतील तुम्हाला थोडी!" मी ह्या गोष्टीचा आभारपूर्वक स्वीकार केला. मला नुसती कॉफीच मिळाली असे नाही तर, आश्रमवासीयांबरोबर दुसरे काही खायलाही मिळाले !

गांधीजी आणि सुभाषबाबू ह्या दोहोंचाही संबंध असलेली त्या काळातली एक घटना मात्र अशी आहे की जी बऱ्याच लोकांना आवडली नाही. मला सुद्धा त्या गोष्टीने गोंधळात पाडले होते. नव्हे, तिच्यामुळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धक्काच बसल्यासारखा झाला, म्हटले तरी चालेल. १९३९ मधे त्रिपुरी काँग्रेस–अधिवेशनाचे वेळी सुभाषबाबू, प्रचंड विरोध असूनही, काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले, त्यावेळी महात्माजींच्या तोंडून जे उद्‌गार बाहेर पडले ते काहीसे विचित्रच होते. ते म्हणाले, "सुभाषचा विजय म्हणजे माझा पराजय आहे." गांधींच्या विषयी सुभाषचंद्रांना अत्यंत आदर वाटत असे. त्यांचे हे शब्द त्यांना अगदी विषाप्रमाणे दुःख देणारे वाटले असल्यास आश्चर्य काय?

समुद्रपारच्या देशातून युद्धकाळात नेताजी रेडिओवरून जी भाषणे करीत त्यात गांधीजींचा 'राष्ट्र–पिता' (Father of the Nation) म्हणून पहिला उल्लेख करणारे नेताजीच होते हे आपण विसरता कामा नये. महात्माजींनीही १९४६ मधे सुभाषबाबूंविषयी बोलताना उदारबुद्धी दाखविली ह्यात शंका नाही. ते म्हणाले होते, "नेताजींच्या जीवनापासून सर्वात मोठा धडा जो आपण शिकावा तो म्हणजे आपल्या अनुयायांच्या ठायी त्यांनी निर्माण केलेली एकत्वाची भावना. हे सर्व लोक धर्माकर्माच्या, प्रांतीयतेच्या सीमा ओलांडून वर आले आणि देशकार्यासाठी साऱ्यांनी मिळून आपले रक्त सांडले. सुभाषबाबूंनी ही एक अभूतपूर्व गोष्ट करून दाखविली आहे. तीमुळे त्यांचे नाव इतिहासात अमर होईल ह्यात शंका नाही."

परमेश्वराचे ठायी गांधीजींची अढळ निष्ठा होती. ओठावर 'हे राम!' हे शब्द घोळवीतच त्यांनी प्राण सोडला. ते खरे भक्त होते आणि कर्म–योगी होते. त्यांच्या दृष्टीने माणसाच्या हातून होणारे कर्म म्हणजे परमात्म्याच्या चरणी अर्पण केलेली पूजा, असेच होते. सर्व जीवमात्राचे ठायी एकच परमात्मा विराजमान आहे ह्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता, आणि म्हणून, ते संपूर्णपणे लोकतंत्रवादी होते असे खऱ्या अर्थाने म्हणता येईल. नैतिक आणि आध्यात्मिक मूल्ये त्यांचे ठायी पक्की रुजलेली होती.

आता मी महात्मा गांधींसंबंधीच्या माझ्या मनात असलेल्या अत्यंत स्पष्ट आणि विदारक घटनेकडे वळतो.

१९४८ च्या जानेवारी महिन्याची ती ३० तारीख होती. संध्याकाळचे साडे पाच वाजून गेले होते. कॉन्स्टिटच्युएंट असेंब्लीच्या परराष्ट्रीय व्यवहार खात्याच्या स्टँडिंग कमिटीची बैठक चालू होती. ५·४० च्या सुमारास नेहरूंना बिर्ला हाऊसमधून फोन आला आणि त्यांनी सभेचे काम अचानकपणे थांबविले. आम्ही त्या कमिटीचे सदस्य जे तेथे होतो, त्यांना त्यांनी सांगितले, "महात्मा गांधींना दुखापत झाली आहे", पण त्यांची मुद्रा फार गंभीर आणि चिंताग्रस्त झालेली होती. त्यांना कळविण्यात आलेली बातमी ह्यापेक्षा कितीतरी अधिक भीषण स्वरूपाची होती. आणि ते काही नेहरूंना आपल्या मुद्रेवरून लपविता येत नव्हते.

घडू नये ते घडले की काय, अशी भीती अंतःकरणाला जाचीत होती. नुकत्याच उलटून गेलेल्या पंधरवाड्यातील काही घटना, तसे काही घडणे असंभवनीय नाही असे सुचविणाऱ्या होत्या. मी माझ्या गाडीत बसलो आणि पंडित नेहरूंच्या मागोमाग, ती दुःखकारक घटना घडली त्या घरात फाटक लावून घेण्यापूर्वी थोडाच वेळ, जाऊन पोचलो. बाहेर लोकांचे थवेच्या थवे गोळा व्हायला लागले होते. दोघा मित्रांच्या बरोबर, पायांच्या चवड्यावर चालत चालत मी गांधीजींचा मृत देह ठेवला होता त्या खोलीत गेलो. त्यांच्या भोवती दुःखात बुडालेले गांधीजींचे अनेक शिष्य आणि अनुयायी उभे होते. त्यांच्यापैकी काही आज स्वतंत्र भारतात मंत्री–पदावर आहेत.

दोनच दिवसापूर्वी, २८ जानेवारी रोजी ह्याच घरात मी महात्माजींची भेट घेतली होती. त्यावेळी ते किती आनंदी दिसले होते! थट्टा–मस्करी करीत ते आपल्या शाश्वत अशा श्रद्धेची आणि धैर्याची आनंदी किरणे आजूबाजूला पसरवीत होते — आणि आता तेच गांधीजी हुतात्मा बनून अनंतात विलीन झालेले त्या ठिकाणी पडलेले होते! इहलोकचा त्यांचा प्रवास संपला होता. त्यांच्या त्या शांत मुद्रेकडे पाहिल्यानंतर, एक युग संपले असे वाटल्यावाचन मला वाटले नाही.

देशाचे विभाजन होऊ देण्याच्या गांधीजी विरुद्धच होते. तसे होणे म्हणजे देशाला कापून त्याचे तुकडे करणे होय, असे ते म्हणत. तसे काही होणे म्हणजे आपले अविभाज्य भारताच्या आणि हिंदु–मुस्लिम ऐक्याच्या स्वप्नावर जबरदस्त आघातच होय, असे त्यांना वाटे. पण शेवटी, आपल्या राजकीय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वारसांच्या—जवाहरलाल नेहरूंच्या, आणि सरदार वल्लभभाई पटेलांच्या—आग्रहाला त्यांना अत्यंत नाखुशीने मान तुकवावी लागली. इंग्रजांचे या देशातून उच्चाटण होऊन सत्ता हाती घेण्यासाठी हे लोक उतावीळ झालेले होते. 'भारत छोडो'ची जी ललकारी महात्माजींनी १९४२ मध्ये ठोकली होती ती १९४७ मध्ये फळाला आली खरी, पण थोड्या फरकाने. ब्रिटिशांनी भारत सोडून जाण्याचे ठरविले खरे, पण ते, देशाचे तुकडे पाडल्यानंतर! नेताजी सुभाषचंद्र बोसांनी व त्यांच्या आजाद हिंद फौजेने देशाच्या बाहेरून 'चलो दिल्ली!' ची जी हाक दिली आणि जिच्या पाठोपाठ ज्या परिणामकारक गोष्टी घडल्या त्यामुळे ब्रिटिशांचा भारत सोडण्याचा निर्णय त्यांना त्यांच्या अपेक्षेपेक्षा अधिक लवकर अमलात आणणे भाग पडले, यात संशय नाही.

फारच दडपण आले तेव्हा शेवटी गांधीजींनी त्या गोष्टीला आपली मान्यता दिली असली तरी देशाचे विभाजन आणि पाकिस्तानची निर्मिती यामुळे त्यांच्या हृदयातली एक महत्त्वाची साखळीच तुटल्यासारखी झाली होती. आणि नंतर जेव्हा लुटालूट जाळपोळ, खून यांचे रक्तबंबाळ युद्ध सुरू झाले तेव्हातर त्यांचे हृदय अक्षरश: विदीर्णच झाले. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याचा त्यांना काहीच आनंद नव्हता. उलट, आपल्याभोवतालचे सारे जगच कोसळून पडते आहे असेच त्यांना वाटत होते. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर सुमारे सहा महिने ते जिवंत होते पण मनाने ते स्वातंत्र्य मिळाले त्याच दिवशी मेले होते.

गांधीजी चलाख मुत्सद्दी होते, पण टिळक आणि अरविंदांप्रमाणे त्यांनी राजकारणाला आध्यात्मिक वळण देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लिहून ठेवले आहे,— "माझ्या सत्यावरील भक्तीने मला राजकारणाच्या क्षेत्रात खेचून आणले. धर्माचा आणि राजकारणाचा काहीही संबंध नाही असे म्हणणाऱ्यांना धर्म काय ते कळलेच नाही, असे मी अगदी नि:शंकपणे पण तितकेच नम्रपणे म्हणू शकतो." धार्मिक म्हणा, राजकीय म्हणा, आर्थिक म्हणा, सामाजिक म्हणा, शिक्षणविषयक म्हणा, सांस्कृतिक म्हणा, फार काय घरगुती आणि स्वयंपाक पाण्याच्या गोष्टीसंबंधीही माणसाच्या जीवनात ज्या ज्या गोष्टीचा संबंध येतो त्या प्रत्येक गोष्टीसंबंधी गांधींनी मन घालून विचार केला आणि काही ना काही नवीन केले.

देशाच्या राजकारणात आज जे ध्येयशून्य, असद्हेतूंनी प्रेरित झालेले आणि हिंसात्मक स्वरूपाचे जे गोंधळ सुरू आहेत ते मात्र गांधीजींना कधीही मानवले नव्हते असे मी नि:शंकपणे म्हणू शकतो. ह्या परिस्थितीवर त्यांनी जो तोडगा काढला तो, आपले सहकार्य काढून घेऊन या सर्व अश्लाघ्य प्रकाराला शांतपणे विरोध करण्याचा, कधी-कधी तर मला वाटायला लागते की, गांधीजी म्हणजे माणसाच्या मूलभूत सत्प्रवृत्तीवर विश्वास ठेवणारा, परमेश्वरावर अमाप श्रद्धा असलेला एक फार मोठा तत्त्वज्ञानी बंडखोर पुरुष होता. या खऱ्या खऱ्या शूर सत्याग्रही पुरुषाचे निष्काम कर्म, साधना आणि श्रद्धा अशा तीन गुणांनी बनविलेले कवच होते असे म्हणायला हरकत नाही. सरकार कोणतेही असले तरी शेवटी त्याच्या सत्तेचे अधिष्ठान हिंसाचाराचेच असते; त्यामुळे, शहाणपणाचा सल्ला देण्यापलीकडे गांधीजींनी कोणत्याही सरकारशी दुसऱ्या स्वरूपात नाते जोडण्याचे सदैव नाकारले. चांगल्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी अंगावर घेतलेल्या कोणत्याही सरकारला शेवटी वाईट करणाऱ्याला शिक्षा ठोठावण्याखेरीज गत्यंतरच नाही.

मनुष्यमात्राच्या अंगी असलेल्या अनेक उणीवा आणि दोष गांधीजींच्या अंगीही होते. पण त्यांच्या अंगच्या बुऱ्यालाही भले करून सोडण्याच्या जादूचा गुण असा की, त्यात त्या दोषांचा कुठे ठावठिकाणाही लागत नाही. त्यांनी हाताळला नाही असा एकही विषय नाही आणि ज्या गोष्टीला त्यांनी हात घातला तिचे रूपच आमूलाग्र बदलून सोडल्यावाचून ते राहिले नाहीत. त्यांच्या अंगी चिवटपणे लढा देण्याचा गुण होता, पण त्यांचे हात साफ, मन स्वच्छ आणि अंत:करण द्वेष-मत्सरशून्य होते. स्वभावाने ते गरीब, दुसऱ्यापुढे मान तुकावणारे होते, पण या मृदू स्वभावातही दृढ निश्चयीपणाची विलक्षण कठोरता भरलेली होती. पददलितांचा, दरिद्र्यांचा, उध्वस्त झालेल्यांचा त्यांच्यासारखा सच्चा कैवारी दुसरा मिळणे दुरापास्त.

ह्या निर्भय मनाच्या, नुसता पंचा गुंडाळणाऱ्या दुर्बल शरीराच्या पण अध्यात्मिकतेच्या दगडी घडणीत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक–परीक्षण

अक्षरमाधव*

समालोचक–डॉ. वा. वि. मिराशी

विदर्भाचे थोर दिवंगत पुढारी पद्मविभूषण लोकनायक डॉ. माधव श्रीहरि अणे यांच्या राजकारणेतर विषयांवरील लेखांचा हा संग्रह विदर्भ साहित्य संघाच्या वणी शाखेने काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केला. त्याचे संपादन वणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. राम शेवाळकर यांनी केले आहे.

कै. बापूजींच्या लेखांचा हा संग्रह पहिला नव्हे. यापूर्वी सन १९३१ साली त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि अनुयायांनी त्यांच्या लेखांचा आणि भाषणांचा मोठा संग्रह साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांच्या प्रस्तावनेसह प्रकाशित केला होता. तो माझ्या पाहण्यात आला नाही. त्यातील काही लेख प्रस्तुत संग्रहात घेतले आहेत असे 'परिशिष्ट २' यावरून कळते, पण इतर बरेच लेख बापूजींनी १९३१ नंतर लिहिले होते. प्रत्येक लेखाचे प्रसिद्धिस्थळ 'परिशिष्ट २' मध्ये दिले आहे. ते त्या त्या लेखाच्या आरंभी तळटीपेत दिले असते तर बरे झाले असते.

प्रस्तुत संग्रहात बापूजींच्या एकूण २२ लेखांचा समावेश केला आहे. त्यांपैकी ९ लेख विविधविषयक ग्रंथांना प्रस्तावनारूपाने लिहिले होते. या ग्रंथांमध्ये धर्म, वाङ्मय, इतिहास, चरित्र, संशोधन इत्यादी विषयांची चर्चा आहे. बापूजींचे सर्व आयुष्य राजकारणाच्या धकाधकीत गेले असल्याने त्यांना एखादा आपल्या आवडीचा विषय घेऊन त्यावर प्रदीर्घ ग्रंथरचना करण्यास फुरसत मिळाली नाही. तथापि, त्यांच्या बुद्धिमत्तेचा विविध विषयात अक्षुण्ण संचार ज्यांना माहीत होता ते त्यांस आपापल्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिण्याविषयी आग्रह करीत. आणि अंगीकृत कार्यात चालढकल करणे बापूजींच्या स्वभावातच नसल्यामुळे ते प्रत्येक विषयाचा सांगोपांग अभ्यास करून त्यावरील आपले मौलिक विचार प्रस्तावनेत मांडीत असत. म्हणून त्यांच्या प्रस्तावनांना मौलिक ग्रंथांचे महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रस्तुत संग्रहाला प्रा. शेवाळकरांनी 'अक्षरमाधव' असे मोठे सार्थ नाव दिले आहे. कारण त्यात बापूजींच्या चिरकाल टिकणाऱ्या वाङ्मयाचा समावेश केला आहे. आणखी कितीतरी बापूजींचे वाङ्मय संग्रहीत व्हावयाचे आहे. बापूजी 'यास्तेषां स्वैर-

* संपादक–प्राचार्य राम शेवाळकर
किमत रु. १०–००; पृष्ठसंख्या ३५०
प्रकाशन–वि. सा. संघ शाखा, वणी

(मागील पानावरून पुढे चालू)

घडविलेल्या मनुष्याला केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळन समाधान नव्हते. त्यांचा उद्देश होता मनुष्याच्या अंतःकरणात आणि विचारात एक आमूलाग्र फरक घडवून आणण्याचा. हा फरक असा असावा अशी त्यांची इच्छा होती की ज्यामुळे परमेश्वराची सारी टाकून दिल्यासारखी झालेली लेकरे, सुखी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी प्राप्त करून घेऊ शकतील. गांधीजी मरण पावले त्यावेळी असे काही होणे दृष्टीच्या टप्प्यात नव्हते. ह्या महापुरुषाच्या जन्म शताब्दीच्या ह्या वर्षात मी म्हणू शकतो ते एवढेच की, ज्या मूलग्राही आणि चिरंतन तत्त्वांचा त्यांनी आमरण प्रचार केला आणि ज्यांचा त्याने आपल्या आयुष्यात प्रत्यक्ष आचारही केला त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे भारताने आणि अखिल मानव–समुदायाने आत्मघात करून घेण्यासारखेच ठरेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कयास्ता एव भवन्ति काव्यानि ' या कोटीतील सहृदय विद्वान् होते. त्यांची घाईत लिहिलेली पत्रेही वाङ्मयीन महत्त्वाची ठरली आहेत. एकच उदाहरण देतो. श्री. भाऊसाहेब माडखोलकरांच्या ' माझे आवडते लेखक ' या पुस्तकाचे त्यांनी घाईघाईत रात्री जागून लिहिलेले परीक्षण त्यांच्या निधनानंतर तरुण भारताच्या २८–१–६८ च्या अंकात प्रकाशित झाले आहे त्याचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पत्रिकेत संपादकांनी ते पुनर्मुद्रित केले आहे. ते परीक्षण प्रस्तुत लेखसंग्रहात कसे समाविष्ट केले नाही याचे मला आश्चर्य वाटते. तरुण भारतात ते परीक्षण प्रसिद्ध करताना माडखोलकरांनी म्हटले होते की बापूजींची अशी अनेक पत्रे आपल्या संग्रहात आहेत. प्रा. शेवाळकरांना माझी अशी विनंती आहे की त्यांनी ही पत्रे व अप्रकाशित इतर महत्त्वाचे लेख यांचा संग्रह 'अक्षर–माधव, भाग दुसरा' या नावाने प्रसिद्ध करावा. मात्र तसे करताना छपाईच्या शुद्धतेकडे कसोशीने लक्ष द्यावे. प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी सुमारे १५० अशुद्धे शुद्ध केली आहेत. पण त्यातही सर्व मुद्रणदोषांचा अंतर्भाव झाला नाही. इंग्लंड–अमेरिकेत छापलेल्या ग्रंथांना क्वचितच शुद्धिपत्र असते. मुद्रणाचा हा दर्जा भारतात केव्हा साध्य होणार ?

प्रस्तुत लेखसंग्रहाला बापूजींचे सहकारी मित्र श्री. शं. न. आगाशे यांनी ' लोकनायक जीवनदर्शन ' नामक बापूजींचे संक्षिप्त चरित्र जोडले आहे. स्वतः बापूजींनी आपल्या जीवनातील काही घटनांचे, लो. टिळक आणि म. गांधी यांच्या विषयी आपणास वाटत असलेल्या नितान्त आदरांचे केलेले हृद्य वर्णन 'परिशिष्ट १' मध्ये दिले आहे. श्रेष्ठ साहित्यिक आणि बापूजींविषयी निरतिशय आदर बाळगणारे श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांची सविस्तर प्रस्तावना प्रस्तुत संग्रहाला लाभली आहे. त्यात त्यांनी बापूजींच्या राजकीय आचारविचारांचे विविध पैलू विशद केले आहेत. राजकारण हा माझा विषय नसल्यामुळे मी त्या पैलूंविषयी काही लिहू शकत नाही, पण प्रस्तुत संग्रहातील काही लेखांविषयी अल्प चर्चा करतो.

प्रस्तुत ग्रंथातील विविध लेखांचे वाचन केल्यावर वाचकांच्या मनावर पहिला ठसा उमटतो तो बापूजींच्या चतुरस्र बुद्धिमत्तेचा. त्यांचा जन्म वेदविद्येविषयी प्रख्यात अशा ब्राह्मणकुलात झाला होता. आपले आजोबा अकाली स्वर्गवासी झाले नसते तर आपण वैदिक झालो असतो असे त्यांनी आत्मकथनात म्हटले आहे. पुढे ते इंग्रजी शिक्षणाकडे वळले तरी त्यांनी संस्कृत भाषेचे आणि वेदविद्येचे खोल अध्ययन चालू ठेविले होते. त्यांनी आपले गुरू लो. टिळक यांचे समग्र चरित्र १२००० संस्कृत श्लोकात रचले आहे. ते तीन भागात प्रकाशित होत आहे. त्यावरून त्यांच्या संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाची आणि कवित्वशक्तीची प्रतीती येईल. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी ठिकठिकाणी वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, सूत्रग्रंथ, स्मृती यांचे उतारे स्वमतप्रतिपादनार्थ उद्धृत केले आहेत. त्यावरून त्यांच्या मार्मिक अध्ययनाची कल्पना येते. पण त्याबरोबरच इतरही विषयात–उदाहरणार्थ, तत्त्वज्ञान, इतिहास, मराठी वाङ्मय, मौलिक संशोधन इत्यादिकांत–त्यांचे मन तसेच रमत असे हे प्रस्तुत ग्रंथांतील विविध लेखांवरून दिसून येते. कोणत्याही विषयाचा विचार करताना त्यांची प्रज्ञा स्वतंत्र असे. लो. टिळक त्यांचे राजकारणातील गुरू खरे, पण महाभारत बुद्धोत्तरकालीन आहे ही त्यांची समजूत चुकीची आहे हे त्यांनी स्पष्टपणे आपल्या मौलिक संशोधनाने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे (पृ. १८९).

प्रस्तुत ग्रंथातील सर्व लेखांचा परामर्श घेणे या समालोचनात शक्य नाही. तथापि काही प्रमुख लेखांतील त्यांच्या विचारांचे दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न करू.

प्रस्तुत संग्रहातील पहिला लेख गणपती देवतेवर आहे. गणपती ही विद्येची देवता व विघ्ननाश करणारी. तेव्हा त्या देवतेविषयीच्या लेखास अग्रक्रम द्यावा हे उचितच आहे. या देवतेविषयी खूपच लिखाण झाले आहे. ही देवता मूळची आर्यांची नव्हती कारण तिच्या गजवदनाचा उल्लेख ऋग्वेदात येत नाही. या देवतेचे पूजक टॉटेमिस्ट अनार्य होते. गज हे त्यांचे वंशचिन्ह होते असे बापूजींनी म्हटले आहे. पुढे त्या अनार्य लोकांनी आर्यसंस्था मान्य केल्या, त्यांच्यामधील व आर्यांमधील विरोध नाहीसा होऊन ते प्रेमाने एकत्र बंधूप्रमाणे राहू लागले. याचे कारण त्यांच्या उपास्याला वैदिक देवतांच्या गुणांचे अलंकार चढवून व सर्व मंगलप्रसंगी त्याला आद्य स्थान देऊन आर्यांनी आपल्या संस्कृतीत नवीनच प्रविष्ट झालेल्या आपल्या बंधूंची समजूत घातली आणि त्या देवतेची उपासना दोन्हीही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पंथांनी सारखीच सुरू ठेवली (पृ. ३२-३३). अशी गजाननापासूनची उपपत्ती बापूजींनी लावली आहे. हिंदुधर्मात गणपतीची उपासना कशी व केव्हा उत्पन्न झाली याची उपपत्ती अनेकांनी अनेक प्रकारांनी लावली आहे. या बाबतीत याज्ञवल्क्य स्मृती, कोरीव लेख व आद्य संस्कृत वाङ्मय यांच्या पुराव्यावरून असे दिसते की, गजाननाची दैवत म्हणून पूजा खिस्तोत्तर चौथ्या-पाचव्या शतकापर्यंत सर्रास सुरू झाली नव्हती. या प्रश्नाची चर्चा माझ्या संशोधनमुक्तावलीच्या काही सरांत केलेली आढळेल.

बापूजींनी वाङ्मयाची व्याख्या अशी केली आहे— 'ज्या ग्रंथाच्या परिशीलनाने मनुष्याचे मन सुसंस्कृत होते, वृत्ती उदात्त बनते आणि शील नीतियुक्त होते त्या सर्व ग्रंथांना वाङ्मय असे म्हणता येईल' (पृ. ८४). यावरून बापूजींची वाङ्मयविषयक कल्पना किती उदात्त होती हे दिसून येईल. 'कलेसाठी कला' हा दृष्टिकोण त्यांना मान्य होता असे दिसत नाही.

सन १९२८ साली बापूजींनी महाराष्ट्र संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी अनेक वादग्रस्त प्रश्नांचा उहापोह केला आहे. त्यांपैकी एक शुद्धलेखनाविषयी आहे. त्या सुमारास न. चिं. केळकरांनी आपल्या लिखाणात अनुस्वारांना चाट देण्याचा मार्ग अवलंबिला होता. त्याला उद्देशून बापूजी म्हणतात 'लेखनपद्धतीत बंडाळी करण्याचा मार्ग शिष्ट लेखकांनी एकदा घालून दिला म्हणजे आपल्या इच्छेनुसार वाटेल त्या पद्धतीचे अवलम्बन करण्याची सामान्य लेखकास अनावर इच्छा होण्याचा संभव असतो, व त्यामुळे जी अनास्था होईल तिचे परिणाम वाङ्मयास विघातक होण्याची शक्यता अधिक आहे (पृ. १३४).' हे उद्‌गार आजकालच्या राजकारणालाही तितकेच लागू पडतील.

प्रस्तुत संग्रहातील पाचवा लेख 'मराठा' (महाराष्ट्रातील लोक) यावर आहे. मराठ्यांच्या अंगच्या शौर्य, मुत्सद्देगिरी, स्वातंत्र्यप्रीती, धर्मश्रद्धा, परिस्थित्यनरूप वर्तन (adaptability) इत्यादी गुणांचे वर्णन करून त्यांनी त्यांची रजपुतादिकांशी तुलना केली आहे. ते म्हणतात, 'रजपूत वगैरे इतर लोक एकदा स्वाभिमानास पेटले म्हणजे मग त्यांना राष्ट्रहिताचे भान राहत नसे. तशी गोष्ट मराठ्यांची नव्हती. राष्ट्राचे हित डोळ्यासमोर ठेवून प्रसंगी स्वतःचे महत्त्व बाजूला सारणे हा मोठा सद्‌गुण आहे. तो मराठ्यांच्या अंगी विशेष होता.' (पृ. ८१). या वृत्तीची सध्याच्या राजकीय परिस्थितीत किती जरूरी आहे हे सांगणे नको.

प्रस्तुत ग्रंथातील एक लेख 'प्राकृत सप्तशती' वर आहे. या शीर्षकावरून त्या लेखात हाल राजाच्या महाराष्ट्री प्राकृतातील सप्तशती (सत्तसई) या ग्रंथाविषयी चर्चा आहे असा कोणाचा गैरसमज होण्याचा संभव आहे.पण तो लेख उत्तम श्लोकांच्या देवीविषयक मराठी ओवीबद्ध ग्रंथाविषयी आहे. 'मराठी' याअर्थी प्राकृत शब्दाचा उपयोग केल्याने प्रसिद्ध संशोधक कै. रायबहादूर डॉ. हीरालाल यांची मागे दिशाभूल झाली होती. भोसल्यांच्या हस्तलिखित ग्रंथसंग्रहात 'प्राकृत हरिविजया'चे नाव पाहताच त्यांना वाकाटक नृपती सर्वसेन याचे महाराष्ट्री प्राकृतातील हरिविजय काव्य सापडल्याचा आनंद झाला होता. त्यांनी तशी नोंद आपल्या हस्तलिखितांच्या सूचीत केला आहे. वास्तविक ती पोथी श्रीधराच्या मराठी हरिविजयाची होती!

प्रस्तुत संग्रहातील शेवटला लेख श्रीमुकुंदराजाच्या विवेकसिंधूवर आहे. तो बापूजींच्या संशोधनपद्धतीचा उत्कृष्ट नमूना आहे. या ग्रंथात विवेकसिंधूचा रचनाकाल, मुकुंदराजांचा शिष्य जैतपाळ याच्या अमलाखालील प्रदेश, वगैरे वादग्रस्त प्रश्नांची चर्चा त्यांनी साधकबाधक प्रमाणांचा विचार करून सविस्तर केली आहे. ती प्रत्ययोत्पादक आहे. मुकुंदराजांची अंबानगरी वैनगंगेच्या तीरावरचे अंभोरे किंवा मराठवाड्यातील आंबेजोगाई याविषयी संशोधकांत बरीच चर्चा झाली आहे. मुकुंदराजाच्या काळी भंडारा जिल्ह्यावर जैतपाळ नामक राजाचे राज्य होते हे अगदी संभवनीय आहे. या प्रदेशाला झाडीमंडळ असे नाव होते. महादेव व रामचंद्र या यादवनृपतींचा प्रधान हेमाद्री याने झाडीमंडळ जिंकल्याचा उल्लेख सन १२७२ च्या ताम्रपटात येतो. त्यापूर्वी जैतपाळाच्या वंशजांचे राज्य तेथे असणे अशक्य नाही.

मुकुंदराजांच्या विवेकसिंधूच्या रचनेचा काल शके १११० मानल्यास त्याशी साधारण संवत्सराचा निर्देश जमत नाही या आक्षेपाचे निराकरण बापूजींनी श्री. बाबाजी बोबडे व श्री. ढोक यांना अनुसरून केले आहे ते ग्राह्य वाटते. वास्तविक सुमारे शक संवत्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

८५२ पर्यंत उत्तर भारतात तसेच दक्षिण भारतातही एकच संवत्सरनाम प्रचलित असे. पुढे दक्षिणेत गुरूच्या गतीमुळे षष्टिसंवत्सर चक्रातील एक संवत्सर गाळण्याची पूर्वीची पद्धत प्रचारातून गेली, उत्तरेत मात्र ती चाल राहिली. म्हणून उत्तर–दक्षिण भारतात प्रचलित संवत्सरांच्या नावात फरक पडू लागला. अनवधानाने किंवा दुसऱ्या काही कारणाने शक संवत् १११० शी उत्तर भारतातील संवत्सरनाम जोडले गेले असणे असंभवनीय नाही.

बापूजींची भाषा सर्वत्र ओघवती व प्रसादगुणयुक्त आहे. अनेक ठिकाणी त्यांनी आपल्या विवेचनाच्या समर्थनाकरिता नवीन समर्पक दृष्टान्त योजले आहेत. कर्माचा संसार व मोक्ष यांच्याशी संबंध विशद करताना त्यांनी आंब्याच्या कोयीचा दृष्टान्त दिला आहे— 'आंबा तयार झाल्यावर फक्त त्याचा गीरच खाता येतो; कोय खाता येत नाही. महत्त्व धरून कर्म केल्यावर ते पुढल्या कर्माचे, फळाचे किंवा बंधनाचे बी–कोय निर्माण करते. पण कोय तयार होण्यापूर्वीच कैरी खाऊन टाकली तर त्या कोयीसकट ती खाऊन टाकता येते. ममत्वबुद्धी न धरता कर्म केले तर बंधनाचे बीजच निर्माण होत नाही.' (पृ. २४२–४३)

बापूजींना विदर्भाविषयी अत्यंत अभिमान व प्रेम होते. त्याच्या उन्नतीकरिता ते यावज्जीव झटले. मी स्वतः विदर्भाचा प्राचीन इतिहास, संस्कृति व वाङ्मय याविषयी जे अल्पस्वल्प संशोधन केले त्याचे त्यांना अतिशय कौतुक वाटत असे व ते त्यांनी प्रस्तुत संग्रहातील तेराव्या लेखात माझ्या 'वाकाटकनृपति आणि त्यांचा काल' या पुस्तकाचे आपण होऊन सविस्तर परीक्षण करून व्यक्त केले आहे. त्यांच्याशी माझा परिचय होण्याचा योग पुष्कळ वर्षांपूर्वी आला होता. तेव्हापासून विद्वत्ता, धार्मिकता, सच्चारित्र्य, भारतीय संस्कृतीविषयी नितान्त अभिमान आणि देशहिताविषयी सक्रिय कळकळ इत्यादी त्यांच्या लोकोत्तर गुणांबद्दल मला निरतिशय आदर वाटत होता. तो मी आपले 'मेघदूतातील रामगिरि अर्थात् रामटेक' हे पुस्तक त्यांना सविनय अर्पण करून व्यक्त केला होता. प्रस्तुत ग्रंथाच्या समालोचनाच्या निमित्ताने त्यांच्या अनेक लेखांचा परिचय घडून आला याबद्दल विदर्भ साहित्य संघाच्या वणी शाखेचे आभार मानून कै. बापूजींच्या स्मृतीस मी ही समालोचनरूपी आदरांजली अर्पण करतो.

खुलासा

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर कळवतात की, "'युगवाणी'च्या नोव्हेंबर–डिसेंबर १९६९च्या दिवाळी अंकात 'कोल्हटकरांच्या राजशिष्या' हा माझा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात कै. गोविंदराव टेंबे आणि कै. प्रो. चिं. वि. जोशी यांनी श्रीमंत सुमतिबाईसाहेब पवार यांच्यासंबंधी दिलेल्या माहितीचा मी उपयोग केला आहे. ती माहिती चुकीची आणि गैरसमज उत्पन्न करणारी असल्याचे मला चौकशीअंती समजले.

या माहितीचा उपयोग करण्यापूर्वी तिच्यासंबंधी खात्री करून घेण्यासाठी श्रीमंत सुमतिबाईसाहेब पवार यांना मी अनेक पत्रे पाठवली होती. पण, बडोदे, कोल्हापूर आणि देवास असे त्यांचे त्रिस्थळी वास्तव्य असल्यामुळे, त्यांना माझी पत्रे काही मिळू शकली नाहीत.

१९४६च्या डिसेंबरमध्ये श्रीमंत सुमतिबाईसाहेब पवार यांचा मुक्काम नागपूर येथे असताना, त्यांनी ज्याप्रमाणे 'तरुण भारता'च्या कर्मचाऱ्यांसाठी पन्नास रुपयांची देणगी दिली होती, त्याचप्रमाणे माझ्या विनंतीवरून श्री. दा. दे. हिंदु मुलींच्या शाळेला भेट देऊन त्या संस्थेलाही एकावन्न रुपयांची देणगी दिली होती. या गोष्टीचा उल्लेख त्या लेखात करण्याचे अनवधानाने राहून गेले.

श्रीमंत सुमतिबाईसाहेब पवार या माझ्या सन्मान्य गुरुभगिनी आहेत. त्यांच्यासंबंधी देण्यात आलेल्या चुकीच्या माहितीवर विसंबून मी हा लेख लिहिला, याबद्दल मला खेद वाटतो."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमचे संमेलनाध्यक्ष

--ग. त्र्यं. माडखोलकर

ता. १४ फेब्रुवारी १९७० रोजी आर्वी येथे भरणार असलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या अठ्ठाविसाव्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. शंकर गणेश सुरडकर हे वरिष्ठ श्रेणीतील सरकारी अधिकारी म्हणून विदर्भात विख्यात आहेत. पण, सरकारी नोकरीत प्रवेश करण्यापूर्वी, विद्यार्थिदशेत असतानाच त्यांनी साहित्यसेवेला सुरुवात केलेली असूनदेखील, साहित्यिक म्हणून मात्र ते काही सर्वश्रुत नाहीत. समाजातील सर्व थरातल्या लोकांशी बरोबरीच्या नात्याने मिळून मिसळून वागणारे आणि त्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद कळकळीने घेणारे सौजन्यशील अधिकारी म्हणून जो लौकिक त्यांनी गेल्या तीस वर्षांत संपादन केला, त्याचा हा स्वाभाविक परिणाम आहे, असे म्हणावे लागेल.

श्री. सुरडकर हे नागपूरचे कलेक्टर असताना त्यांच्या सौजन्याचा जो अनुभव मला स्वतःला आला, तो मुद्दाम सांगण्यासारखा आहे. १९६७ च्या ऑगस्टमध्ये कृषि विद्यापीठाच्या चळवळीने नागपूर शहर पेटल्यासारखे झालेले होते. त्या चळवळीत एके दिवशी सायंकाळी, सभा-मिरवणुकी वगैरे निदर्शनांवर घातलेला बंदीहुकूम मोडण्याची घोषणा आगाऊ करून, श्री. वसंतराव साठे, श्री. बाळकृष्ण वासनिक, श्री वर्धन प्रभृति कार्यकर्त्यांनी काढलेली मिरवणूक व्हरायटी चौकातच पोलिसांनी अडवली. तेव्हा मिरवणुकीत भाग घेणाऱ्या ३०/३५ तरुण कार्यकर्त्यांनी चौकात सत्याग्रहाचे ठाण मांडले. पोलिसांच्या मोटारी रस्ते अडविण्यासाठी खड्या होत्या; व चारी बाजूंना उभे असलेले शेकडो लोक तो सत्याग्रह पहात होते. सत्याग्रह जर विकोपाला गेला असता, तर परिस्थिती अधिकच बिघडली असती. म्हणून, श्री. रतनचंदजी डागा, श्री. अशोक बुटी आणि मी असे तिघे, रात्री ८-३० च्या सुमारास, श्री. सुरडकर यांच्या बंगल्यावर गेलो. ते क्लबात गेलेले होते. पण, सौ. कमलाबाईंनी, आमचे स्वागत करून, आम्ही भेटीसाठी आलो असल्याचे फोनने आपल्या पतींना कळवले. ८-१० मिनिटातच श्री. सुरडकर आले. त्यांनी सर्व हकीकत ऐकून घेतली; व आत जाऊन पोलिस कमिशनरसाहेबांना फोन केला.

तेव्हा, श्री. सुरडकर यांना असे सांगण्यात आले की, हुकूम मोडणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना अटक करून टाकळी पोलिस लाइन्सवर नेण्यात आलेले आहे. ही ताजी घटना त्यांनी आम्हाला सांगितली. त्यावर आम्ही त्यांना अशी विनंती केली की, "या कार्यकर्त्यांना तूर्त ताबडतोब जामिनावर सोडण्यात यावे. त्यांना अटकेत ठेवण्याचा परिणाम काही चांगला होणार नाही. मागाहून सरकारने वाटल्यास बंदी हुकूम मोडल्याबद्दल काय करावयाचे असेल ते करावे. पण, आंदोलनातील ३०-३५ कार्यकर्त्यांना अशा रीतीने अटक करणे, हे असंतोष अधिक भडकावयाला मात्र कारण होईल." आमची ही सूचना त्यांना पटली असावी. कारण, लगेच पोलिस कमिशनरसाहेबांशी पुन्हा फोनने बोलून नंतर ते आम्हाला म्हणाले, "भाऊसाहेब, आपण मंडळी जर जामीन रहावयाला तयार असाल, तर आपल्या शब्दावर या कार्यकर्त्यांना सोडण्यात येईल." अशा रीतीने त्यांच्या मध्यस्थीमुळे, त्या दिवशी रात्री एकच्या सुमारास, सर्व कार्यकर्ते जामिनावर मुक्त होऊन आपापल्या घरी गेले. लोकमतावर अर्थातच याचा इष्ट परिणाम झाला.

श्री. सुरडकर यांच्या लोकाभिमुख वृत्तीची अशी आणखीही उदाहरणे मी देऊ शकेन. पण, आज त्यांचा जो गौरव आम्हाला करावयाचा आहे, तो आमच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून; सरकारी अधिकारी म्हणून नव्हे ! तरीसुद्धा आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अवश्य वाटते. कारण ती गोष्ट सार्वजनिक जीवनाकडे पाहाण्याच्या त्यांच्या व्यापक दृष्टीची द्योतक आहे. १९६७च्या जूनमध्ये, नागपूरच्या टेका भागातील बौद्ध वस्तीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचा उपमर्द करण्यात आल्यामुळे, जातीय दंगा झाला. त्या वेळी स्वत: कुरापत काढून दंग्याला कारणीभूत झालेल्या जमातीने, कलेक्टरसाहेबांवर पक्षपाताचा आरोप करून, नागपूरहून त्यांची बदली करण्यात यावी, अशी मागणी केली. तथापि, आपल्याविरुद्ध करण्यात आलेल्या या खोट्या खोडसाळ तक्रारीकडे दुर्लक्ष करून, श्री. सुरडकर यांनी, शांत पण कणखर वृत्तीने, त्या आणिबाणीच्या काळात आपले कर्तव्य चोखपणाने पार पाडले. त्यात त्यांच्या सौजन्याप्रमाणेच नि:पक्षपातीपणाचीही कसोटी लागून गेली. आपल्याविरुद्ध करण्यात आलेल्या या कांगाव्यासंबंधी बोलताना ते नंतर मला म्हणाले की, "भाऊसाहेब, जातीचा विचार माझ्या मनात कधी येतच नाही. गेल्या अठ्ठावीस वर्षांत मी अनेक जिल्ह्यात काम केले. पण कोणीही जातीयतेचा आरोप मजवर कधी केला नव्हता. कारण कोणतेही काम करताना लोकांच्या हिताशिवाय दुसरा विचारच माझ्या डोळ्यांपुढे नसतो." राज्यकारभारातील या त्यांच्या लोकाभिमुख वृत्तीचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातही पडलेले आहे.

श्री. सुरडकर यांचा जन्म, बुलढाणा जिल्ह्यातील शेलगाव बाजार या गावी, ता. १२ जुलै १९१५ रोजी झाला. त्या जिल्ह्यातील जुन्या पिढीतले सामाजिक कार्यकर्ते त्यांचे मामा श्री. इंगळे यांनी त्यांना शिक्षणासाठी नागपूरला आणले. १९३६ साली बी. ए. च्या वर्गात असतानाच 'अंधारातील अश्रु' ही त्यांची कथा पुण्याच्या 'सह्याद्री' मासिकात प्रसिद्ध झाली. पुढे, 'किंग एडवर्ड मेमोरियल स्कॉलर' म्हणून ते इतिहास हा विषय घेऊन एम. ए. चा अभ्यास करीत असताना, जुन्या मध्यप्रदेशात १९३८ च्या ऑगस्टमध्ये, त्यांची ई. ए. सी. म्हणून नेमणूक झाली. त्यामुळे, त्यांच्या शिक्षणात जरी खंड पडला, तरी त्यांचा विद्याव्यासंग किंवा लेखनाचा छंद यात मात्र खंड पडला नाही. किंबहुना, केवळ मराठी आणि इंग्रजी वाङ्मयाचेच वाचन करण्यात समाधान न मानता, त्यांनी प्राचीन ग्रीक वाङ्मयाचे परिशीलन करून 'ओडिपस', 'मीडिया' यासारख्या उत्कृष्ट ग्रीक नाटकांचे मराठी अनुवाद केले. या त्यांच्या व्यासंगाचे मार्मिक प्रतिबिंब 'ग्रीक व भारतीय दृष्टिकोनातील फरक' या त्यांनी लिहिलेल्या विवेचक निबंधात पडलेले आढळते.

त्याहिपेक्षा त्यांचे विशेष उल्लेखनीय संशोधन कार्य म्हणजे, विदर्भातील निरनिराळ्या जिल्ह्यात कलेक्टर या नात्याने काम करीत असताना, आपल्या समानशील रसिक पत्नी सौ. कमलाबाई यांच्या सहकार्याने, त्यांनी संपादन केलेला 'दगडातील पाझर' हा लोकगीतांचा संग्रह होय. १९६४ साली वाचकांना सादर केलेल्या या संग्रहातील लोकगीतांना त्यांनी दिलेल्या विस्तृत विवेचक टीपा या त्या लोकगीतांइतक्याच हृदयंगम आहेत. या लोकगीतांचे तीन भागात वर्गीकरण करून, कौटुंबिक आणि नैसर्गिक अशा दोन्ही प्रकारच्या लोकगीतांची पार्श्वभूमी विशद करताना, विदर्भातील ग्रामजीवनाचे जे विशेष त्यांनी विवेचिलेले आहेत, ते त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची आणि सहृदय वृत्तीची साक्ष देतात.

हीच सहृदयतेची वृत्ती आणि निरीक्षणाची सूक्ष्मता, १९६८ साली प्रसिद्ध झालेल्या 'आता मी कुठं हो जाऊ!' या त्यांच्या लघुकादंबरीतही, आपल्या अनुभवाला येते. मॅजिस्ट्रेटचे काम करीत असताना अनेक बाल गुन्हेगारांवरील दावे त्यांच्यापुढे आलेले असावेत. पण, इतर वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणे, हे दावे निकालात काढून मोकळे न होता, त्यांनी आपल्यापुढे येणाऱ्या त्या बाल गुन्हेगारांच्या परिस्थितीची आणि तिच्यामुळे बनलेल्या त्यांच्या विशिष्ट मनोवृत्तीची कळकळीने छाननी केली; व केवळ शिक्षा ठोठावूनच हा लहान मुलांच्या गुन्हेगारीचा नाजूक गुंतागुंतीचा विकट प्रश्न सुटण्यासारखा नाही, या जाणिवेने ही कादंबरी लिहिली. आपल्या समाजात रूढीच्या प्राबल्यामुळे कांही दुर्दैवी जाती या गुन्हेगार म्हणूनच हेळसांडल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे त्या जातीतील मुले ही सहजच वाईट मार्गाला लागतात. त्याचप्रमाणे, दलित आणि शोषित जातीतील आणि वर्गातील अनेक मुलेही, आईबापांच्या गरिबीमुळे म्हणा, व्यसनीपणामुळे म्हणा किंवा बेपर्वाईमुळे म्हणा, वाऱ्यावर सोडली जातात. अशा मुलांना रेफर्मेटरीत किंवा तुरुंगात पाठवून त्यांचे भवितव्य उजळत नाही. उलट, केव्हा केव्हा अधिकच काजळते,

(पुढील मजकूर पान ५१६ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बर्न्स सपर

—श्रीकान्त राय

२५ जानेवारी १९७० रोजी स्कॉटिश राष्ट्रकवी आणि शाहीर रॉबर्ट बर्न्स याची २११ वी जयंती येते. अकरा वर्षांपूर्वी या महान मानव्यवादी कवीच्या द्विशताब्दी जन्मोत्सवात भाग घेण्याचे भाग्य मला लाभले होते. त्या समारंभाच्या स्मृतींच्या निमित्ताने आज पुन्हा रॉबर्ट बर्न्सच्या काव्याचा विचार माझ्या मनात जागून उठत आहे.

रॉबर्ट बर्न्सच्या सन्मानार्थ त्याच्या जन्मदिनी एक साहित्यिक–सामाजिक रात्रि–भोजनाचे आयोजन करण्याची स्कॉटलंडमध्ये प्रथा आहे. ग्लासगोजवळील नाइट्स्वुड कम्युनिटी सेंटरमध्ये रॉबर्ट बर्न्सच्या दोनशेव्या जन्मदिनी आयोजित केलेल्या अशा रात्रिभोजनास मी २३ जानेवारी १९५९ रोजी उपस्थित होतो. उपरोक्त जनसमाज केंद्राच्या वास्तूत त्या दिवशी आबाल–वृद्ध स्त्रीपुरुष, युवकयुवती यांच्या उत्साहाला जे उतू जाणारे उधाण आले होते त्याचे वर्णन करणे कठीण आहे. २३ जानेवारी हा 'गोविंदाग्रज' राम गणेश गडकरी यांच्या पुण्यतिथीचा दिवस. भारतीय स्वातंत्र्याच्या स्वप्नासाठी जीवन ओतणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याही जन्माने पुनीत झालेला तो दिवस. अशा स्वातंत्र्यप्रेम व साहित्य या सरितासंगमाच्या दिवशी ज्याच्या जीवनात साहित्य व स्वातंत्र्य रसरसून भरले होते अशा 'रॅबी'च्या द्विशताब्दि जन्मसोहळ्यात भाग घेण्यासाठी मीही मोठ्या उत्साहाने पाँटीफ्राक्टहून ग्लासगो येथे आलो होतो.

या सोहळ्याचा आरंभ स्कॉटिश पाइपर जॉर्ज गॉर्चेस्टन् याच्या बॅगपाइप् वादनाने झाला. गॉर्चेस्टन्च्या काखेतील वायुथैलीच्या स्पंदनाने स्कॉटिश् हृदयातील राष्ट्रीय अस्मितेच्या स्पंदनाशी लयच नव्हे तर समच साधली होती जणु ! आणि त्या स्पंदनाबरोबर स्कॉटलंडच्या सूरसंगीताच्या ज्या लहरी हळुवारपणे सभोवतालचे वातावरण पुलकित करीत होत्या त्यांच्या सहसंवेदनेने माझ्या मराठी मनात शिवनेरी–रायगडावर पहाटेच्या आरुणी उषास्वप्नात मिसळून जाणाऱ्या सनईचे सूर फुलत होते व माझ्या नाडीचा चौघडा त्या सुरांची लय पकडीत होता.

सुमारे नव्वदशंभर स्कॉटिश् कुटुंबे आपली मुलेबाळे, आप्तस्वकीय, लेकीसुना यांसह सहकुटुंब सहपरिवारे या सोहोळ्यात भाग घेण्यासाठी त्या समाजकेंद्राच्या भव्य प्रेक्षागृहात आपापले सनातनी स्कॉटिश् पेहेराव लेऊन जमा झाली होती. आसमंतातली घरे–घरकुले त्या सायंकाळी ओस पडली होती. प्रेक्षागृहातील मधली जागा मोकळी सोडून सभोवार आदबीने भोजनाची मेजे व्यवस्थितपणे मांडली होती. मुख्य टेबलाशी समारंभाचे अध्यक्ष श्री. वेस्टवुड आणि इतर प्रमुख मंडळी बसली होती. पाँटीफ्रॅक्ट ते ग्लासगो या आगगाडी प्रवासात मी जेम्स बार्के यांनी संपादित केलेले रॉबर्ट बर्न्सच्या कविता व गीते या पुस्तकाचे अखंड वाचन करीत आलो होतो व त्याच मनोवस्थेत स्फुरलेला व कागदावर उतरलेला 'हा मानव, मानव आहे' हा रॉबर्ट बर्न्सच्या is there for honest poverty या कवितेचा अनुवाद मी या सोहोळ्यात वाचणार असल्याने मलाही समारंभाच्या मुख्य मेजाशी जागा मिळाली होती.

रॉबर्ट बर्न्सने निःसंकोचपणे, आत्मविश्वासाने आणि स्वाभिमानाने स्वतःला शाहीर म्हणवून घेतले होते. त्या रॉबर्ट बर्न्सचा उभ्या स्कॉटलंटने राष्ट्रशाहीर म्हणून स्वीकार केला असल्याचा निःसंशय दाखला त्या समारंभातील जनतेच्या उत्साहाने मिळत होता. गॉर्चेस्टन्च्या 'थैली नलिके'च्या स्कॉटिश सुरावटीला असंख्य स्कॉटिश गळ्यांतून स्रवणाऱ्या आणि ओठांवरून नाचत येणाऱ्या रॉबर्ट बर्न्सच्या काव्यशब्दांची साथ उत्स्फूर्तपणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मिळत होती. निरनिराळ्या व्यक्ती रॉबर्ट बर्न्सच्या कविता पाठ म्हणून दाखवीत होत्या. रावर्ट बर्न्सची गीते गाईली जात असताना त्याच्या लोकप्रिय गीतांच्या सुरावर स्कॉटिश स्त्रीपुरुष अस्सल स्कॉटिश पद्धतीच्या लोकनृत्यात स्वतःला विसरून जात होते. ती समूह-गीते गृहाची पोकळी भरून टाकून जणू स्कॉटिश हायलंडचे डोंगरमाथे व दऱ्याखोरी पुनीत करण्यासाठी अनंत वाटांनी मोकळ्या अवकाशाचा ठाव घेत होती. अस्सल स्कॉटिश भाषाबोलीत म्हटलेली टॅम् ओ शॅन्टर, आउल्ड लांग सायने, फॉर अ दॅट्, अन् अ दॅट् अ मान्स अ मान फॉर् अ दॅट् आदि असंख्य काव्ये आणि गीते त्या रात्री जिवंत शब्दांच्या रूपांनी स्कॉटिश ओठा-ओठांवर नाचत होती.

जॉर्ज गॉर्चस्टन्च्या पाइप संगीतामागोमाग ॲड्रेस टु ए हॅगिस्च्या नाटयपूर्ण पाठांतराने सुरुवात झालेले जेवण केव्हा संपले हे कळण्यापूर्वीच गृहाच्या मधल्या मोकळ्या जागेत स्कॉटिश् तरलतेने राष्ट्र-शाहीर रॅबी बर्न्सच्या संगीतावर झिम्मा फुगडीचा रास रंगविला होता.

राष्ट्रीय चैतन्याने वातावरणाचा अणुरेणू भारून गेला होता. आजच्या आंतरराष्ट्रीयतेच्या युगातही मध्ययुगीन राष्ट्रभावनेचा प्रभाव किती रोमहर्षक असू शकतो याचा निर्वाळाच त्या राष्ट्रकवीची जिवंत स्मृती, जणू, देत होती. "स्कॉटलंडने इंग्लंडच्या गुलामगिरीचे जू कधीच स्वीकारले नाही. उलट वास्तव इतिहासात इंग्लंडला राजघराण्याचा अस्त जाणवण्याची वेळ आली तेव्हा इंग्लंडला राणी पुरवून स्कॉटलंडने इंग्लंडचेच नव्हे तर ग्रेटब्रिटनचे सिंहासन भूषविले व इंग्लंडचा राजदंड तोलण्यासाठी समर्थ बाहू दिले," असा सदर्प दावा सांगणाऱ्या स्कॉट-लंडची स्वभावतः स्वतंत्रवृत्ती रॉबर्ट बर्न्सच्या त्या द्विशताब्दी जन्म महोत्सवाच्या क्षणाक्षणातून आविष्कृत झाली.

* * *

२३ जानेवारी १९५९ ला सायंकाळी सुरू झालेला बर्न्स रात्रिभोजनाचा हा संगीतमय रंगीत सोहळा २४ जानेवारीच्या पहाटे दोन वाजताच्या सुमारास संपला. २४ तारखेस दुपारी मध्यान्हीस भर बारा वाजता ग्लासगोच्या प्रसिद्ध जॉर्ज चौकात स्वयमेव इंद्रतेने उभ्या ठाकलेल्या रॉबर्ट बर्न्सच्या भव्य पुतळयाला ग्लासगोचे आल्डरमन, मॅजिस्ट्रेट्स आणि ग्लासगो विद्यापीठाचे कुलपती अशा प्रमुख नागरिकांनी समारंभपूर्वक पुष्पचक्रे अर्पण केली.

अवघी उणीपुरी सदतीस वर्षे दारिद्र्य, परिश्रम, रोगजर्जरता, आपत्ती यांच्याशी सामना करीत परंतु वृत्तीने स्वतंत्र असे हसतमुख आयुष्य जगून गेलेल्या रॉबर्ट बर्न्सचा शतकानुशतके होत आलेला राष्ट्रीय कवी म्हणून सन्मान पाहून माझे मन गहिवराने ओथंबून आले! एका दरिद्री माळयाचा मळेकरी मुलगा असलेल्या रॉबर्ट बर्न्सला म्हणण्यासारखे शिक्षण मिळाले नसले तरी त्याने आपल्या जनकाकडून मानवी मूल्ये आणि मानवी आचरणधर्माचे बाळकडू मिळविले आणि पचविले. तोच रॉबर्टच्या शिक्षण व संस्कृततेचा गाभा होता. तोकडे शिक्षण लाभलेला रॉबर्ट बर्न्स

(पान ५१४ वरून)

असा अनुभव आहे. श्री. सुरडकर यांनी, या कादंबरीत, बालगुन्हेगारीच्या सामाजिक प्रश्नाचे अंतरंग, समाज आणि सरकार या दोघांच्याही पुढे, हळुवारपणाने उक-लून ठेवलेले आहे. ही त्यांची कामगिरी साहित्याप्रमाणेच समाजसुधारणेच्या दृष्टीनेही महत्त्वाची ठरेल.

विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर विराजमान होणारे श्री. शंकरराव आणि सौ. कमला-बाई सुरडकर हे, माझ्या समजुतीने, तिसरे दाम्पत्य होय. आपल्या धर्मात दाम्पत्यपूजा ही मोठी सौभाग्यप्रद मानलेली आहे; व अनेक व्रतात आणि सणात मेहुण पंक्तीला असल्याशिवाय त्या व्रताची आणि सणाची सांगता होत नाही. आर्वी येथील साहित्य सोहळ्यात दाम्पत्यपूजन करण्याचा हा सुयोग तेथील स्वागत समि-तीला आणि विदर्भ साहित्य संघालाही लाभला, ही आनंदाची गोष्ट आहे. श्री. शंकरराव हे सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर, सौ. कमलाबाईंच्या सह-कार्याने, आपले उत्तरायुष्य साहित्यसेवेत घालवितील, अशी मला खात्री वाटते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

मूलत:च प्रज्ञावंत होता. त्याला वाचनाचे वेड होते व वाचलेले समजून आत्मसात् करण्याचे सामर्थ्य होते. आपल्या तरल बुद्धिमत्तेच्या कर्तृत्वावर त्याने असे असाधारण स्थान प्राप्त करून घेतले आहे की त्याचे नाव कालिदास, शेक्सपिअर, बीथोवन व रेम्ब्राँ यांच्याच नाममालिकेत उच्चारावे लागेल. रॉबर्ट बर्न्सने आपल्या काव्य व गीतांच्या शब्दाशब्दात आपल्या भावना, जागृतता, राष्ट्रीयच नव्हे तर मानवी अस्मिता यांची चिरंजीव लेणी कोरून ठेवली आहेत. या सर्व 'भाव-शब्द'-संसारात बर्न्सने मानवतेशी पुरेपूर इमान ठेवल्यामुळेच पंथ, धर्म, भाषा, राष्ट्र, वंश, वर्ण आदि सर्व मर्यादा पार करून रॉबर्ट बर्न्स मानवतेचा कवी म्हणून सर्वमान्य झाला आहे.

* * *

रॉबर्ट बर्न्सच्या कवितेत अलांछित स्वातंत्र्याची आस व मानवातील उत्तम गुणांची जाण ओतप्रोत भरलेली आहेत. चांगुलपणाचा बर्न्सचा निकष एकच. "जे काही दुःखे पुसून टाकून दुसऱ्यांचे सुख वाढविते ते चांगुणपण; आणि जे समाजाला जखम करते किंवा एखाद्या व्यक्तीलाही दुखविते ते माझे विषमतेचे माप", असे बर्न्स म्हणतो.

मुक्त आणि स्वच्छंद मनाने आनंद घेऊ शकणाऱ्यालाच स्वातंत्र्याचा साक्षात्कार झाल्याचे प्रशस्तीपत्र बर्न्स देतो. मुक्ती व समानता या भावनांच्या विचारात मानवी मनोवस्थेपलीकडे ऐहिक जीवनातील धन, हिशेब, जमाखर्च एवढेच काय तर वरकरणी शिष्टाचार आदि बाबींना तो यत्किंचितही भीक घालीत नाही. तो म्हणतो,

"पदवी आणि पैसा काय आहेत ?
नावलौकिकाची चिंता काय चीज आहे ?
जर आपण सुखी जीवन जगू शकलो
तर ते कुठे आणि कसे जगतो याची
काय मातब्बरी !"

"घोडागाडीच्या मागे सेवकांची रीघ असली
म्हणजे का ती (गाडी) अवनीतलावर
अधिक तरल चालते ?
विवाहनिर्मित शयनाची शेज काय अधिक
तजेलदार विषयसुख संपादन करते ?"

निरोगी आणि अनिर्बंध स्वैरतेला व तिच्यातून लाभणाऱ्या सुखप्रत्ययाला बर्न्स खरे स्वातंत्र्य व मुक्तता मानतो. पण हे सुख घेताना, चषक आणि गीतात रममाण होताना, दोन्ही हातांनी स्थिरपणे पेला धरून आपल्या श्रद्धांना जागता आले तर जीवन कसे जगले गेले आणि किती काळ जगले गेले याची तमा बाळगण्याचे कारण नाही असे तो 'शिपाईगड्या'च्या एका काही काळ बहकलेल्या प्रेयसीच्या गीतातून सुचवितो.

धन, समाजस्थान, जन्माने लाभलेले कुळकीर्तीचे मोठेपण या सर्व प्रकारच्या दंभांचा बर्न्सला तिटकारा आहे. तो म्हणतो, 'त्यांना शिष्टाचार संहितेबद्दल बरळू द्या, ज्यांना घालविण्यासाठी चारित्र्य आहे.' मुक्त स्वातंत्र्य जगू शकण्यासाठी जातिवंत 'सैनिक' हृदयाचा त्याचा अभिमान अनेक कवितांच्या ओळी-ओळींतून जाणवतो. पण तो सैनिक कसा ? दुसऱ्याची नोकरी, ताबेदारी, गुलामगिरी, द्रव्यात मिळणारे मोल, फोत नि तारे मिळविणारा 'पोटावर' चालणारा शिपाई नव्हे तर जो सदर्प अभिमानाने सांगू शकेल की, 'मी साक्षात् युद्धदेवाचा पुत्र आहे, मी अनेक युद्धे लढलो आहे....' ज्याची चित्तवृत्ती मूलत:च अशी मुक्त आहे की जो अभिमानाने स्वत:च्या शरीरावरील असंख्य जखमा व व्रणांच्या अनुषंगाने आपल्या समरस्मृती सांगताना स्वत:ला बेभानपणे हरवून जातो आणि जो म्हणू शकतो, 'आता जरी मला (तुटलेल्या अवयवांच्या जागी) लाकडी बाहू व लाकडी पाय लावून घेऊन भीक मागावी लागली व माझ्या शरीरावर जरी चिंध्या झालेली लक्तरे असली तरी माझा स्कॉटिश गणवेष व मदिरेची शिशी यांच्या सहवासात मी युद्धभूमीच्या समरसंगीताच्या कारात जेवढा सुखी होतो तेवढाच सुखी आहे.' या सैनिकाला शिशिराची थंडी, पत्थराचा निवारा, घनदाट अरण्य यांची काहीच तमा नाही. वार्धक्यानंतर ऐहिक जीवनाचा त्याग करून जाताना पुन्हा पडघम्‌च्या तालावर नर्कासुराच्या सैन्याशी दोन हात करण्याची त्याची तयारी आहेच ! 'I'll go and be a Sodger' या कवितेत, 'मी तेवीस वर्षांचा आहे आणि चांगला पाच फूट नऊ इंच उंच आहे, मी का काळजी करू व स्वत:लाच गांजू ? मी सरळ जाईन आणि शिपाई गडी बनेन,' असे बर्न्स म्हणतो. 'मिळविलेली संपत्ती मुष्कीलीने जतन करण्याचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रयत्न केला अन् ती नाहीशी झाली पण मला जाऊन शिपाईगडी तर होता येईल!' हे समाधान त्याच्या वृत्तीत आहे.

'स्वातंत्र्याच्या वृक्षा'बद्दल लिहिताना बर्न्स म्हणतो "ज्याला फ्रान्सचा वृक्ष म्हणतात त्या वृक्षाभोवती देशाभिमानी हृदये ताल धरतात व नाचतात. सबंध युरोपला त्याची कीर्ती ठाऊक आहे. बंधनात बांधलेल्या प्रजेसाठी ज्या ठिकाणी राजांनी बॅस्टिलचा तुरुंग बांधला होता तिथे आता स्वातंत्र्याचा वृक्ष उभा आहे!"

"या वृक्षाला अशी फळे लागतात की ज्यांचे वर्णन सर्व सद्गुणांनी होते. ही फळे मानवाला पशू अवस्थेच्या वर काढून उन्नत बनवितात व याची चव चाखलेला शेतकरी असा महामानव बनतो की तो आपले सर्वस्व भिकाऱ्याबरोबर विभागून घ्यायला तयार होतो. अखिल आफ्रिकेच्या धनापेक्षा या वृक्षाच्या फळाची किंमत अधिक आहे. मानवजातीला सुख देण्यासाठी, निरामयता प्राप्त करून देण्यासाठी आणि तृप्त करण्यासाठी हे स्वातंत्र्य–वृक्षाचे फळ पाठविले गेले आहे. त्याने नजर साफ होते, हृदय उत्साहित होते, उच्चनीच हा भेद विसरून मित्रता पसरते आणि जो याच्याशी इमान बाळगीत नाही तो नाशाप्रत जातो."

सद्गुणाच्या खतपाण्यावर वाढलेल्या या स्वातंत्र्य वृक्षाच्या फांद्या लाटेसारख्या सर्वदूर पसरून मानवजातीला आपल्या कळ्याफुलांच्या बहराने तोषवितील ही कल्पना सहन न होऊन आपल्या दुष्ट प्रवृत्तींतून या वृक्षाच्या फांद्या छाटण्याचा क्षुद्रपणा करणाऱ्या सोळाव्या लुईचा राजमुकुट छिन्नभिन्न करून या वृक्षाच्या संरक्षकांनी त्या राजाचा कसा शिरच्छेद केला याचे वर्णन बर्न्सने केले आहे. या वृक्षाची फळे मानवाला मिळू नयेत म्हणून शपथबद्ध होऊन सैनिकी संचलन करणाऱ्यांची ससेहोलपट करून मूर्तिमंत स्वतंत्रता त्या वृक्षाजवळ उभी राहून स्वातंत्र्याचे गीत कसे गाइली आणि या गीताने स्फूर्ती घेऊन मानवाचा नवा 'वंश' कसा जन्म पावला व त्याने भाडोत्री व स्वातंत्र्याच्या शत्रूंचा कसा समाचार घेतला याचे वर्णन करीत एकाएकी बर्न्स म्हणतो, "ब्रिटनने आपल्या ओक, पॉप्लर, पाइन वृक्षांची कितीही बढाई मारावी आणि आपल्या शेजाऱ्यांवर कडी केल्याचो 'विनोदी' कथा सांगावी पण ब्रिटनची सर्व अरण्ये पालथी घातली तरी 'असा' (स्वातंत्र्याचा) वृक्ष 'लंडन ते ट्वीड' कुठेही सापडणार नाही."

अशा वृक्षाच्या अभावी जीवन म्हणजे एक दुःखाची खाई आहे. अशा जीवनसंगरात खरे सुख नाही; ते सुख मग थडग्यापर्यंतही मिळणार नाही. परंतु अशी खूप झाडे वाढली म्हणजे जग शांतीने जगेल. मग तलवारीची नांगर बनवावयाला मदत होईल आणि युद्धांचा कहर थांबेल. समान ध्येयासाठी मग मानवजात हसतमुखाने भाऊ भाऊ बनून झटेल आणि समान हक्क, समान कायदे यांनी (पृथ्वीवरील) बेट न् बेट हरखून जाईल. असा वृक्ष इंग्लंडमधे दुरून आणून लावला जावो व खरे स्वातंत्र्य लाभो अशी इच्छा बर्न्सने आपल्या कवितेत व्यक्त केली आहे.

* * *

रॉबर्ट बर्न्सच्या अनेक कविता प्रासंगिक आहेत. त्या तत्कालीन व्यक्तींवर लिहिल्या आहेत. पण त्यांत आढळणारी मानव–गुणांवरील अखंड श्रद्धा; दंभ, अन्याय, दुर्बलता, लाळघोटेपणा याबद्दलची चीड, स्वातंत्र्याच्या मोलाचे मापन आदि बारकावे व छटा त्याच आहेत.

उदाहरणादाखल कॅप्टन् मॅथ्यू हेंडरसनवरील शोकगीत आणि मृत्युलेख पाहिल्यास त्या व्यक्तीच्या अद्वितीय चमकदार सवितातुल्य व्यक्तिमत्वाने कवी कसा भारावून गेला आहे हे आरंभीच्या चार ओळींतच लक्षात येते आणि मग या व्यक्तीवरील मृत्युलेखांत त्याच्या गुणविशेषांची जंत्री देताना बर्न्स म्हणतो, 'मॅथ्यू थोर इसम होता, तो दरिद्री होता, तो शूर होता, तो तेजस्वी होता, तो दयाळू होता, तो नेक होता, तो अवलिया होता,' आणि शेवटी तो म्हणतो की 'मॅथ्यू हे एक विरळे व्यक्तिमत्व होते.' अशा तऱ्हेने शोकातही बुद्धिमान्य गुणपूजा डोळसपणे बांधून मॅथ्यूबद्दल सहसंवेदना निर्माण करताना बर्न्स 'पुरुषोत्तमा'-च्या गुणांचीच चाड बाळगतो.

टॅम् ओ शॅन्टर या कवितेत तर कवीने निरागस, गोष्टीवेल्हाळ, गावंढळ, मदिराप्रिय, भुताखेतांच्या गोष्टीत रंगणाऱ्या सामान्य स्कॉटिश खेडुताचे व्यक्तिचित्र उभे केले आहे. ही दीर्घकविता म्हणजे एक भारुड आहे व त्या कवितेतील तात्पर्य शेवटच्या कडव्या-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तील भारुडरूप अद्‌भुत तात्पर्यातूनच समजून घ्यावे लागते. पण स्कॉटच्या सर्वच कवितांतील सामान्य स्कॉटिश माणसाला कळेल अशी 'मराठमोळी' भाषा, कवितेची लयबद्धता व नादमाधुर्य यामुळे टॅम् ओ शॅन्टर आबालवृद्धांत किती लोकप्रिय आहे हे भान विसरून लयबद्धतेत गाणारा स्कॉटिश समाज बघितल्याशिवाय कळावयाचे नाही !

* * *

स्वतःला अभिमानाने शाहीर म्हणविणारा बर्न्स एकाएकी कधी कधी स्वतःबद्दल किती तुच्छतेने लिहू शकतो ते Ăh, woe is me, my mother dear ! अशा कवितेत दिसून येते आणि मग आपल्याला बर्न्सशी क्रूर नशीबाचा खेळ खेळणाऱ्या नियतीची चीड आल्याशिवाय राहवत नाही.

राजाकडून मिळालेल्या पदव्या आणि सन्मान, जमिनदाऱ्या आणि इजारदाऱ्या, किताब आणि मनसबी यांची चीड आणि तुच्छता तर बर्न्सच्या काव्यात ठायीठायी आढळतात. धनसंपादनासाठी मातृभूमी सोडून जाण्याच्या कल्पनेचा धिक्कार त्याने बँक नोटेवर लिहिलेल्या ओळीतून जाणवतो.

बर्न्सला प्रेम आहे निर्भेळ स्वायत्ततेने भरल्या भारल्या नगरीचे. हे त्याचे 'नगरी' प्रेम उत्कटतेने स्कॉटलंडची राजधानी एडिंबरो (स्कॉशियाची लाडकी एडिना !) हिच्यावर लिहिलेल्या कवितेत आढळते. एडिनाच्या भरभराटलेल्या सुंदर वातावरणात न्याय व शिक्षण वहरत आहेत आणि अशा एडिनाची मुले व मुली आपल्या सामाजिक, प्रेमळ अंतःकरणाने व खुल्या दिलाने अनोळखी जनांनाही बोलवीत आहेत, अशा लोकांच्या नावाला मत्सराचा डागही लागू नये अशी अपेक्षा बर्न्स करतो. एडिंबरोच्या प्रस्तरांवर उभ्या ठाकलेल्या भरभक्कम आणि राकट कडेकोटांनी पुरातन काळापासून घाव झेलूनही आक्रमकांना कसे नामशेष केले याबद्दल साभिमान कौतुकाने नि डोळे भरल्या आसवांनी वैभवशाली एडिनाच्या भूतकाळाकडे रॉबर्ट बर्न्स पाहात राहतो.

* * *

दोन शतके होऊन गेली तरी अजून रॉबर्ट बर्न्सच्या सर्व कविता व गीते एकत्र ग्रंथित झाली आहेत असा ठाम दावा कुणास सांगता आलेला नाही. अवघ्या सदतीस वर्षांच्या आयुष्यात एवढी प्रचंड काव्यनिर्मिती व तीही शतकानुशतके लोकांच्या मनाचा ठाव घेत राहील अशी, हा पराक्रम पाहिल्यावर 'प्रज्ञावंत' या संज्ञेच्या अर्थाची थोडी फार अनुभूती उमगते आणि मग कै. राम गणेश गडकऱ्यांच्या प्रज्ञावंततेवर भाष्य करताना 'अशी व्यक्तिमत्वाची मूस ब्रह्मदेव एकदाच ओततो व त्या मूशीत पुन्हा कलाकृती निर्माण करण्याचा मोह उपजण्यापूर्वीच तो आपल्या हातांनी ती मूस फोडून टाकतो' या कै. श्री. म. तथा बापूसाहेब माटे यांच्या वाक्याची आठवण मला रॉबर्ट बर्न्सचा विचार करतानाही होते !

* * *

माझ्या मनात पुन्हा रॉबर्ट बर्न्सचे मानवाच्या उत्तमाचा अंतिम विजय आत्मविश्वासाने सांगणारे शब्द घुमू लागतात,

" येणारच मग लाट–आपदा, येवो ती भरदार
सत्य तत्त्व अन् मानधनाला मिळेल सत् आधार
प्रलयपुराच्या या लोंढ्याला रोधूं न शके 'राव'
उरतिल नंतर पृथ्वीवरती मानव जे अति–साव
या लाटेतुनि उरेल मानव, जो जनबंधू आहे
असा असो वा तसा असो, हा मानव 'मानव' आहे !"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

अभीष्टचिंतन

श्री. विष्णु सखाराम खांडेकर यांच्या साहित्य-कर्तृत्व-संपन्न आयुष्याला बहात्तर वर्षे पूर्ण होऊन त्यांनी आता त्र्याहत्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे. दीर्घायुष्य, निरामय जीवन आणि ते जीवन समर्पण-बुद्धीने सतत कंठीत असावे ही अदम्य आकांक्षा परमेश्वरी कृपेशिवाय माणसाला लाभत नाही. ही कृपा श्री. खांडेकरांना लाभली आहे हे जसे व्यक्तिशः त्यांचे तसेच मराठी वाङ्मयाचेही सद्भाग्य आहे, असे मी समजतो. गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडात जे प्रतिभासंपन्न लेखक मराठी साहित्याच्या क्षेत्रात अवतीर्ण झाले आणि ज्यांनी आपल्या ध्येयनिष्ठ, विचार-संपन्न आणि कलापूर्ण वाङ्मय-कृतींनी त्या साहित्याची दालने संपन्न केली अशा लेखकांमध्ये श्री. खांडेकरांचे स्थान अग्रगण्य आहे ह्यात वाद नाही.

ध्येयनिष्ठा हा श्री. खांडेकरांच्या व्यक्तिमत्वाचा स्थायीभाव आहे. त्यांनी स्वीकारलेला शिक्षकाचा व्यवसाय काय, कथा-कादंबरी-नाटक-गुजगोष्टी इत्यादि वाङ्मयप्रकारातून प्रगट केलेले विचार-मंथन काय, वृत्त-पत्रकार ह्या भूमिकेवरून केलेले प्रचार-कार्य काय, सर्वांतच त्यांची ही जाज्ज्वल्य ध्येयनिष्ठा प्रगट झालेली आहे. तीच ध्येयनिष्ठा त्यांनी लिहिलेल्या वाङमयविषयक टीका-लेखांतून व चित्रपट-कथांतूनही निराळ्या पद्धतीने व्यक्त झालेली आढळते. सामाजिक अन्यायाबद्दलची चीड, अवमानित आणि उपेक्षित जीवन जगणे भाग पडत असलेल्या निरपराधी दलित-वर्गाबद्दलची अनुकंपा, त्या अनुकंपेतून उत्पन्न झालेली ही परिस्थिती बदलून टाकण्यासाठी स्वतःला काय करता येईल ते करण्याची मिळालेली जबरदस्त प्रेरणा, ह्या सर्व गोष्टी खांडेकरांच्या ध्येयनिष्ठेचीच रूपे होत. लहानपणी त्यांच्या वाचनात आलेल्या आगरकर-वाङमयाचा त्यांच्या अंतःकरणावर जो खोल ठसा उमटला, आणि त्या विचारांचा जो प्रभाव त्यांच्या मनावर पडला, तोच मुख्यत्वेकरून खांडेकरांचे ध्येयनिष्ठ जीवन आकारण्यास कारणीभूत झाला.

खांडेकरांच्या साहित्याचे वाङमयीन दृष्टीने मूल्यमापन करण्याचा हा प्रसंग नाही, परंतु त्यावरोबरच, त्यासंबंधीचा उल्लेख न करणेही अशक्यच आहे. कारण मराठी माणसापुढे त्यांची जी प्रतिमा आहे ती मुख्यत्वेकरून 'साहित्यिक' म्हणूनच.

सर्वसामान्य वाचक-वर्ग खांडेकरांना ओळखतो तो कादंबरीकार ह्या नात्याने. त्यांच्या 'कांचन-मृग', 'दोन ध्रुव', 'उल्का', 'दोन मने', 'ययाति' इत्यादि कादंबऱ्यांनी त्या प्रसिद्ध झाल्यानंतर वाचकांची मने ओढून घेतली, त्यात व्यक्त झालेल्या सामाजिक विचारांनी अनेक वादळे उठविली, इतकेच नव्हे तर, अनेक वादग्रस्त प्रश्नांबाबत लोक-मनात विशेष स्वरूपाची विचार-क्रांती घडवून आणण्याइतपत प्रभावही त्यांनी गाजविला. ह्याचे मुख्य कारण एकच. कादंबरीतील चित्र रंगवीत असताना खांडेकरांनी आपला जीवनविषयक दृष्टिकोन वाचकांच्या मनावर कसा ठसेल, ह्याचाच विचार केला. त्यापायी त्यांनी तंत्रदृष्टीने उत्पन्न होणाऱ्या काही दोषांचीही पर्वा बाळगली नाही, असा त्यांचा समाज-सुधारणाविषयक आग्रह जाज्ज्वल्य आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कादंबरीचे क्षेत्र सोडून खांडेकरांनी चित्रपटांसाठी कथासंवाद लिहिले त्यातही त्यांचे हेच वैशिष्टय दिसून येते. त्यांनी लिहिलेल्या 'छाया', 'ज्वाला', 'देवता', 'मुखाचा शोध' इत्यादि बोलपटांच्या कथा ह्याच्या साक्षी आहेत.

खांडेकरांची प्रतिभा स्वच्छंदपणे विहार करताना दिसते ती त्यांच्या गुजगोष्टी आणि लघुकथांमधून. हे दोन्ही वाङ्मय-प्रकार दिसायला लहान पण यशस्वीपणे हाताळण्यासाठी बरेच नाजुक आणि अवघड आहेत. पण ह्या अवघड गोष्टींवरही खांडेकरांनी किती प्रभुत्व संपादन केले आहे ते त्यांच्या अनेक लघु-कथा-संग्रहां-वरून आणि नित्यशः प्रसिद्ध होत असलेल्या लघु-कथांवरून सहज पाहता येण्यासारखे आहे. ह्या अनेकानेक कथांमधे जसे विषय-वैचित्र्य आहे, तसेच रचना-कौशल्य, आणि संवादांच्या व प्रसंगांच्या सहाय्याने मूळ कल्पनेला प्रभावीपणे साकार करण्याचे सामर्थ्यही मनाला भुरळ पाडणारे आहे. सूचकता हा तर लघुकथेचा प्राणच. तो गुण खांडेकरांच्या लघुकथांमधून कसा नाजुक हाताने खेळविला गेला आहे ते त्या कथा वाचूनच अनुभवावे लागते. ह्या क्षेत्रातील खांडेकरांची कामगिरी जशी विशिष्ट गुणांनी युक्त आणि आल्हाददायक आहे, तशीच किंवा त्यामुळेच ती मराठी वाङ्मयाला अभिमान वाटण्याजोगी आहे असे म्हणणे वस्तुस्थितीला धरूनच होईल.

जे लघुकथांबद्दल, तेच खांडेकरांनी लिहिलेल्या लघुनिबंध अथवा गुजगोष्टींबद्दलही म्हणता येईल.

आपल्या ललित कृतींप्रमाणेच खांडेकर दुसऱ्यांच्या कृतींचे मूल्यमापन करणाऱ्या टीकाकारांच्या भूमिकेवरूनही महत्त्वाची कामगिरी बजावीत असल्याचे आढळून येते. टीकाकार ह्या नात्याने खांडेकरांच्या संबंधी विचार करीत असताना एका लेखकाने म्हटले आहे की त्यांच्यासारख्या नामवंत लेखकाने टीकालेखन करावे ह्यात औचित्य आहे. कलाकृतीतील सौंदर्य टिपून घेण्याची रसिकता, आणि त्या सौंदर्याचा आविष्कार करण्यासाठी आवश्यक असणारी शास्त्रीय चिकित्सा, ह्या दोन्ही गोष्टी जवळ असतील तरच टीकाकार मार्मिक-पणे कोणत्याही कलाकृतीचे गुण-दोष-दिग्दर्शन करू शकतो, आणि त्या कृतीचे वास्तविक मूल्यमापन करू शकतो. समोर असलेल्या ग्रंथातील दोषांवरोबरच त्यातील सौंदर्यस्थळेही टीकाकार न चुकता पुढे ठेवतो, आणि ग्रंथ-लेखकाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान कोणते, त्याचे स्वरूप आणि महत्त्व कसे, हेही तो विशद केल्या-वाचून राहात नाही. ह्या दृष्टीने पाहिले असता खांडेकरांनी लिहिलेले टीकावाङ्मय उद्बोधक आणि मार्गदर्शक स्वरूपाचे आहे ह्यात शंका नाही.

खांडेकरांची भाषाशैली त्यांच्या मनोभूमिकेला अनुरूप अशी वैभवसंपन्न, काव्यसुंदर, पण प्रसंग आला म्हणजे तशीच तडफदार आणि वज्राघातीही आहे. गांभीर्य आणि रसिकता ह्या दोहोंचा मिलाफ त्यांच्या साहित्यात प्रसंगाला अनुरूप होईल अशा पद्धतीने विहार करताना आढळतो.

अशा प्रकारच्या अनेकानेक उत्कृष्ट साहित्यगुणांनी मंडित असलेल्या, आणि आपल्या साहित्याने भूषणभूत ठरलेल्या ह्या श्रेष्ठ लेखकाने आज ब्याहत्तराव्या वर्षात पदार्पण केले आहे. पण माणसाचे वय वर्षांत मोजले जात नसते; ते त्याच्या अंतःकरणाच्या तारुण्यावरून ठरविले जात असते. जो अंतःकरणाने तरुण, तो वयाने वृद्ध असला तरी तरुणच. आणि तारुण्याचे प्रमुख लक्षण म्हणजे दुर्दम्य उत्साह व पुढे झेपावत जाण्याची ईर्षा ! ह्या दोन्ही गोष्टी खांडेकरांच्या अंगी भरपूर प्रमाणात विद्यमान आहेत. हे त्यांच्या आजही कार्य-रत असलेल्या लेखणीवरून आपल्या प्रत्ययास येते आहेच.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तेव्हा, आजच्या प्रसंगी श्री. खांडेकरांचे अभीष्टचिंतन करावे, आणि, त्यांना भरपूर आयुरारोग्य देऊन त्यांच्या हातून मराठी साहित्याची सेवा अशीच अधिकाधिक जोमाने घडत राहण्याची संधी त्यांना जगन्नियंत्याने द्यावी अशी त्याच्या चरणी प्रार्थना करणे एवढे काय ते उरते, ते मी स्वतःच्या, विदर्भ साहित्य संघाच्या आणि 'युगवाणी'च्या वतीने करतो.

संत नामदेवांवरील एक महत्त्वाचा हिन्दी ग्रंथ

नागपूर विद्यापीठातील हिन्दी विभागाचे प्रमुख डॉ. रामचंद्र मिश्र यांनी 'संत नामदेव और हिन्दी पद-साहित्य' हा जो प्रबंध नुकताच प्रसिद्ध केलेला आहे, त्याकडे महाराष्ट्रातील संतवाङ्मयाचे व्यासंगी आणि संशोधक या दोघांनीही अगत्याने लक्ष दिले पाहिजे. 'नामदेवरायांची गाथा' श्री. आवटे यांनी प्रसिद्ध केल्यापासून त्यासंबंधी वारकरी संप्रदायातील आणि इतरही विद्वानांनी पुष्कळच चर्चा गेल्या पाऊणशे वर्षात केलेली आहे. पण, त्या गाथेची चिकित्सक बुद्धीने संशोधिलेली आवृत्ती काढण्याचा प्रयत्न मात्र अद्याप झालेला नाही, याचे आश्चर्य वाटते. फक्त नामदेवमहाराजांच्या गाथ्यातील अभंग हे, अद्भुत चमत्कारांच्या कथांनी भरलेले असल्यामुळे, विश्वसनीय मानण्याजोगे नाहीत, असा अभिप्राय अनेक संशोधकांनी व्यक्त केलेला आहे. विशेषतः, त्या गाथेतील ज्ञानेश्वरादी संतांची चरित्रे, आदी, तीर्थावळी, समाधी इत्यादी भाग हे प्रक्षिप्त असावेत, असेही मत काही संशोधकांनी व्यक्त केलेले आहे. त्याचप्रमाणे, नामदेव या नावाचे जे दोन किंवा तीन संत वेगवेगळ्या काळात महाराष्ट्रात होऊन गेले, त्यांच्या अभंगांचीही भेसळ या गाथ्यात झालेली आहे, हेही सर्वमान्य झालेले आहे. तरी देखील ज्ञानेश्वरकाळातील या श्रेष्ठ संताच्या गाथ्याची पाठशुद्ध चिकित्सक आवृत्ती काही अद्याप महाराष्ट्र सरकार किंवा महाराष्ट्रातील विद्यापीठे यांच्याकडून काढण्यात आलेली नाही.

डॉ. रामचंद्र मिश्र यांनी या ग्रंथात, शीखांच्या "श्रीगुरुग्रंथसाहिब" या धर्मग्रंथात संग्रहीत करण्यात आलेल्या ६१ हिंदी पदांची मूळ शुद्ध संहिता प्रथम दिलेली असून, नंतर श्री. आवटे आणि श्री. जोशी यांनी प्रसिद्ध केलेल्या 'गाथापंचका'तील त्यांची १०२ हिन्दी पदेही दिलेली आहेत. त्यामुळे नामदेवरायांच्या 'गुरु ग्रंथसाहिबा'तील आणि 'गाथापंचका'तील हिन्दी पदांचा, भाषा आणि विचार या दोन्ही दृष्टींनी तुलनात्मक अभ्यास करण्याची उत्कृष्ट सोय झालेली आहे. स्वतः डॉ. रामचंद्र मिश्र यांनी या ग्रथाला १२४ पानांची प्रदीर्घ प्रस्तावना लिहून, तीत नामदेवकालीन परिस्थितीपासून तो त्यांच्या पदांच्या भाषेपर्यंत सर्व प्रश्नांची सांगोपांग चर्चा सूक्ष्म दृष्टीने केलेली आहे. विशेषतः हिन्दी पदांना त्यांनी दिलेल्या टीपा या पदांच्या भाषेचा अभ्यास करणारांना उपयुक्त वाटतील. प्रस्तावनेच्या शेवटी त्यांनी हिन्दी पदांच्या भाषाशैलीसंबंधी असा निष्कर्ष दिलेला आहे की, "उनकी काव्यगत भाषा-शैली में हिन्दी (ब्रजभाषा), मराठी और संस्कृत पदावली के साथ मारवाडी, बंगला, अरबी-फारसी आदि की शब्दावली भी उपलब्ध हैं, जो उनकी उत्तर भारत की यात्राओं के फलस्वरूप प्रतिफलित हैं।" या त्यांच्या विधानाची सत्यता, १११ ते १२२ पानात त्यांनी जी हिन्दी पदांची साहित्याच्या, संगीताच्या आणि व्याकरणाच्या दृष्टीने चिकित्सा केलेली आहे, तिच्यावरून आपल्या प्रत्ययाला येते. म्हणूनच, डॉ. मिश्र यांच्या या उत्कृष्ट ग्रंथाचे स्वागत करताना शेवटी असे म्हणावेसे वाटते की, हा ग्रंथ लिहून त्यांनी जुन्या मराठी साहित्याच्या संशोधकांना आणि अभ्यासकांना उपकृत केलेले आहे.

हा ग्रंथ फर्रुखाबाद (उ. प्र.) येथील शैलेन्द्र साहित्य सदन या संस्थेने प्रकाशित केलेला असून, त्याची पृष्ठ संख्या २५० आणि मूल्य १५ रु. आहे.

शं. बा. शास्त्री,
संपादक, **'युगवाणी'**

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर.

परीक्षा समय—शनिवार दि. १४ फेब्रुवारी १९७० पासून विभिन्न केंद्रात परीक्षा सुरू होतील.

परीक्षार्थ्यांना सूचना—परीक्षेपूर्वी २ दिवसांचे आत केंद्राधिकाऱ्यांकडून प्रवेशपत्र मिळवून स्थान व समयाची माहिती प्राप्त करून घ्यावी. याबाबत कार्यालयाकडे चौकशी करू नये.

केंद्राधिकाऱ्यांना सूचना—(१) आलेले साहित्य बरोबर आहे किंवा नाही हे तपासून पहावे व कमी-अधिकाची सूचना कार्यालयास त्वरित द्यावी. (२) परीक्षा संपताच पहिल्या डाकेने सर्व साहित्य व हिशेब कार्यालयाकडे रवाना करावेत. (३) परीक्षार्थ्यांना परीक्षेस बसविण्यास सहकार्य देणाऱ्या प्रचारकांना परीक्षेचे वेळी निरीक्षक म्हणून नियुक्त करावे. तसेच मराठी प्रवेश परीक्षेच्या मौखिक परीक्षेकरिता केंद्राधिकाऱ्यांनी आपल्या वतीने परीक्षकाची नियुक्ती करावी.

उत्तर-पत्रिका पाठविण्याविषयी सूचना

(१) संपूर्ण उत्तरपत्रिका आणि उपस्थितीपत्रके कोणत्याही परिस्थितीत सोमवारी बुकपोस्टाने रवाना व्हावयास पाहिजेत.

(२) आय-व्यय पत्रकाला जोडलेल्या पोस्टाने धाडलेल्या उत्तरपत्रिकांच्या पावतीवर सोमवारच्या तारखेचा पोस्टाचा शिक्का नसल्यास उत्तरपत्रिका स्वीकारल्या जाणार नाहीत व त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास केंद्रव्यवस्थापक जबाबदार राहतील. केंद्रांनी उशिरा पाठविलेल्या उत्तर-पत्रिका, परीक्षा व संघ या उभयतांच्या दृष्टीने आक्षेपार्ह असतात, म्हणून ही विशेष सूचना.

(३) पोस्ट ऑफिस गाईड पार्ट १ जून १९६० नियम ११४ परिच्छेद ८ पृष्ठ ४८ ला अनुसरून "एक्सरसाईज कॉपीज" या नावाखाली उत्तरपत्रिका रजिस्टर्ड बुकपोस्टाने पाठविल्या जाऊ शकतात. आवश्यकतेनुसार वरील सवलतीचा लाभ घ्यावा.

समय पत्रिका

परीक्षा दिनांक १४ फेब्रुवारी १९७०

शनि. दि. १४ फेब्रुवारी ७०	दु. २॥ ते ५॥	मराठी प्रवीण-१, मराठी प्राज्ञ-१, स्नातक १, पारंगत-१
रवि. दि. १५ फेब्रुवारी ७०	स. ७॥ ते १०॥	प्रवेश, परिचय, बोध, म. प्रबोध, म. प्रवीण-२ प्रारंभ, म. प्राज्ञ-२, विनीत १, परिचित १, सा. प्रबोध, स्नातक २, पारंगत २
	दु. २॥ ते ५॥	मराठी प्रवीण-३ मौखिक परीक्षा, मराठी प्राज्ञ-३, विनीत २, परिचित २, स्नातक ३, पारंगत ३
सोम. दि. १६ फेब्रुवारी ७०	स. ७॥ ते १०॥	प्राज्ञ -मौखिक, सा. पारंगत-४

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे प्रकाशन

अ-मराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता-सहज-सोपे पुस्तक

हिन्दी मराठी भाषा प्रवेशिका

(द्वितीयावृत्ती)

लेखिका--**श्रीमती मालतीबाई श्रीखंडे**

किंमत दोन रुपये

मागणीकरिता संपर्क साधा--

श्री. सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी मार्ग,
नागपूर-१

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

मा. नी. गलगलीकर,
सरचिटणीस

विदर्भ बाल चित्र स्पर्धा – १९६९

विदर्भ साहित्य संघाच्या कलाकेंद्र समितीतर्फे यंदा बाल चित्रकारांकरिता एक विदर्भ बाल चित्र स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत आलेल्या बाल चित्राकृतींचे एक प्रदर्शन संस्थेच्या अद्ययावत् प्रदर्शन-कक्षात व टिळक सभागृहात भरविले होते.

पारितोषिक वितरण व प्रदर्शन उद्घाटन

उपरोक्त बालचित्र स्पर्धेतील उत्कृष्ट चित्राकृतींना रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि ४ जानेवारी १९७० रोजी सकाळी ९ वाजता संस्थेच्या गडकरी सभागृहात कलामहर्षि विनायक एस्. मासोजी, माजी उपप्राचार्य, शांतिनिकेतन, यांच्या शुभहस्ते झाला.

सुरवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर समारंभाचे प्रमुख पाहुणे कलामहर्षि विनायक एस्. मासोजी व समारंभाचे अध्यक्ष श्रीमंत राजकुमार तेजसिंहराव भोसले, महापौर महानगरपालिका, नागपूर यांचे पुष्पहार घालून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व कलाकेंद्राचे उपसंयोजक श्री. प्रकाश कानिटकर यांनी स्पर्धेसंबंधी माहिती विशद केली. नंतर कलामहर्षींच्या हस्ते बालचित्रकारांना पारितोषिके देण्यात आली.

विदर्भ बालचित्र स्पर्धेत सर्वोत्कृष्ट चित्राकृती ठरल्याबद्दल पुलगावचे कुमार विलास बोरले यांना महापौर, महानगरपालिका, नागपूर यांनी दिलेले रु. १०१ चे वैयक्तिक पारितोषिक मिळाले.

यानंतर कलामहर्षींनी आपल्या भाषणात बालचित्रकारांचे कौतुक केले; व सद्गदित अंतःकरणाने आनंद व्यक्त केला.

अध्यक्ष श्रीमंत राजकुमार तेजसिंहराव भोसले यांनी बालचित्रकारांना आशिर्वादपर भाषण केले.

याचवेळी कलामहर्षी विनायक एस्. मासोजी यांच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष श्री. बाबुराव चिमोटे यांनी संस्थेतर्फे त्यांना अल्पशी भेट अर्पण केली.

याच प्रसंगी कलामहर्षी विनायक एस्. मासोजी यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

शेवटी कलाकेंद्राचे संयोजक श्री. वसंतराव टिकेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

बालचित्राकृतींचे प्रदर्शन सहा दिवस उघडे ठेवून प्रवेश निःशुल्क होता. प्रदर्शनाचा हजारो रसिकांनी रसास्वाद घेतला.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचा ४७ वा वर्धापन दिन

यंदा विदर्भ साहित्य संघाचा ४७ वा वर्धापन दिन बुधवार दि. १४ जानेवारी व गुरुवार दि. १५ जानेवारी १९७० रोजी वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात मराठवाड्याचे सुप्रसिद्ध साहित्यपंडित आणि विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

बुधवार दि. १४ रोजी सायंकाळी ६ वाजता सुरुवातीला सरचिटणीस श्री मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून संस्थेच्या आजपर्यंतच्या कार्यासंबंधी माहिती विशद केली आणि पुढील संकल्पित योजनांसंबंधी कल्पना दिली.

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांचे स्वागतपर भाषण झाल्यानंतर प्रा. कुरुंदकर यांचे पुष्पहार घालून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

प्रा. नरहर कुरुंदकर यांनी मुख्य पाहुणे म्हणून बोलताना साहित्याच्या पुनर्मूल्यमापनाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. ही आवश्यकता का निर्माण झालेली आहे, याचे प्रा. कुरुंदकरांनी फार उत्कृष्ट विवेचन केले. शेवटी सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी आभारप्रदर्शन केले.

गोविंदाग्रज -- एक दर्शन

रात्रौ ९ वाजता वि. सा. संघाच्या 'स्वरमंडळा'ने सादर केलेला 'गोविंदाग्रज – एक दर्शन' (कै. रा. ग. गडकरी यांच्या काव्याचे गायन) हा एक अभिनव कार्यक्रम झाला. येथील धनवटे नॅशनल कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक प्रा. रू. पां. पाजणकर ह्यांनी निवेदन लिहिले असून श्री. प्रभाकर चाफेकर यांनी तो कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचे संगीतनियोजक श्री. वसंत अंधारे हे होते. या कार्यक्रमात 'सूरमणी' श्री. शरद सुतवणे, श्री. मधुकर गुळवणी, सौ. उषा धारप, सौ. विद्यावती केतकर, सौ. अलकनंदा झिंजर्डे, डॉ. बाळासाहेब पुरोहित आणि वसंतराव अंधारे हे गायक आणि श्री. वाशीमकर, श्री. सामक, श्री. कावळे, श्री. पिल्ले, श्री. राजाभाऊ कानगो आणि श्री. मनोहर देशपांडे ह्या वादक कलाकारांनी भाग घेतला. या कार्यक्रमाचे संयोजन श्री. आनंद जोग यांनी केले.

'मराठी साहित्याविषयीच्या माझ्या अपेक्षा'

गुरुवार दि. १५ जानेवारी १९७० रोजी सायंकाळी ६–३० वाजता धनवटे रंगमंदिरात वि. सा. संघाच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाचा विषय 'माझ्या मराठी साहित्याविषयीच्या अपेक्षा' हा होता. प्रा. यशवंत मनोहर, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, डॉ. सुनील सुभेदार, प्रा. म. ना. लोही, प्रा. अशोक गोडघाटे आणि प्राचार्य राम शेवाळकर यांनी अनुक्रमे काव्य, कादंबरी, समीक्षा, नाटक, निबंध आणि विनोद या वाङ्मयप्रकारापासून असलेल्या आपापल्या अपेक्षा व्यक्त केल्या.

परिसंवादाचा समारोप करताना प्रा. कुरुंदकर म्हणाले, "कलात्मक वाङ्मय आणि रंजनात्मक वाङ्मय" यांच्यांतील सीमारेषा वाचकांनीच निश्चित केली पाहिजे."

शेवटी सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी आभारप्रदर्शन केले.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला

विदर्भ साहित्य संघातर्फे सोमवार दि. १९ व मंगळवार दि. २० जानेवारी ७० रोजी सायंकाळी ६ वाजता कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला गडकरी सभागृहात आयोजित केली होती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी'चे संपादक श्री. शं. बा. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते मुंबईचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. वि. ह. कुळकर्णी हे होते.

सोमवार दि. १९ जानेवारी रोजी प्रा. वि. ह. कुळकर्णी यांनी पहिले पुष्प 'कै. श्री. कृ. कोल्हटकर-नाटककार' या विषयावर गुंफले.

मंगळवार दि. २० जानेवारी रोजी त्यांनी गुंफलेल्या दुसऱ्या पुष्पाचा विषय 'कै. श्री. कृ. कोल्हटकर- विनोदी लेखक व टीकाकार' हा होता.

दि. १९ जानेवारी रोजी सुरवातीला श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रा. कुळकर्णी यांनी कै. वेहेरे यांच्या प्रतिमेला हार अर्पण केला.

त्यानंतर प्रा. वि. ह. कुळकर्णी यांचे पुष्पमाला घालून स्वागत केले. शेवटी श्री. मा. नी. गलगलीकर यांनी आभारप्रदर्शन केले.

कै. रा. ग. गडकरी स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे शुक्रवार दि. २३ जानेवारी १९७० रोजी सायंकाळी ६-३० वाजता 'कै. राम गणेश गडकरी' यांचा ५१ वा स्मृतिदिन प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात साजरा करण्यात आला.

सुरवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रमुख वक्ते प्रा. व. दि. कुळकर्णी यांनी कै. गडकरी यांच्या प्रतिमेला हार अर्पण केला व नंतर अध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित आणि प्रा. व. दि. कुळकर्णी यांचे पुष्पमाला घालून स्वागत केले.

मुंबईचे सुप्रसिद्ध टीकाकार प्रा. व. दि. कुळकर्णी यांनी 'राम गणेशांचे संकल्पित वाङ्मय' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान दिले.

प्रा. भ. श्री. पंडित यांचे भाषण झाल्यानंतर कै. गडकरी स्मारक समितीचे संयोजक श्री. प्रभाकर गडकरी यांनी आभारप्रदर्शन केले.

सावनेर येथील स्मृतिदिन

कै. गडकरी यांचा ५१ वा स्मृतिदिन सावनेर येथेही साजरा करण्यात आला. विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्री. बाबूराव चिमोटे, सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. के. ए. पोतदार आणि प्रमुख पाहुणे प्रा. व. दि. कुळकर्णी यांनी सावनेर येथे जाऊन गडकऱ्यांच्या समाधीचे दर्शन घेतले व समाधीला पुष्पहार अर्पण केला. यावेळी सावनेर येथील असंख्य नामांकित मंडळी उपस्थित होती.

तत्पूर्वी दुपारी ४ वाजता सावनेर येथील म्युनिसिपल हायस्कूलच्या सभागृहात प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. व. दि. कुळकर्णी यांचे व्याख्यान झाले.

सुरवातीला श्री. यादवराव उपाध्ये यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर प्रा. कुळकर्णी यांनी गडकऱ्यांच्या प्रतिमेला हार अर्पण केला. शेवटी आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

आंतर-महाविद्यालयीन खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा

विदर्भ साहित्य संघाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत अकोला येथील सीताबाई आर्टस् कॉलेजने सादर केलेल्या 'काका किशाचा' या नाट्यप्रयोगाने प्रथम क्रमांक मिळवून खोलकुटे ढाल जिंकली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्याच नाटकातील 'किशा'च्या भूमिकेबद्दल श्री. भय्या भागवत यांना सर्वोत्कृष्ट अभिनयाबद्दल वैयक्तिक पारितोषिक मिळाले असून नागपूरच्या मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनी कु. ज्योती पेंडसे यांना स्त्री-भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. कु. पेंडसे यांनी 'चोरावर मोर' ह्या नाटकात ताराची भूमिका केली होती.

ह्या खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत

(१) सीताबाई आर्टस् कॉलेज, अकोला–'काका किशाचा'.

(२) विधी महाविद्यालय, नागपूर– 'प्रेमा तुझा रंग कसा ?'

(३) धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर– 'तो मी नव्हेच'.

(४) विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय, नागपूर– 'माझी घरटी माझी पिले'.

(५) मेडिकल कॉलेज, नागपूर– 'चोरावर मोर'.

(६) विश्वेश्वरैय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नागपूर– 'नवरा म्हणू नये आपला'.

(७) नागपूर महाविद्यालय, नागपूर–'आवर्त' याप्रमाणे सात महाविद्यालयांनी भाग घेतला.

प्रा. फणसाळकर, श्री. अरविंद पाठक, श्री. बाळ गावली आणि श्री. मधुकर डांग्रे यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

आस्वाद

विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यास मंडळाने 'आस्वाद' हा कार्यक्रम आयोजित केला आहे. नवीन मराठी पुस्तकांचा परिचय वाङमयप्रेमी मंडळींना करून देणे हाच या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमात नवीन निवडक मराठी पुस्तकांचा परिचय व त्यांच्या काही भागांचे वाचन करण्यात येईल. या कार्यक्रमाचे स्वरूप समीक्षणात्मक नसून परिचयात्मक आहे.

या मालेतील पहिले पुष्प गुरुवार दि. २२ जानेवारी १९७० रोजी सायंकाळी ५–३० वाजता श्रीशिवाजी ग्रंथालयात गुंफण्यात आले. या कार्यक्रमात कै. आचार्य अत्रे यांची 'हुंदके' व 'आषाढस्य प्रथम दिवसे' ही दोन पुस्तके आणि श्री. मोहन रानडे यांची 'सतीचे वाण' ही आत्मकथा परिचयासाठी घेण्यात आली होती.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ